मराठी कवितेच्या

# पाऊलखुणा



विनीता देशपांडे

मराठी कवितेच्या

# पाऊलखुणा

काव्यशास्त्र

विनीता देशपांडे

ई साहित्य प्रतिष्ठान

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

मराठी कवितेच्या पाऊलखुणा

विनीता देशपांडे

संपर्क; फ्लॅट नं.१२, इडन गार्डन, सेक्टर-२६, प्राधिकरण, पुणे ४११ ०४४

मो.नं ९८९०६४६५७७

E-mail: vsdeshpande14@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmaaail. com

©esahity Pratishthan®2018

प्रकाशन :१४ जानेवारी २०१८

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

सन १८०० ते सन१९०० याकाळातील कविंच्या काव्यप्रवासाचा आढावा या लेखसंग्रहात घेतलेला आहे. हे कवि आणि कवयित्री, त्यांचा काव्यप्रवास, त्यांचे योगदान महत्वाचे आणि मोलाचे आहे. नवकवीनां या अर्वाचीन कविंबद्दल आणि त्यांच्या योगदानाबद्दल माहिती व्हावी हाच या लेखसंग्रहाचा उद्देश्य आहे.



ऑळख

विनीता श्रीकांत देशपांडे

एम.ए (मराठी), एम.ए(इंडॉलॉजी),

"होप ॲन्ड हॅप्पीनेस फांउडेशनची संस्थापक, अनेक सामाजिक उपक्रमांचे आयोजन करुन समाजसेवी संस्थांना मदत.

अनेक मासिक, वृत्तपत्र, दिवाळीअंकांसाठी समिक्षा, अनुवाद, कथा, आणि काव्य लेखन,

"स्मृत्पर्ण" कादंबरी ईसाहित्यने प्रकाशित केलेली माझी पहिली कादंबरी, या कादंबरीसाठी आजही प्रतिक्रिया वाचक पाठवत आहेत.

संपर्क; फ्लॅट नं.१२, इडन गार्डन, सेक्टर-२६, प्राधिकरण, पुणे ४११ ०४४

मो.नं ९८९०६४६५७७

श्री

विनीता ऐनापुरे

## प्रस्तावना

काळाचा पडदा उघडतो, एखादा माणूस पुढे येतो, अंगी असलेल्या गुणांचा उपयोग करून एखादी कलाकृती तो सादर करतो, थोडाफार नावलौकिक मिळवतो आणि काळाचा पडदा बंद होतो. त्यानंतर त्याची नावनिशाणी अगदी अल्पकाळ टिकते. तो माणूस कलावंत, शास्त्रज्ञ, कवी, लेखक, गायक, चित्रकार, अध्यापक - प्राध्यापक कोणीही असू शकतो पण काळाच्या उदरात तो गडप झाला. संपर्क सगळे। त्याचे कर्तृत्वाहि संपले। जन पळभर म्हणतील हाय - हाय! या प्रखर, कटु सत्याची जाणीव तेवढी उरते.

असं असले तरीही मनुष्य त्या त्या काळात आपल्यातील गुण जाणून इतरांपुढे त्यांची निर्मिती करतो. उत्तम निर्मितीचे परिणाम त्या काळावर उमटतात. हे परिणाम कधी क्षीण तर कधी प्रखर असतात. ज्यांची कला कलावंताच्या निधनानंतरही थोडीशी टिकते ती क्षीण. आणि ज्यांची कीर्ति खूप काळपर्यंत टिकते ती प्रखर.

'मराठी कवितेच्या पाऊलखुणा' हे सौ. विनीता देशपांडे यांनी लिहिलेलं पुस्तक वाचनीय आहे. विशेषतः 'क्षीण परिणाम' झालेले त्या मराठी कवितेच्या प्रवाहात अनेक कवी सामील झाले. किती ते नेमका आकडा कसा सांगणार? पण विनीताने अत्यंत आधुनिक कवितेच्या उगमापासून त्या काळातील कवींचा शोध घेतला. त्या कवींची नुसती कविता अथवा वैयक्तिक माहिती न सांगता मराठी कवितेत या कवींनी काय भर घातली, त्याचा मागोवा घेतला आहे. नवकाव्यापूर्वी गाजलेले पण आज अज्ञातवासात असलेल्या ह्या कवींची नव्या पिढीला कितपत माहिती असेल? त्यांची कविता किती ठाऊक असेल? ह्यांचा शोध घेऊन त्यांना आपल्यासमोर नव्याने आणले आहे, ह्याबद्दल विनीताचे खरोखर कौतुक करायला हवे. तिला धन्यवाद द्यायला हवेत. या पुस्तकाचा पहिला भाग होय. या भागातील कविता माझ्या दृष्टीने ही स्वतंत्र नाही. तिच्यावर प्राचीन मराठी आणि इंग्रजीचा बराच प्रभाव असून त्यातून ही नवनिर्मिती होत आहे.

दुसरा भाग अर्थात केशवसुतांच्या काळापासून सुरू होतो. कोणी विचारेल 'यात नवीन ते काय सांगितले? केशवसुत आणि त्यानंतरचे कवी यावर खूप काही लिहिले गेले आहे." हे विचारणं बरोबर आहे. पण इथेच विनीताचा काव्याकडे बघण्याचा एक वेगळा दृष्टीकोन दिसून येतो. तिने एका वेगळ्या दृष्टीकोनातून कवितेचा विकास

५३७/२१, भवानीमाता मंदिराजवळ, यमुनानगर, निगडी, पुणे ४११०४४ फोन : +९१-०२०-२७६६०४८९, मो.९२७००२५३७४

विनीता ऐनापुरे

आणि विस्तार कसा होत गेला? समकालिन व नंतरच्या कवींवर त्याचा काय परिणाम झाला, हे लिहीतांना आजवर कोणीही विचार केला नाही, अशा गोष्टींकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे. आपली स्वतःची मतं तिने परखडपणे मांडली आहेत. तत्कालिन कवींनी ~~प~~ सामाजिक प्रश्न मांडण्याचे जे धारिष्ट्य केले, ते प्रश्न आजही जसेच्या तसे आहेत. हे धारिष्ट्य आजच्या एकाही कवीमध्ये नाही असे विनीता स्पष्टपणे सांगते. जुन्या काळातल्या कवींनी कवितांना दिलेले अंतर्बाह्य स्वरूप हे आज विसरल्यासारखे झाले आहे. सामाजिक प्रश्न अजूनही तेच आहेत, त्या प्रश्नांना उत्तरे मिळालेली नाहीत. ना काव्यातून, ना प्रत्यक्षातून | ही खंत विनीता या पुस्तकात व्यक्त करते, हेच या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे.

'रविकिरणमंडळ - एक अवलोकन' हा पुस्तकाचा तिसरा भाग. यात काव्यप्रवाहातील काव्य हे काळाच्या पडद्याआड जाण्याआधी हे अवलोकन व्हावे या दृष्टीने हा काव्याचा भाग स्वतंत्र घेतला आहे आणि इथे विनीता जास्त धीटपणे आपले विचार मांडते आहे असे मला वाटते. ~~काव्य~~ काव्यातील १९२० नंतरचा काळ, रविकिरण मंडळ हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. त्याचबरोबर भाग २ मध्ये 'छंदोरचना' आणि 'सुधारक' या दोनवर सविस्तर लिहीले आहे. कारण हे दोन ग्रंथ म्हणजे जुन्या-नव्या कवींना जोडणारा एक दुवा आहे, काव्यशास्त्र आणि काव्यविचार यांचा प्रवाह अखंडित होणे, हे कवींचेच काम आहे, असे विनीता स्पष्टपणे सांगते. काव्यशास्त्र हे कवितेतून जपले गेले आहे, बरेच ही सांगून ती कवींना जबाबदारीची जाणीव देते. हा सर्व भाग मुळातून वाचण्यासारखा आहे.

शेवटच्या म्हणजे चौथ्या भागात मराठी कवयित्रींचा काव्यप्रवास वर्णन केला आहे.

एकूणच स्वतंत्र चिकित्सक बुद्धीला स्मरून विनीताने या पुस्तकाचे लेखन केले आहे. विद्यार्थ्यांना आणि मराठी कविता लिहू पहाणाऱ्या कवीवर्गाला, अभ्यासकांना हे पुस्तक अतिशय उपयुक्त ठरेल, ~~याची~~ असा मला विश्वास वाटतो.

विनीताला ह्यापुढील प्रयत्नांना शुभेच्छा.

विनीता ऐनापुरे

५३७/२१, भवानीमाता मंदिराजवळ, यमुनानगर, निगडी, पुणे ४११०४४ फोन : +९१-०२०-२७६६०४८९, मो.९२७००२५३७४

अर्पण पत्रिका

काव्यपरंपरेचा आरंभ झाल्यापासून
काव्यप्रवाह अबाधित आणि अखंडित ठेवणाऱ्या
समस्त कविवर्य आणि कवयित्रींना समर्पित.....

विनीता देशपांडे

# मराठी कवितेच्या पाऊलखुणा

सन १८४० च्या सुमारास नवकाव्यपरंपरेचा शुभारंभ झाला. या परंपरेचे आधारस्तंभ म्हणजे समाजात रुजलेले तत्कालीन तीन प्रमुख काव्यप्रवाह होते: संत साहित्य, पंडिती साहित्य, शाहिरी साहित्य अर्थात संत-पंत-तंत काव्य. संत काव्य मराठी काव्याचा एक अनमोल ठेवा आहे. याचा कालखंड म्हणजे तेराव्या शतकातील श्री. ज्ञानेश्वर ते सोळाव्या शतकातील समर्थ रामदासस्वामींच्या साहित्यनिर्मितीपर्यंतचा काळ. यादवांच्या राजवटीत, समाजात वर्णभेद, जातिभेद, विषमता यांसारखे अंतर्द्वंद्व सुरु होते. यात अडकलेल्या सर्वसामांन्यांना स्वार्थातून परमार्थ साधण्याचा मार्ग संतांनी दाखविला. तत्वज्ञानाला विवेकाची जोड देऊन एक आदर्श आयुष्याची संकल्पना सामान्यांपुढे संतांनी ठेवली. कर्म -निती यांचे महत्व त्यांनी अभंगवाणीने समृध्द केले, म्हणून इतक्या शतकांनतरही संत साहित्याचा प्रचार आणि प्रसार होतच आहे. मराठी साहित्यात संत साहित्य शाश्वत आहे.

संत काव्यासोबत संस्कृत स्तोत्र ,श्लोक इ. रचनांमार्फत शास्त्री मंडळी पंडिती काव्यपरंपरा जोपासत होती. पंडितीकाव्य म्हणजे कवी मुक्तेश्वर, रघुनाथ पंडित, वामन पंडित, श्रीधर, सामराज, विठ्ठल, निरंजन माधव आनि मोरोपंत या पंडितांनी निर्माण केलेले साहित्य. पंडित काव्याची प्रेरणा संस्कृत काव्य होते. हे काव्य संस्कृत, अलंकारयुक्त व वृत्तांच्या चौकटीत होते, ते संस्कृत जाणकारांनाच उपयुक्त ठरले. तसेच पंडित काव्यात मुख्यत्वे पौराणिक संदर्भ व तत्वज्ञान मांडले होते आणि त्यातील भाषा सर्वसामान्यांची नसल्यामुळे ती एका ठराविक वाचक वर्गात घुटमळत राहिली, सामान्यवर्गात ती रुळलीच नाही.

शाहिरी काव्य हे तत्कालीन घटना, व्यक्ती, त्यांचे पराक्रम आणि तत्कालीन सामाजिक घडामोडींवर आधारित होते. हे काव्य लोकसमुहापुढे विशिष्ट नाट्यपध्दतीने मांडल्यामुळे जनमानसात पटकन रुळले. या साहित्यात पोवाडे, लावणी या प्रकारांनी क्रांतीकाळात एका प्रकारे जनजागृतीचे कार्य केले. इंग्रजी राजवटीत याला फारशी मान्यता मिळाली नसली तरी तत्कालीन शाहिरांनी हा प्रकार समाजात यशस्वीपणे रुजवला, ज्याचा परिणाम वैचारिकक्रांतीचा प्रसार आणि जनजागृतीच्या स्वरुपात बघायला मिळतो. तत्कालीन गाजलेले शाहिर म्हणजे अनंतफंदी घोलप(सन १७४४-१८१९), रामजोशी(सन १७५८-१८१३), होनाजी बाळा(सन१७५४-१८४४) यांनी आपल्या उत्स्फुर्त रचनांनी एक कालखंड गाजवला. आजही अनेक भुपाळया,पोवाडे, लावण्या घरोघरी गुणगुणल्या जातात. शाहिरी साहित्याचे वैशिष्ट्ये म्हणजे शौर्यगाथा, सहजरम्य वर्णन, प्रासादिक भाषा आणि नाट्यमय तालबद्द आविष्कार.

इंग्रज राजवट येण्यापूर्वीच अस्थिर सामाजिक जीवनामुळे मराठी काव्याची व्याप्ती हळुहळु आकसत गेली. या अस्थिर काळात प्राचीन परंपरेतील भक्तीपरता पूर्ण नष्ट नहोता समाजात टिकून होती. किंवा भक्तीपरतेमुळेच समाजात एकात्मता, जीवनमुल्ये, आदर्श टिकून होते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

सन १८१८ मध्ये पेशव्यांची सत्ता गेली आणि मराठा साम्राज्याचा अस्त झाला. इंग्रजीराजावटीसोबत मुद्रण, नवीन साहित्यप्रकार, नवे शैक्षणिक धोरण अशा अनेक गोष्टी आल्यात. या पाश्चात्य संस्कृतीचा व साहित्याचा प्रभाव समाजात पसरत होता. समाज परिवर्तानाच्या या वळणावर बराच काळ घुटमळत होता, त्याचे मुख्यकारण म्हणजे सामाजिक-सांस्कृतिक-राजकीय अस्थिरता. मात्र महाराष्ट्रात इंग्रज राजवट आल्यावर इंग्रजी साहित्याची हळुहळु ओळख होत असतांना प्राचीन काव्याचे पडसाद जनमानसात रेंगाळत होते. उदबोधन व लोकरंजनासाठी विचार व्यक्त करण्याचे अनेक माध्यम जसे लेख, कथा, कादंबरी, नाटक इ. गद्यसाहित्याची लोकप्रियता वाढत होती. आधिच आक्रस्त मराठी काव्याचे क्षेत्र आणखी आकुंचित होत गेले. या परिस्थितीची जाणिव होताच तत्कालीन साहित्यिकांनी प्राचीन व संस्कृत रचनांचे मराठीत भाषांतर-अनुकरण करुन मराठी काव्याला एक वळण, एक दिशा

देण्याचा प्रयत्न केला. त्यांचे हे प्रयत्न काळाच्या पडद्याआड जाण्याअगोदर त्यांचा उल्लेख करणे महत्वाचे आणि गरजेचे वाटते.

* श्री.विठोबा अण्णा दप्तरदार, श्री.भास्कर दामोदर पाळंदे आणि श्री.नारायण धोंडोदेव खांडेकर यांचे भक्तीपर काव्य.

* संतकाव्याचे मंथन करुन "काव्यामृताचा नवनीत भेला" रचणारे श्री.परशूराम तात्या गोडबोले.

* "मेघदूत "वर आधारित श्री.जग्गनाथ पंडित यांचे "करुणाविलास" व "विरहिविलाप" या खंडकाव्याचा श्री.कृष्णशास्त्री चिपळुणकर यांनी केलेला अनुवाद. या अनुवादाने मराठी काव्य परत बहरु लागले

* श्री.गणेशशास्त्री लेले यांचा "रघुवंशाला", "अमरुशतकाला"व "महिम्न्स्तोत्र" चे मराठीत रुपांतर.

* श्री.कृष्णशास्त्री राजवाडे यांचे वर्षभरातील सणांचे वर्णन करणारा "उत्सवप्रकाश" हा ग्रंथ.

* श्री.दातार (श्री.कृष्णशास्त्री चिपळुणकर यांचे नम्रसेवक व विद्यार्थी म्हणवून घेणारे)यांचे कुमारसंभव याच्या सातव्या सर्गाचे मराठीत भाषांतर.

* श्री.पांडुरंग गोविंदशास्त्री पारखी यांची ऋतुसंहारावर आधारित "षडऋतुवर्णन" ही रचना.

या भाषांतरीत साहित्यावर इंग्रजी साहित्याचा कुठलाच प्रभाव आढळून येत नाही. या साहित्याने अभिजात संस्कृत रचनांची मराठीत ओळख करुन देण्याचे कार्य केले. या साहित्याची भाषा पंडित कवींच्या वळणाची असली तरी त्यातील आत्मा मराठी होता. त्या काळी मराठी काव्याचे क्षेत्र जरी आकुंचित झाले असले तरी तिची योग्यता खालावली असे म्हणता येणार नाही, त्यापुरती काव्यप्रभावाची व्याप्ती कमी होती एवढेच. ही तत्कालीन मराठी काव्याची एक बाजू झाली.

साधरण याच काळात मुंबई विद्यापिठाची स्थापना, इंग्रजांविरुद्ध आंदोलने, नियतकालिके-वृत्तपत्र-मासिकांची वाढती लोकप्रियता, गद्य वाङ्मयाचा वाढता प्रभाव, आधीच आक्रस्त काव्यप्रवाह या परिस्थितीत आकुंचित झाला असला तरी भाषांतर आणि अनुकरणाच्या माध्यमातून काही कवींनी काव्यधारा प्रवाहित ठेवली. ते म्हणजे:

* बाजबा रामचंद्र प्रधान यांचे सर वॉल्टर स्कॉट लिखित "लेडी ऑफ द लेक" चे थोडे भाषांतर थोडे अनुकरण असा साहित्यप्रकार म्हणजे "दैवसैनी" हे खंडकाव्य.

* डॉ. कान्होबा रणछोडदास किर्तीकर यांचे "इंदिरा" हे खंडकाव्य टेनिसन लिखित "प्रिन्सेस" ची अनुकृती होती. इंदिराच्या निमित्याने कवीने यात स्त्री वैधव्य, वपनविधी,पुरुषांचे बहुपत्नीकत्व, दास्य अशा अनेक अन्यायांना वाचा फोडली. यांचे अजून एक वैशिष्ट्ये म्हणजे स य स य हे गण असलेले बारा अक्षरांचे वृत्त वापरुन त्यास इंदिरा असे नाव दिले. मणिबंधवृत्ताचा त्यांनी जातीत रुपांतर केले.

वृत्त्बध्दरचनांचे नवनवीन प्रयोग करण्याचा आदर्श किर्तीकर यांनी येणाऱ्या कवींपुढे ठेवला.

* श्री.विष्णु मोरेश्वर महाजनी यांनी वड्स्वर्थ, शेले, कीटस, कोलरीज, बायरन, ब्लॅक, बर्न्स, स्कॉट इ. कवींच्या एकूण ४१ कवितांचे मराठीत रुपांतर करुन सन १८६६ साली" कुसुमांजली " हा काव्यसंग्रह प्रसिध्द केला. किर्तीकरांप्रमाणेच महाजनी यांनी यमक च्या दृश्टीने नवे काव्य प्रयोग केलेत.

* श्री.महादेव मोरेश्वर कुंटे लिखित "राज शिवाजी" हे नाट्यमय शौर्य काव्य त्या काळी खूप गाजले. कुंटे यांचे उल्लेखनीय साहित्य म्हणजे "आर्य लोकांच्या हिंदुस्थानातेल सुधारणा क्रमाचा इतिहास या प्रबंधास रोम येथे पारितोषिक मिळाले. तसेच त्यांचे तात्विक काव्य "मन" खूप प्रसिध्द झाले.

प्राचीन व परंपराप्रिय मराठी साहित्य आणि इंग्रजी साहित्याचा प्रभाव असलेले मराठी साहित्य अशा संमिश्र वातावरणात जनमानसात स्वतंत्र कवितेचे अस्तित्व हळुहळु आकर घेत होते. प्राचीन मराठी-संस्कृत काव्याचे पडसाद, इंग्रजी साहित्याचा प्रभाव आणि स्वंतंत्रपणे विकसनशील मराठी कविता या तिन्ही स्थितींकडे दृष्टीक्षेप टाकता लक्षात येते की प्राचीन

परंपरेतील भक्तीपरता पूर्ण नष्ट न होता समाजात टिकून होती. नववृत्तनिर्मितीच्या प्रक्रियेला सुरवात झाली होती. जुन्या क्लिष्ट वृत्तांची शृंखला सैल होत होती, इंग्रजी साहित्याचा प्रभाव आणि अनुकरणामुळे स्फुट कविता, भावकविता बहिर्मुख वृत्ती सोबत आत्मपर काव्याची निर्मिती होत होती. परमार्थ व पौराणिक कवितांमधून काव्य प्रचलित सामाजिक प्रश्नांकडे वळत होते. वास्तवप्रधान कविता आकार घेत होती. तात्पर्य हेच कविता आशय आणि अभिव्यक्तीच्या परिवर्तनाकडे वाटचाल करु लागली आणि सन १८८५ च्या उत्तरार्धात आधुनिक कवितेची मुहुर्तमेढ रोवल्या गेली.

सन १८४० ते १९२० या कालखंडातील मराठी कवितेचे अवलोकन करतांना लक्षात येते की त्या काळी परंपरावादी आणि सांस्कृतिक धोरण जपणारी एक काव्यधारा आणि यासोबत प्रगतीशील व नवविचारांचा संयोग साधणारी काव्यधारा अशा दोन काव्यधारा अस्तित्वात होत्या. या काव्यधारेतील साधारण व असाधारण असे काव्यकतृत्व अस्तित्वात होते, जे आजच्या विस्तारित काव्याचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या पाऊलखुणा काळाच्या लाटात विरुन जाण्यागोदर त्यांना अर्पण केलेली ही एक काव्यांजली.

*श्री.गो.वा.कानिटकर*

श्री.गोविंद वासुदेव कानिटकर( जन्म ९ जानेवारी १८५४व मृत्यु १९१८). मराठीतील एक चिंतनपर काव्य म्हणून उल्लेख करायचा झाला तर कानिटकरांच्या "संमोहलहरी"चा करण्यात येत असे. तत्कालीन समीक्षकांनी याची तुलना केकावलीशी केली होती. संमोहलहरीतील मुख्य वृत्ती संमोह व संशय आहे. ईश्वर निर्मित अनाअकलनीय गूढ अशा स्थितीचे संमोह व संशय यात कवीनी व्यक्त केले आहे. कवीने विठ्ठल बापूजी करमरकर लिखित "हिमालयवर्णन" या संस्कृत काव्याचा मराठी अनुवाद ही केला होता. "हॅम्लॅट" शेक्सपिअर लिखित नाट्याचे भाषांतर व आयुष्याच्या उत्तरार्धात रविन्द्रनाथ टॅगोर लिखित "गितांजली" चे भाषांतर केले. मिल्ल लिखित "सबजेक्शन ऑफ वूमन" याचा "स्त्रियांची परवशता" हा अनुवाद त्यांची सामाजिक जाणीव व साहित्यनिष्ठा सिध्द करतो. कानिटकर हे उच्चशिक्षित होते व त्यांची विविध भाषांवर प्रभुत्व होते. मात्र कवीचे स्फुट काव्यलेखन आढळत नाही. गोविंदरावांची पत्नी काशीबाई कानिटकर याही प्रसिद्ध लेखिका होत्या.

*वि.भ.लेंभे*

श्री.विठ्ठल भगवंत लेंभे( जन्म १८५० मृत्यु १९२०). जन्म १८५०मध्ये तळेगाव येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षणही तळेगाव येथे झाले. कवीचे संस्कृत व इंग्रजी भाषेवर प्रभुत्व होते. जॉन मिल्टन त्यांचे आवडते कवी. इंग्रजी कवितेची आवड आणि वाचन दांडगे असले तरी त्यांच्या कवितेवर इंग्रजी साहित्याचा प्रभाव नव्हता. कवितेतील भाषा-रचना आणि विषय हे संस्कृत वळणाचे होते. लेंभे यांचे उल्लेखनीय साहित्य म्हणजे "शोकावर्त", यात त्यांनी त्यांच्या पहिल्या पत्नीच्या मृत्युचा शोक व्यक्त केला आहे. त्यांचे इतर उल्लेखनीय साहित्य म्हणजे "सुरतरंगिणी", "विष्णुनिधन", "एकनाथवियोग","मित्रदर्शन", "आनंदकंद" आणि "खंडिता". कवीच्या बहुतांश रचना प्रासंगिक होत्या. कवीचे पुणे येथे १९२०मध्ये निधन झाले.

*कृ.ना.आठल्ये*

श्री. कृष्णाजी नारायण आठल्ये (जन्म १८५२ मृत्यु १९२६). आठल्ये हे त्या काळचे एक कुटुंबवत्सल कवी होते. त्यांच्या रचनांमधे गृहिणीच्या रोजच्या जगण्यातला जिव्हाळा, सहज, सुबोध भाषा या काव्यगुणांमुळे त्या काळी कवीच्या रचना घरोघरी वाचल्या जात असे. "सासरची पाठवणी" या रचनेतील काही ओळी:

मर्यादा धरणे, स्वकार्य करणे साधेपणे वागणे

‘द्या द्या वस्तु’ म्हणोनिया नच कधी कोणासही मागणे

जे पानवरती पडेल समयी नेमस्त ते भक्षणे

ही लोकप्रिय व्हावयास बरवी आहेत लक्षणे.

तर "प्रमाण" या रचनेत आठल्ये माणसाचे आयुष्य कसे प्रमाणबद्द असावे याची संकल्पना मांडतांना म्हणतात:

अती कोपता कार्य जाते लयाला

अती नम्रता पात्र होते भयाला

अती काम ते कोणतेही नसावे

प्रमाणामधे सर्वकाही असावे.

अती लोभ आणि जना नित्य लाज

अती त्याग तो रोकडा मृत्यु आज

सदा तृप्त नेमस्त सर्वा दिसावे

प्रमाणामधे सर्व काही असावे

*ग.ज.आगाशे*

श्री.गणेश जनार्दन आगाशे (जन्म १८५२ मृत्यु १९१९) आगाशे हे शोककाव्याचे जनक म्हणुन ओळखले जात. "बाष्पांजली" हे त्यांचे उल्लेखनीय काव्य, हे त्यांनी त्यांच्या दिवंगत मुलाच्या स्मरणार्थ लिहिले होते. त्यांचे इतर उल्लेखनीय साहित्य म्हणजे " बिरुदावली ", " तीन हरीभाऊ ", "एडवर्ड बादशाह".

*मो.ग. लोंढे*

श्री.मोरो गणेश लोंढे ( जन्म १८५४ मृत्यु १९२०) लोंढे यांची "बोधवादी" कवी म्हणून ख्याती होती. त्यांच्या बहुतेक रचना उपदेशपर आहेत. त्यांचे उल्लेखनीय साहित्य "बोधशतक", "बोधामृत", "बोधसुधा", "बोधमाला". कवीच्या कुठल्याच रचनांमधे कल्पनाविलास वा

रम्यवर्णने आढळत नाही. समाजात एक आदर्श जीवनाची संकल्पना कशी असावी याचा उल्लेख वारंवार प्रत्ययास येतो. "मी माझ्या एकट्याकरताच नाही" या रचनेतील ओळी:

तैसा नरा जन्म तुझाही पाही

काही तुझ्यासाठीच मात्र नाही

परार्थ त्याचा उपयोग व्हावा

हा हेतु चिंत्तात तुझ्या असावा

परोपकारी निजशक्ती वेंची

परोपकारी निजवित्त खर्ची

वाणी पराला हित तेच सांगो

परोपकारी तव देह लागो.

*गं.रा.मोगरे*

श्री.गंगाधर रामचंद्र मोगरे( जन्म १८५८ मृत्यु १९१५) मोगरे यांची " वैलापिक कवी म्हणून ख्याती होती. त्यांच्या बहुतेक रचना व्यक्तीचित्रांवर आधारित आहेत. विष्णुशास्त्री पंडित, विष्णुशास्त्री चिपळुणकर, आनंदीबाई जोशी, भाऊराव कोल्हटकर,व्हिक्टोरिया राणी, दयानंद सरस्वती, आशा अनेक महान व्यक्तींवर काव्यं लिहिलीत. त्याकाळी उपहासात्मक काव्याचे प्रवर्तन करण्याचे श्रेय मोगरे यांनाच दिले पाहिजे."मेथाजीची मजलस", "पदवीचा पाडवा" हे कवीचे उल्लेखनीय उपहासत्म्क काव्य. मोगरे यांनी संस्कृत-मराठी, इंग्रजी-मराठी भाषांतरेही केलीत. त्यात धुंडीराजकृत "अभिनव कादंबरी "या संस्कृत कादंबरीचे आणि "लाइट ऑफ अशिया" हे सर एडविन अर्नोल्ड लिखित पुस्तकाचे "बुध्दजन्म"म्हणून रुपांतर उल्लेखनीय आहे. मोगरे यांनी शोककाव्ये, भाषांतरे, राजकिय, उपहासात्मक आणि समाजप्रबोधन अशा विविध विषयांवर विपूल लेखन केले. "मराठी ग्रंथकारास प्रार्थना" या रचनेतील या ओळी:

माता, तशी स्वभाषा, सेवाया होय आपणां उचित;

किंबहुना मातेहुनि अधिक हिची योग्यता असे खचित.

दे जन्म मात्र माता, भाषा व्यवहार चालवी सकळ;

मातेशिवाय जन्मिह जाय, न भाषेशिवाय एक पळ.

*ए.ग. भांडारे*

श्री.एकनाथ गणेश भांडारे(जन्म १८६३ मृत्यु १९११). लेंभे आणि भांडारे हे कविमित्र होते. जगन्नथकृत "करुणाविलास" या संस्कृताचे भाषांतर करुन कवीने आपला काव्यप्रवास आरंभ केला. "मुक्तांजली" हा त्यांचा इंग्रजी कवितांचा अनुवादित संग्रह. त्यांचे उल्लेखनीय साहित्य म्हणजे "सखीसंस्मृति"तर त्यांच्या पहिल्या साहित्यकृतीवर "कामकंदला"वर त्याकाळी अनेक टीका झाल्यात."पवनप्रकोप" हा कवीचा हास्यसाहित्याचा एक प्रयोग होता.

*अनंततनय*

श्री.दत्तात्रय अनंत आपटे(जन्म १८७९ मृत्यु १९२९) यांनी जुन्या वळणाची व अनुकरणात्मक कविता लिहिली. कवीचे उल्लेखनीय साहित्य म्हणजे "ह्रदयतरंगा", "श्री.शारदादूतिका", "नवरसमंजिरी" आणि "तिलकविजय". कवीने भक्ती, राष्ट्रीय, ऐतिहासिक, विनोदी अशा अनेक विषयांवर विपूल लेखन केले.

परोपकारी निजशक्ती वेंची

परोपकारी निजवित्त खर्ची

वाणी पराला हित तेच सांगो

परोपकारी तव देह लागो.

*राधारमण*

राधारमण अर्थात कृष्णाजी पांडुरंग लिमये(जन्म १८७८ मृत्यु १९२२). हे जुन्या वळणाचे कवी. टिळकभक्ती त्यांच्या जीवनाची स्थिरवृत्ती होती. त्यांचे "आर्यमाताविलाप" हे काव्य टिळकांना १९०८ साली राजद्रोही म्हणून जाहिर केले त्यावर आधारित आहे. तर " महाराष्ट्रवीरदेशा " हे मराठ्यांचे शौर्यकाव्य त्याकाळी खूप लोकप्रिय झाले. कवीचे " जहाल व मवाळ " या संवादात्मक काव्यातून सामाजिक जाण प्रत्यायास येते. राधारमण यांचे राष्ट्रभक्ती आणि टिळकनिष्ठा निश्चितच प्रामाणिक आणि कौतुकास्पद आहे.

*लक्ष्मणशास्त्री लेले*

लक्ष्मणशास्त्री लेले (जन्म १८७० मृत्यु १९३२) यांनी संस्कृत भाषांतरे करुन पंडितकवींची परंपरा पुढे नेण्याचे कार्य केले. त्यांचे "अबलाविजय " हे स्त्री सामर्थ्याची प्रचिती देणारे स्वतंत्र काव्य उल्लेखनीय आहे.

*वि.वा. भिडे*

विद्याधर वामन भिडे (जन्म १८६१ मृत्यु १९३६) हे पारंपारिक आणि सांप्रदायिक कवि. त्यांची ग्रंथसंपदा विपुल प्रमाणात होती. विशेष करुन " अर्थालंकाराचे निरुपण " आणि मराठीभाषेचा " सरस्वतीकोष". त्यांचे काव्य एकूण आठ संग्रहात समाविष्ट आहे. "राघवीय परिवाह", "मंदारमंजिरी", "गजेन्द्र मोक्ष", "रथरुपक", "जीव-जागृती", "आनंदाची मूर्ती", "कमळीची सुटका", "पिलाजी आणि शिवाजी". भिडे यांनी ऐतिहासिक, सामाजिक, स्फुट, गद्य, पौराणिक अशा विविध विषयांवर लेखन केले.

*ब.ज.करंदीकर*

बळवंत जनार्दन करंदीकर (जन्म १८५५ मृत्यु १९०३). हे कविवर्य विनायक यांचे मोठे बंधु होते. कवीचे " प्रेमलेख" हे विरहकाव्य त्याकाळी लोकप्रिय ठरले. त्यांनी "गंधर्व", " रमाकांत", बळवंत अशा विविध टोपणनावाने लेखन केले.

*पु.बा.जोशी*

पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी (जन्म १८८० मृत्यु १९२९). यांनी मुख्यत्वे ऐतिहासिक काव्य लिहिले. यांची कविता पारंपारिक आणि क्लिष्ट होती. तत्कालीन कवींमधे ते परंपारावादी आणि शिस्तबध्दतेसाठी प्रसिध्द होते.

*द.भि. रणदिवे*

दत्तात्रय भिमाजी रणदिवे (जन्म १८८० मृत्यु १९२९) हे जुन्या वळणाचे कवि असले तरी त्यांची कविता प्रगतीशील आणि वैचारिक होती. त्यांच्या रचनेतून ते सुधारणावादी असल्याचा प्रत्यय येतो. कवीचे उल्लेखनीय काव्य म्हणजे "नवयुगसंदेश". रणदिवे यांनी खंडकाव्य, स्फुट, काव्य, लेख, कथा, कादंबरी, विनोदी असे विपुल लेखन केले. अनेक नियतकालिकेतून आणि मासिकातून त्यांचे साहित्य प्रसिध्द झाले." प्रभंजन" य टोपणनावाने त्यांनी विनोदी व उपहासात्मक साहित्य लिहिले. कोल्हापूरचे श्री शाहू छत्रपती त्यांचे स्नेही होते. त्यांच्या मृत्युपश्चात कवीने "अश्रुकुसुमांजली" या दीर्घकाव्यातून श्रद्धांजली लिहिली . "कुलभूषणदेशभूषणचरितसुधा", "गजकुमारचरित", "साध्वी नीली", "नाइकांचे बोल", "पाटिल निवळले",आणि "वर्णाश्रमविलाप" ही त्यांचे खंडकाव्य आहेत. " राष्ट्रीयजीवन", " मनोरमा", या कादंबऱ्या अणि "पुनर्जन्म", " डॉक्टरचा कांदा" हे प्रहसने आहेत.

*न.शं.रहाळकर*

नरहर शंकर रहाळकर (जन्म १८२२) हे केशवसुतांचे पहिले शिष्य, केशवसुतांकडून प्रेरीत होउन काव्यलेखनास आरंभ केला. पुष्पांजली हा त्यांचा कव्यसंग्रह. मात्र सन १९०४ व्या सुमारास त्यांनी साहित्यप्रवास एकाएकी थांबविला. त्यांच्या शेवटच्या काव्यातील "माझे गाणे" या रचनेतील या ओळी :

ह्लदयीची तारा, ज्या दिवशी तुटली

त्या दिनी कविता, मज विटली

जाहले मूक जरी गान

ह्लदय परि, पिळते आतून

*सुमन्त*

अप्पाराव धुंडिराज मुरतुले.(जन्म १८८१ मृत्यु १९३९) हे एक प्रगतीशील कवि. "जुन्या वळणावर नवे विचार" अशी त्यांची कविता होती. त्यांचे उल्लेखनीय काव्य म्हणजे त्यांचे आत्मपरकाव्य "माझे दुर्दिन". मेघदुताचे " गुप्तसंदेश" हे भाषांतर आणि "कन्यादानफल" हे स्वतंत्र काव्य. कवीचे स्फुटलेखन "मौक्तिकमाला" आणि "भावनिनाद" यातं समाविष्ट आहे. तर "शिवाजीची सुटका", आणि "शीलासामर्थ्य" हे नाटकं, कोल्हापूरचे शाहूमहाराजांनी त्यांना " कविमौक्तिक ही पदवी बहाल केली होती. तर करवीरमठातील शंकराचार्यांनी त्यांना " कविकुंजर" ही पदवी बहाल केली. रविन्द्रनाथ टॅगोरांना जेव्हा नोबेल पारितोषिक मिळाले तेव्हा सुमन्त त्यांच्या भेटीसाठी कलकत्यास गेले होते.

*दत्त*

दत्तात्रय कोंडो घाटे (जन्म -----, मृत्यु १३/३/१८९९. दत्त एक राष्ट्रप्रेमी, निसर्गप्रेमी,प्रणयप्रधान कवितांचे रचयिते. त्यांचे काव्य अनुपम बालसृष्टी साकरते. ताई गुणाची माझी छकुली या रचनेतील या ओळी:

ताई गुणांची माझी छकुली

झोकां दे दादा म्हणू लागली

"सांभाळ ताई, फांदी वाकली"

दोही दोरींना गच्च आवळी

दत्त यांच्या प्रणयप्रधान रचनेत कधी आशा कधी निराशा, कधी उत्कट रत कधी गंभीर अशा अनेक छटा अनुभवायला मिळतात."आकाशातील घारीस" या रचनेत उंच उडणाऱ्या घारीला ते प्रश्न करतात:

खरे प्रेम नाही, खरा स्नेह नाही

दयालेश माया नसे येथ काही

असे वाटले काय बाई तुला गे

म्हणोनी तुला अंबरी गोड लागी ?

या रचनेतील निराशा आणि इतरांहून दूर जाण्याची इच्छा त्यांची वैयक्तिक होती. दत्त यांचा इंग्रजी साहित्याचा विशेष अभ्यास होता. शेले कवीवर त्यांनी इंग्रजी कविता ही लिहिली होती. दत्त यांचा काव्यप्रवास त्यांच्या अकाली निधनाने फारच लहान ठरला. मात्र त्यांनी जे लिहिले ते निश्चितच अभिनव आणि अलौकिक होते. दत्त यांचे काव्य त्यांचे पुत्र श्री. वि.द.घाटे यांनी "दत्तांची कविता" या संग्रहात संपादित केल्या आहेत.

*ज.के.उपाध्ये*

जयकृष्ण केशव उपाध्ये(जन्म १८८३ मृत्यु १९३७) उपाध्ये यांनी विडंबन काव्याची एक निराळी पध्दत "चालचलाऊ भगवत गीता" त मांडली आहे. कवीने विनोदी तसेच देशभक्तीपर आणि अध्यात्मावर आधारित रचना लिहिल्यात. त्यांचा संतसाहित्याचा अभ्यास त्यांच्या रचनांवरुन प्रत्ययास येतो. लोकमान्य टिळकांच्या विचारांनी प्रेरीत होउन राष्ट्रीयकवितांची निर्मिती केली. उमरखय्यामच्या रुबाया फिट्ज जेरॉल्डच्या अनुवादातून मराठीत आणल्यात. त्यांचे काव्य विविध पैलूंनी नटलेले आहे. स्वातंत्र्याचा ध्यास घेणारे, ढोंगी प्रवृत्तीचा निशेध करणारी त्यांची कविता महाराष्ट्रात लोकप्रिय होती.

पार्थ म्हणे गा ह्रषिकेशी, या युध्दाची ऎशीतैशी

बेहत्तर आम्ही मेलो उपाशी, पण लढणार नाही

कवीची काव्यसंपदा लोकमान्य चरितामृत, पोपटपंची, उमरखय्यामच्या रुबाया आणि घटचर्चा.

*साधुदास*

गोपाळ गोविंद मुजुमदार( जन्म १८८३ मृत्यु १९४९).हे एक परंपरावादी कवी. ईश्वरभक्ती त्यांच्या काव्याचा स्थायी भाव होता. रामकथेवरील त्यांची "वनविहार", "रणविहार", "गृहविहार", ही तीन महाकाव्ये प्रसिध्द झालीत. त्यांनी "कृष्णलहरी" आणि "निर्माल्यसंग्रह" हे श्लोकसंग्रह सर्वसामान्यांसाठी रोजच्या उपासनेसाठी लिहिलीत. त्यांना १९२९ साली सांगलीचे राजकवीपद प्राप्त झाले. त्यांनी अनेक पोवाडे लिहिलेत. "शंखध्वनिमुद्रणालय" हे प्रहसन आणि "कोटणीसबुवांचे चरित्र" आणि "मराठीच्या सजावटी" हे मराठी भाषेसंबधी ग्रंथ दोन भागात प्रसिध्द झाले. "ते पाउल कोणाचे" ही साधुदास यांची सर्वगुणसंपन्न रचना. अतिशय सहज सोप्या भाषेत त्यांनी कुणालाच न उमगणारे गुढ या रचनेत सांगितले आहे.

गगनाच्या अंगणी, उमटते पाउल शुभलक्षणी

नाजुक गोंडस असे कुणाचे सांगा मजला कुणी?

संध्यारांगातूनी, तयाचा तळ दिसतो साजणी
स्वर्गगेसम रेषा दिसती कधी कधी ज्यातुनी

पाउल पडताक्षणी, जाहली तुटातुट पैंजणी
काही अस्ताव्यस्त विखुरले नक्षत्रंचे मणी

काही उरले गुणी, त्यातुनी रुणझुण उठतो ध्वनी
कानी येतो अव्यक्ताच्या तो अवकाशांतुनी

गगनी एके क्षणी, दुज्या ते उठते क्षितिजांतुनी
पाउल दिसते परी तयाचा कोण असावा धनी

*दु.आ.तिवारी*

दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी( जन्म १८८७ मृत्यु १९३९) मराठी साहित्यातील राष्ट्रीय आणि ऐतिहासिक काव्यनिर्मितीत तिवारींचा फार मोठा वाटा आहे. ते शौर्यकाव्याचा झेंडा फडकवणारे आधुनिक कवि होते. "मराठ्यांची संग्रामगीते (१९२०) "आणि "झाशीची संग्रामदेवता (१९२५)" या दोन संग्रहामुळे त्यांची शौर्यकवी म्हणून विशेष ओळख स्थापित

झाली. "शिवबावनी", "महाराणाप्रतापसिंह", "मनोहरलीला" हे त्यांचे ऐतिहासिक खंडकाव्य, "नंदिनी" हे सामाजिक खंडकाव्य.

राष्ट्राच्या कल्याणार्थ कल्याणिनी करी कल्लोळ
ती प्रिय भारत भाग्यार्थ भागिरथि झाली लोल
आर्यांचे बहुनि हाल हालवी मही दिग्गोल
मर्दानी झांशीवाली
परवशता पायाखाली
चिरडून निघे जयशाली
स्वातंत्र्याचा मनि ओढा फेकला तटाहुनी घोडा

या ओळी तिवारींच्या "फेकला तटाहुनी घोडा" या प्रसिध्द रचनेतील आहे. शाहिरी थाटात आणि तडफदार लेखन करणारे तिवारी यांनी "प्रसन्नराधा", "काव्यतुषार", "राधा-माधव", "चंडीशतक", "कविता-वनिता", "शिवप्रताप", "मराठी शिवराजभूषण", "अभंगमाला", "काव्यरत्नमाला-काव्यकुसुमांजली-कुमुद्वती" असे विपुल काव्यलेखन केले. मातृभाष हिंदी असतांना त्यांचे मराठी साहित्यातील काव्यकतृत्व असाधारण आहे.

*वा.गो.मायदेव*

वासुदेव गोविंद मायदेव( जन्म २६/७/१८९४ मृत्यु ३०/३/१९६९) यांच्या रचना वात्सल्य, निसर्ग, दैनंदिन आयुष्यात घडणारे विनोदी आणि कौटुंबिक प्रसंग याभोवती घुटमळतात. त्यांची लहानमुलांसाठी लिहिलेले गीते खुप लोकप्रिय झाली. त्यांचा काव्यप्रवास भावतरंग( १९२९), भावनिर्झर(१९३८), भावपरिमल(१९६०), हे काव्यसंग्रह, सुधा(१९४०), गरिबाची गोष्ट(१९३१) हे खंडकाव्य आणि बागीत(१९३२), शिशुगीत(१९३६),

बालविहार(१९४१) यात अनुभवायला मिळतो. त्यांच्या "गाई घरा आल्या" या रचनेतील या काही ओळी:

गाई घरा आल्या, घणघण घंटानाद

कुणीकडे घालूं साद, गोविंदा रे ?

गाई घरा आल्या, धूळ झाली चहूंकडे

घनश्याम कोणीकडे, माझा गेला ?

गाई घरा आल्या, वांसरें हंबरती

कुणीकडे बालमूर्ती, कृष्ण माझा?

*कवि माधव*

माधव केशव काटदरे ( जन्म ३/११/१८९२-मृत्यु ३/९/१९५८)कवि माधव कोकणचे रहिवासी आणि रविकिरणमंडळाचे समकालीन. या मंडळाच्या आवर्ताबाहेरराहून त्यांनी आपले काव्यकर्तृत्व सिध्द केले. कवीच्या रचनेत प्रामुख्याने कोकणचा निसर्ग, तिथल्या लोककथा,परंपरा, रिती यांचे प्रतिबिंब उमटले आहे. "हिरवेतळ कोकण" या रचनेतील या ओळी:

सह्याद्रीच्या तळी शोभते हिरवे तळ कोकण

राष्ट्रदेवीचे निसर्गनिर्मित केवळ नंदनवन

सन १९२० च्या सुमारातील ऐतिहासिक कवींमधे सावरकर, गोविंद यांच्या नंतरचे महत्वाचे स्थान कवि माधव यांचे आहे. मराठ्यांच्या ऐतिहासिक प्रसंगांची नाट्यमय गुंफण, रेखीवशब्द, मोजके अलंकारिकशब्द त्यांच्या रचनांचा आत्मा आहे. "शनिवारवाड्यापूढे" , "तारापूरचा संग्राम" , "सवाई माधवरांचा मृत्यु" , "पानपतचा सूड" , "मस्तानी" या उल्लेखनीय रचना आहेत.

तुडुम तुडुम हा झडे नगारा

एल्गाराचा देत इशारा

भगवा झेंडा उडे फरारा

एल्गाराचा देत इशारा

या ओळी "तारापूरचा संग्राम" या रचनेतील आहे. कवीच्या इतर काव्य धृवावरील फुले(१९१५),फेकलीली फुले(१९२१) आणि माधविका या संग्रहात समाविष्ट आहे.

*आ.कृ.टेकाडे*

आनंदराव कृष्णाजी टेकाडे ( जन्म १८९०-मृत्यु १९६४) कवि टेकाडे यांची "आनंदगीता" त्या काळी बरीच लोकप्रिय झाली. त्यांच्या रचनांचे वैशिष्ट्ये म्हणजे रचनेची भाषा संस्कृत वळणाची आणि भावनाविष्कारामधे आंग्लछाप प्रत्ययास येते. काव्यगायनेच्या प्रथेचा आरंभ करण्याचा पहिला मान टेकाडे यांचाच आहे. "हा हिंद देश माझा" या रचनेतील या ओळी:

आनंदकंद ऐसा । हा हिंद देश माझा

सत्यास ठाव देइ

वृत्तीस ठेवी न्यायी

सत्यास मानी राजा । हा हिंद देश माझा ॥

*ना. के. बेहरे*

(जन्म १८९०-मृत्यु____) बेहरे यांचा काव्यसंसार "मोत्यांची माळ" या संग्रहात गुंफला आहे. कविच्या रचनांमधे बालगिते, कौटुंबिक आणि वात्सल्यमय रचाना, निसर्ग अशा विविध विषयांवर लेखन केले आहे.

सर्वांचा विश्वास । सहजी बसेल

ऐसे शुध्द शील । ठेवीन मी

देव देश राजा । गुरु आप्तइष्ट

यांशी एकनिष्ठ । राहीन मी ॥

या ओळी कवीच्या "बालवीराची शपथ" या रचनेतील आहे. बेहरे यांच्या रचना नाद, मधुर, कल्पकता यांनी नटलेल्या आहेत. त्यांची "सप्तर्षि" ही राजकीय रचना विवादास्पद ठरली. या रचनेमुळे त्यांच्यावर नोकरी सोडण्याची वेळ आली. काव्यप्रवासातील त्यांचे काव्य निश्चितच मोलाचे आहे.

*नागेश*

नागेश गणेश नवरे(जन्म १८८७- मृत्यु १९६७) नागेश यांच्या रचनांवर संस्कृत भाषेचा विषेश प्रभाव अनुभवायला मिळतो. कवि आधुनिक कवितेचे समर्थक असले तरी त्यांची कविता मात्र जुन्या वळणाची होती. त्यांच्या रचना संवेदनशील आणि प्रवाही आहेत. कव्यातील भाषा संस्कृतप्रधान असली तरी अर्थसुलभ आहेत. कविवर्य "बी" यांनी त्यांच्या सन्मानार्थ "आहे ती ऋचिरा निसर्गमधुरा नागेश वागीश्वरी " ओळी लिहून ठेवल्या आहेत. कवीचा काव्यसंसार वन्यपुष्पे ,प्रणयगुंजन ( खंडकाव्य ), रत्नगुंफा, आणि भावसुक्त यात फुललेला आहे.

आता या पुढती जनी विजनी वा एकांति बैसोनिया

प्रग्जन्मर्जित घोर कर्महीं तसे चित्तांत चिंतोनिया

नेत्रातुन अनंत निर्मुनि झरे दु:खातिरिक्तांबुचे

गंगौधीच तदीयमेलन आता केले मला पाहिजे

या ओळी कवि नागेश यांच्या "धोतराचे फुल" या रचनेतील आहेत.

*ह.स.गोखले*

हरी सखाराम गोखले. ( जन्म १८९४- मृत्यु     )

केशवसुत कवि अवतरला । भाषा धन्य मराठी

उंच त्याचा प्रतापशाली झेंडा फडकत राही

जीवेभावे करी पहारा चरणी एक शिपाई

गोखले यांच्या या ओळींतुन केशवसुतांचे पाईक होऊन काव्यप्रवाह अबाधित रहाण्यासाठी त्यांनी या काव्यप्रवाहात योगदान दिले. त्यांच्या " काहीतरी(१९२५) " या संग्रहात शोषितांबद्दल तळमळ, भक्ती, देशप्रेम, निसर्ग, व्यक्ती वर्णन अशा विविध विषयांचा समावेष आहे.

शुभ्रतेला शुध्द्ता शोभविते

मंदतेने मधुरता सुगंधाते

कसे साधेपणे शोभावी गुणाते

बघुनि घे हे पाहुनी फुलातें

गोखले यांच्या "तगरीचे फुल" या रचनेतील ओळीतून त्यांचे साधेपण, काव्यातील सहजता आणि त्यांचा पारदर्शक स्वभाव प्रत्ययास येतो.

*काव्यविहारी*

धोंडो वासुदेव गद्रे ( जन्म १५/११/१८९४- मृत्यु २२/१/१९७५) कवि आपल्याला केशवसुतांचे अनुयायी म्हणत.

तोर्यात बलिष्ठ असावे

गरिबांनी फुकट मरावे

मत्तांनी त्यां तुडवावे

मामला चालला असाच मागे ; पुढती चालायचा

हा न्याय असे जगताचा

या ओळी कवीच्या "जगाचा न्याय" या ओळींतील आहे. इतक्या वर्षांनी या ओळी मन विषण्ण होऊन जाते. खरचं इतक्या वर्षात ही परिस्थिती मानवाला बदलता आली नाही. साधी पण दमदार भाषा, सरळ स्पष्ट अभिव्यक्ती हे काव्यविहारींचे काव्यविशेष. त्यांचे काव्यसंग्रह काव्यविहार(१९२३), स्फूर्तिलहरी(१९३६), स्फूर्तिनिनाद(१९५०) आणि स्फूर्तिविलास(१९३६).

*अज्ञातवासी*

दिनकर गंगाधर केळकर (१०/१/१८९६ -मृत्यु १७/४/१९९०) हे राजा केळकर संग्रहालयाचे जनक आणि संवर्धक. यांची कविता राष्ट्रीय काव्यपरंपरेतील आहे. यांच्या काव्यात विशेष करुन मराठ्यांचे शौर्य, मराठ्यांचे जीवन याचे चित्रण आहे. "अज्ञातनाद (१९२४)" आणि "अज्ञातवासींची कविता (१९३३)" या दोन संग्रहात कवीचे काव्य समाविष्ट आहे.

शत्रुच्या खड्या समशेरी

वांकती पुणे दरबारी

पेशवे मर्हाटी स्वारी

तळपती तिखट तलवारी

"पुणे दरबारी" कवीच्या या रचनेतील ओळींतून कवीला इतिहासाबद्दल असलेली ओढ आणि श्रध्दा प्रत्ययास येते. आपला इतिहास जतन करुन येणार्या पिढीपर्यन्त पोह्चविण्याचे विशेष कार्य अज्ञातवासींनी केले.

*कुंजविहारी*

हरिहर गुरुनाथ सलगरकर कुलकर्णी (जन्म १०/११/१८९६-मृत्यु १/११/१९७८). हे एक ध्येयवेडे स्वातंत्र्यसेनानी होते. त्यांचे प्रेरणास्त्रोत लोकमान्य टिळक. कवीची कविता राष्ट्रप्रेमाने आणि राष्ट्रवृतीने भारलेली आहे. "भेटेन नऊ महिन्यांनी" ही त्यांची लोकप्रिय रचना. देहदंडाची शिक्षा मिळाल्यानंतर पुन्हा जन्म घेऊन स्वातंत्र्याची ज्योत अखंड ठेवण्याची जिद्द या रचनेत अनुभवायला मिळते.

मनी धीर धरी, शोक आवरी जननी । भेटेन नऊ महिन्यांनी    या न्यायाची , रीत मानवी असते। खरी ठरते, केव्हा चुकते

किती दुर्दैवी, प्राणी असतिल असले । जे अपराधाविण मेले

लाडका बाळ एकुलता

फाशीची शिक्षा होता

कवटाळुनि त्याला माता

अति आक्रोशे, रडते केविलवाणी । भेटेन नऊ महिन्यांनी

या स्वातंत्र्यनिष्ठ राष्ट्रसेवकास शत शत दंडवत.

*आनंद*

विनायक लक्ष्मण बर्वे (जन्म १८९६- मृत्यु १९४८) आपल्या काव्यातून कोकण आणि तिथली संस्कृती रसिकांपूढे शब्दचित्रांतून समर्थपणे मांडली. कोकण आणि निसर्ग सौंदर्य हा कवीच्या कवितेचा आत्मा आहे. कवीच्या "कोकण" या रचनेतील या ओळी:

सह्याद्रीराज उगवत

मावळतीस सागर गात

दर्म्यान डोंगरी प्रांत

शांत त्यावरि वसे कोकण

*ग.ह.पाटिल*

गणेश हरि पाटिल.( जन्म १९/१०/१९०६-मृत्यु 1/७/१९८९) यांचे काव्य ग्रामीण जीवन, तिथली संस्कृती, निसर्ग या भोवती वेढलेली आहे. या सर्वांचे सुरेल वर्णन त्यांनी नागर भाषेत केले आहे. "देव" ही पाटलांची सर्वगुणसंप्पन्न कविता आजही अनेक शाळेत प्रार्थना म्हणून गाण्यात येते.

देवा तुझे किती । सुंदर आकाश

सुंदर प्रकाश । सूर्य देतो

सुंदर चांदण्या । चंद्र हा सुंदर

चांदणे सुंदर । पडे त्याचे

कवीची शब्दसंपदा अनुपम तर आहेच त्याला सहजतेचेची, सरलतेचे, साधेपणाचे तेज आहे. त्यांची काव्यसंपदा

रानजाई(१९३४), लिंबोळया(१९६०), बालशारदा( १९४५), पाखरांची शाळा( १९६०)

*दा.अ.कारे*

दामोदर अच्युत कारे (जन्म ४/३/१९०९-मृत्यु २३/९/१९८५) हे एक गोमंतकीय कवि. यांचे काव्य शांत, संयत, शीतल, कोमल आणि कल्पनाविलासात रमलेले आहे.

वाटते सानुली मंद झुळुक मी व्हावे

घेईल ओढ मन तिकडे स्वैर झुकावे

कारे यांचे काव्य नंदादीप (१९३४) या काव्यसंग्रहात समाविष्ट आहे.

*वि.द.घाटे*

वि.द.घाटे अर्थात विठ्ठल दत्तात्रय घाटे. (जन्म १८/१/१८८५-मृत्यु १/७/१९७८) हे रविकिरणमंडळाचे सदस्य आणि कवि दत्त यांचे चिरंजीव. घाटे यांनी गद्य-पद्य विपुल लेखन केले. प्राचीन संस्कृती आणि इतिहास हा त्यांच्या लेखनाचा आत्मा आहे. त्यांच्या काव्यातून राष्ट्रप्रेम, भक्ती, समाजसुधारक वृत्तीची प्रचिती येते.

आई ! आम्हाला आठवशिल ना

स्वातंत्र्याच्या हिमालयावरी

पुन्हा समाधी घेतांना

अंधारामधि खडा पहारा

देत वेचिला जन्मही सारा

परि शुक्राचा प्रकाश अपुरा

तोहि न दिसला नयनांना

या ओळी कवीच्या "आई! आम्हा आठवशिल नां ?" या रचनेतील आहे. कवीचे काव्य रविकिरणमंडळाने प्रसिध्द केलेले काव्यसंग्रहात अनुभवायला मिळते.

*श्री. रा. बोबडे*

श्रीनीवास रामचंद्र बोबडे(जन्म १८८९- मृत्यु १९३४) कवि बोबडे यांचे काव्य शाहिरी आणि संस्कृत साहित्य परंपरेत बांधलेले आहे. त्यांच्या रचनेत वीररस, करुणरस, हास्यरस, श्रृंगाररस या सर्वांचा अनुभव प्रत्ययास येतो. त्यांच्या उल्लेखनीय रचना म्हणजे "हिंदुस्थाना", "आमचा क्षोभ" या रचनांमधे वीररस तर "आरे! आला कवी?" आणि "मच्छरोक्ती" या रचनांमधे कवीची मार्मिकबुध्दी प्रत्ययास येते. "मृत्युलेख" कवीची करुणरसाने ओथंबलेली आणि ह्दयस्पर्शी रचना आहे. काव्यप्रवाहात कवी बोबडे यांचे योगदान निश्चितच महत्वाचे आहे.

*चंद्रशेखर*

चंद्रशेखर शिवराम गोर्हे (जन्म १८७१- मृत्यु १९३७) असे

कविमनोभवे, सहजसंभवे, स्वामिनी

सुवर्णमय देहिनी, नवरसात्मके, भामिनी

प्रसादमय जिविते, अनुविचार, संचारिणी

चमत्कृति विलासिनी, रसिक सन्मनोहारिणी

या ओळी कवीच्या "कवितारति" य रचनेतील आहे. चंद्रशेखर यांनी सन १८९५च्या सुमारास काव्यलेखन प्रारंभ केले. तो काळ स्वातंत्र्यसंग्रामाचा होता. नवकाव्याला बहर चढत होता. समाजात अनेक विचारधारा रुजत असतांना चंद्रशेखर यांनी काव्यक्षेत्रात स्वतंत्र अस्तित्व

स्थापित केले. कवीच्या बहुतेक रचना प्रासंगिक आणि रुपांतरित आहे. कवीच्या रचना वाचतांना प्रकर्षाने जाणवणारी गोष्ट म्हणजे काव्यात व्यक्त प्रौढ, संमजस आणि तटस्थ भाव. वैयक्तिक भावनाविष्कार क्वचितच त्यांच्या रचनेत आढळून येतो.

तुज ह्रदयंगम रवे विहंगम- भाट सकाळी आळविती

तरु तिरीचे तुजवरि वल्ली पल्लवचामर चाळवित तुझ्या प्रवाही कुंकुम वाही बालरवि जणु अरुणकरी

जय संजिवनी जननी पयोदे श्री गोदे ! भवतापहरी

या ओळी कवीच्या "गोदागौरव" या दीर्घरचनेतील आहे. प्रा. रा.श्री. जोग यांनी या काव्याचा गौरव करतांना "अभिजात रसिकता व भक्तिपरतेचा अभिनव संयोग म्हणजे गोदागौरव" असा उल्लेख केला आहे.

तत्कालीन समीक्षंकांच्या मते कवी चंद्रशेखर यांनी नवकाव्याच्या प्रवाहात काव्यधारा न गुंफता आपली पारंपरिक व प्रचलित शब्दप्रयोगावर काव्यनिष्ठा सिध्द केली. पारंपरिक व नादमधुर शब्दप्रयोजन हा कवीच्या काव्याचा आत्मा आहे. कवी वैयक्तिक भावनांपेक्षा विचारवृत्तीत अधिक रमत असे हे त्यांच्या रचनांमधे प्रत्ययास येते. आपली वैभवशाली आणि भव्य परंपरा दीर्घकाळ टिकून रहाण्याच्या उद्देश्याने त्यांनी रचनांची निर्मिती केली असे म्हटल्यास अतिरेक होणार नाही.

जिच्यावरि वितान हे गगन इंद्रनीलापरि

जिच्या तळपतो शिरी हिमगिरी किरीटापरिस

जिच्यावरि नद्या, झरे, न हि जवाहिरे गोमटी

जिच्या धनवनस्पति परि न पैठणी पोपटी

या ओळी कवीच्या "हिंदवंदना" या रचनेतील आहे.या रचनेत त्यांची राष्ट्रभक्ती प्रत्ययास येते. या रचनेत प्रतिमा भूतकाळातच अडकून आहे. हिंदुस्थानाचे वैभव असेच अबाधित रहावे कवीची ही इच्छा यात प्रचितीस येते.

कवीचे काव्य नवीनतेकडे झुकणारे नसले तरी त्यांना जुन्याचाच ध्यास होता असे  नाही. कवीचे "रंगराव हर्षे"

हे जॉन मिल्टन लिखित "एल. एलेग्रो’ चे रुपांतर आहे. यात त्यांनी दिव्यप्रेमाची करुणकथा मांडली आहे. कवीचे उल्लेखनीय रुपांतर म्हणजे "चिंतोपंत उदास",

"उघडं गुपित", "किस्मतपूरचा जमीनदार" हे गाजलेले कथाकाव्य.

बडोदा संस्थानाच्या या कवीचा काव्यसंसार "चंद्रिका" (१९३२) या स्फूट काव्यसंग्रहात अनुभवायला मिळतो.

*गोविंद*

गोविंद त्र्यंबक दरेकर ( जन्म ९/२/१८७४- मृत्यु २८/२/१९२६)

सुंदर मी होणार, आता सुंदर मी होणार

सुंदर मी होणार ! हो मरणाने जगणार.........

जुनी इंद्रिये, जुना पिसारा, सर्व सर्व झडणार

नव्या तनुचे नव्या शक्तीचे पंख मला फुटणार

त्या पंखांनी कतृत्वाच्या व्योमी मी घुमणार

देशहिताच्या पवनसागरी पोहाया सजणार

या ओळी कवीच्या "सुंदर मी होणार" या रचनेतील आहे. कवीची ही रचना म्हणजे सर्व काव्यगुणांचे आणि काव्यनिष्ठेचे प्रतीक आहे. तत्कालीन समीक्षकांनी या रचनेला "चिरंजीवी स्वरुपाचे एक संजीवनगीत" असे संबोधिले होते.

कवी गोविंद यांचे बालपण दारिद्र्यात गेले. वयाच्या आठव्या वर्षी अपंगत्व आले आणि वडिलांचे कृपाछत्र हरवल्यामूळे बालपण अवेळीच हरपले. प्रतिकुल परिस्थितही त्यांच्या

मार्मिक बुध्दीचा प्रत्यय त्यांच्या स्नेहींना अनेकदा आला. कवीने लावणी लेखनाने आपला काव्यप्रवास आरंभ केला. सन१९०० साली "अभिनव भारत" या क्रांतिकारी संघटनेचा संबंध येता, त्यांच्यातील राष्ट्रप्रेम जागृत झाले. वीरसावरकरांच्या सहवासात ही चेतना उत्तरोत्तर वाढत गेली. त्यांच्या या काळातील वीररसाने भारलेल्या रचनांमुळे त्यांना "स्वातंत्रशाहिर गोविंद" असे गौरविण्यात आले.

देशभक्ती हा कवी गोविंद यांच्या काव्याचा स्थायीभाव आहे. "स्वातंत्र्याचा पण", "स्वातंत्र्याचा पाळणा", "स्वातंत्रदेवी", "स्वातंत्र्यलक्ष्मीस्तव", "रणवीणस्वातंत्र्य कोणा मिळाले?", "भारतप्रशस्ति" या त्यांच्या तेजस्वी रचना खूप लोकप्रिय झाल्यात. ज्येष्ठ साहित्यिक वा.ना देशपांडे यांनी कवी गोविंद यांच्या काव्याला "ज्वालामुखीचा लाव्हा" असे संबोधित "तुकारामाने आपल्या अभंगात जितक्या उत्कटतेने विठ्ठलास आळविले, तेवढ्याच उत्कटतेने गोविंद यांनी स्वातंत्र्यदेवीस आळविले आहे." असा उल्लेख केला आहे.

असा धरि छंद

जाई तुटोनिया भावबंध॥धृ.॥

छंद लागला टिटवीला

सप्तसागर शोषित केला

मौनावतिने कृतार्थ केला॥ गोपीचंद

तीन देह जडमरतांला

रावण रामरुप तो झाला

गोपी चढल्या वैकुंठाला॥ यशोदानंद

कवी गोविंद यांची काव्यभाषा सहज, सोपी व मोजक्या शब्दात मोठा आशय व्यक्त करणारी होती. कवी गोविंद यांची ज्वलंत कविता इंग्रजांनी जप्त केली. सन १९०९ ते १९१७ पर्यन्त कारावासामुळे त्यांचे काव्यलेखन खंडित झाले. सन१९१७ नंतर मात्र कवीने अध्यात्मिक रचना लिहिण्यास आरंभ केले. कवीची कविता प्रेमनिष्ठ, राष्ट्रनिष्ठ, ईश्वरनिष्ठ होती. प्रतिकुल

परिस्थितीत अपंगात्वावर मात करुन काव्यसामर्थ्याची प्रचिती देणाऱ्या स्वातंत्र्यशाहिरास शतशत प्रणाम.

*ए.पां. रेंदाळकर*

एकनाथ पांडुरंग रेंदाळकर ( जन्म १/७/१८८७-मृत्यु २२/११/१९२०) मराठी कवितेच्या रमणिकयुगातील(रोमँटिक) एक महत्वाचे कवी म्हणजे रेंदाळकर. या कवीच्या वाटेला किर्तीपेक्षा उपेक्षा अधिक आली. कवीची कविता एवढी गाजली नाही जेवढे कवी समिक्षकांमुळे गाजलेत. याला जवाबदार अर्थातच त्यांचे अस्थिर वैयक्तिक जीवन आणि या अस्थिरतेमुळे जीवनाकडे त्यांचा दृष्टीकोन निराशेकडे झुकलेला आढळतो.

प्रेमासाठी वेडा झालो! मिळेल ते कोठे मजला?

भ्रमुनी गेले मन हे माझे, द्या हो कोणी प्रेमजला

वणवण फिरलो माळावरती गिरीशिखरेही लंघियली

शिलाखंड तुडविले पदतली श्रांत विकल ही तनु झाली.

या ओळी कवीच्या "प्रेमासाठी' या रचनेतील आहे. खऱ्या प्रेमाच्या शोधात या ओळी कवीच्या अतृप्तेची जाणीव करुन देतात.

नाहीच कधी गाणार ? हा आता निश्चय केला!

नक्षत्रे मग ही गगनी व्यर्थ का अशी चमचमती?

का दडुनी पानाआड लाजुनी फुले ही हसती?

का फेकित मंजुळ सूर पाखरे नभी भिरभिरती?

भ्रूभंग करित का यमुना

थबकली विसरुनी गमना?

जाहले काय सर्वांना?

मोडावा निश्चय माझा     दिसते हा बेतच झाला!

या ओळी कवीच्या "नाहीच कधी गाणार" या रचनेतील आहे. कवीचा मानस भोवतालच्या सृष्टीसौंदर्याने भारावून गेला आहे, मन उदास असतांना कविता न लिहिण्याचा त्याचा निश्चय मोडण्याच्या बेतात असल्याचे या ओळीत प्रत्ययास येते.

रेंदाळकरांचा काव्यसंसार विपुल प्रमाणात आहे. कवितेसोबत त्यांनी करमणुक, मनोरंजन, कवितारति,धर्मविचार, काव्यरत्नावली, विविधज्ञानविस्तार, अशा अनेक तत्कालीन गाजलेल्या मासिकांमधे विविध विषयांवर लेखन केले. मात्र काव्यरत्नावलीत आनि विविधज्ञानविस्तार यात त्यांच्या निर्यमक रचनांवरुन बरेच वाद झालेत. निर्यमक काव्यप्रयोग यामुळे ते चर्चेत आलेत. रेंदाळकरांचे जसे विरोधक होते तसेच अनेक समर्थक ही होते.

रेंदाळकरांच्या रचनांमधे विचारवृत्ती, व्यापक अनुभुती आणि दृष्टीकोन, विषयातील विविधता प्रत्यायास येते.

त्यांची "प्रबोधन" ही कविता त्यांच्या काव्यगुणांचे प्रतीक आहे.

उघडि नयन ! रम्य उषा हसत हसत आली !

अरुणकिरणमय वसना अवनी ही ल्याली !

मंजुमधुर गान करित

आनंदे भुवन भरित

विहंगवृंद गगनी उडत

या सुरम्य काली १

उघडि नयन ! रम्य उषा हसत हसत आली !

आपले वादग्रस्त आयुष्यात शेवटच्या क्षणापर्यन्त त्यांना निराशा घेरुन होती. अखेरच्या दिवसात लिहिलेल्या त्यांच्या या काही ओळी:

काय निरुद्देश सर्व जीवन मम होते,

मरुसरितेपरि अवचित झरुनि जायचे तें?

पुरे! पुरे ही असली

मुशाफिरी आतां

या धूळित दगडावर टेकलाच माथा ?

ऐन तारुण्यात क्षयरोगाने ग्रस्त, विफल आणि निराश आयुष्याचा वयाच्या तेहतीसाव्या वर्षी निरोप घेतला.

त्यांची साहित्यसेवा निशितच मोलाची आहे.

कविवर्य विनायक अर्थात विनायक जनार्दन करंदीकर(१५.०९.१८७२ ते ३०.०३.१९०९)

केशवसुतांचे समकालीन कवि,यांचा जन्म १५ सप्टेंबर १८७२ मध्ये धुळे येथे झाला. इतिहासाबद्दल अभिमान त्यांच्या कवितीतील शब्दाशब्दातून प्रत्ययास येतो. तसेच पारतंत्र्याची चीड व तत्कालीन परिस्थितीबद्दल उद्वेग त्यांच्या कवितेत तीव्रतेने जाणवतो. यांच्या राष्ट्रीय कविता प्रेरणादायी व लोकप्रिय ठरल्या.

देशभक्ता प्रासाद बंदिशाला

शृंखलेच्या गुंफिल्या पुष्पमाला

चिता सिंहासन शूल राजदंड

मृत्यु दैवत दे अमरता उदंड

# युगप्रवर्तक

केशवसुत अर्थात कृष्णाजी केशव दामले. यांचा जन्म १५मार्च१८६६ रोजी रत्नागिरीजवळ मालगुंड या गावी झाला. त्यांचे वडील केशव विठ्ठल दामले अर्थात केसोपंत हे चिपळूणला सरकारी शाळेत शिक्षक होते. त्यांच्या मतोश्री चिपळूणजवळील मालदौली गावाच्या होत्या. या दांपत्याला सहा मुलं व सहा मुली अशी एकूण बारा अपत्य होती. केशवसुत अर्थात कृष्णाजी हे चवथे अपत्य. कोकणात खेड येथे शिक्षण घेत असतांना त्यांना जुन्या कविता, पोथ्या-पुराणं वाचण्याचा छंद लगला. हा छंद उत्तरोत्तर वाढत गेला आणि हेच साहित्याचे बीज त्यांच्यात रुजले, अंकुरले, फुलले, बहरले आणि केशवसुत हा काव्याचा माहावृक्ष साहित्याच्या प्रांगणात बहरु लागला.

केशवसुत, एकूण चाळीस वर्षाच्या आयुष्यात संपूर्ण एकोणीसावे शतक तोलून धरणारा सर्वश्रेष्ठ कवी. आधुनिक कवितेचा उदयबिंदू ठरलेले केशवसुत स्वत:बद्दल फारशा खाणाखुणा न सोडता काव्यक्षेत्र प्रकाशमान करुन गेले. केशवसुतांच्या काव्याचे आजवर जे अवलोकन झाले, तेवढे कोणा कवीच्या काव्याचे झाले नसावे. ते नि:संदेह युगप्रवर्तक कवी होते, पण ते युगप्रवर्तक का ठरले?

केशवसुतांनी सन् १८८५च्या सुमारास काव्यलेखनास आरंभ केला. त्यावेळी कविता लोकविन्मुख होत होती. लोकजीवनापासून दुरावल्यामुळे ती एका जुन्या-नव्या वळणावर बराच काळ घुटमळत होती. पारंपरिक विषय, ठराविक वृत्त या बंधनात गुंतलेल्या कवितेला केशवसुतांनी मोकळे केले. व्यवहारी व रोजच्या जगण्यात मोठा आशय दडलेला असतो, तसेच वैयक्तिकतेचा आविष्कार काव्याची सहज व स्वाभाविक वृत्ती आहे, हे विचार रुजवून इंग्रजी वळणाच्या, मराठी नव-कवितेच्या नवप्रवाहाची निर्मिती केली. एवढेच नाही तर प्रचलित प्रतीक व प्रतिमांना सामान्यत्व देत नव्या रुपात कविता सर्वसामान्यांपुढे प्रस्तुत केली.

केशवसुतांच्या अथक प्रयत्नांमुळे कविता पुन्हा जनमानसात रुळु लागली. म्हणुनच तत्कालीन काव्यसमीक्षांनी त्यांना "आधुनिक कवितेचे जनक" आणि युगप्रवर्तक कवी म्हणून गौरविले.

इतर कवींप्रमाणेच केशवसुतांनी इंग्रजी कवितेच्या भाषांतराने आपल्या काव्यलेखनास आरंभ केला. थोडेबहुत संस्कृतमधील भाषांतर करीत स्वतंत्र लेखनास सुरवात केली. विद्यार्थी असतांना त्यांनी बलिभद्र नावाचे नाटक लिहिले होते. त्यांच्या प्रारंभीच्या भाषांतरीत काव्यात "रघुवंश" आणि "किरातार्जुन" यांच्या सर्गातील काही श्लोकांचे भाषांतरे आहेत. नंतर त्यांची इंग्रजी काव्याची भाषांतरे अधिक आढळून येतात. भाषांतर करता करता त्यांचा इंग्रजी साहित्याचा विशेष करुन इंग्रजी काव्याचा अभ्यास व्यापक होत गेला. याचा परिणाम साहाजिकच त्यांच्या लेखनशैलीवर आणि भाषेवर होत गेला. इंग्रजी काव्यातील मध्यवर्ती कल्पनांचा आधार घेऊन त्यांनी बऱ्याच रचना लिहिल्या. यात उल्लेखनीय रचना म्हणजे "दोन बाजी" ही कवी व्हिक्टर ह्यूगो यांची "नेपोलिअन पॅटीट" या धर्तीवरची असून यात व्यक्त आवेश, संताप मनाला चटका लावून जातो:

त्या शुराने भगवा झेंडा हिंदुस्थानी नाचविला

निजराष्ट्राचे वैभव नेले एकसारखे बढतीला....

आणि तुवारे! त्वां नीचाने पाठ आपुली दावुनिया

रणातुनी पौबारा केला, शेपुट भ्याडा वळवुनिया!

(१६/२/१८९५)

इतर उल्लेखनीय रचनांमधे "घड्याळ" हे कवी लॉंगफेलोचे अनुकरण, एक नवा रचनात्मक प्रयोग आणि मोजक्या शब्दातले प्रबोधन ठरले. या रचनेच्या शेवटच्या ओळी :

वार्धक्य जर सौख्यात जावया

व्हावे, पश्चाताप नुरुनिया,

तर तरुणारे! मला वाटते

ध्यानी आपुल्या सतत आण

घड्याळ जे हे अविरत वदते-

आला क्षण-गेला क्षण

(३/१२/१८९५)

कवीची "घुबड" ही रचना कवी पोच्या "रेव्हन" या रचनेच्या मध्यवर्ती कल्पनेवर आधारित आहे. तर "सतारिचे बोल" ही कवी ड्रायडन यांच्या "अलेक्झंडर्स फीस्ट ऑफ द पॉवर ऑफ म्युझ़िक" या रचनेच्या मध्यवर्ती कल्पनेवर आधारित आहे.

काळोखाची रजनी होती.

हृदयी भरल्या होत्या खंती;

अंधारातचि गढले सारे

लक्ष्य, न लक्षी वरचे तारे;

विमनस्कपणे स्वपदे उचलित

रस्त्यांतुनि मी होतो हिंडत

एका खिडकीतून सूर तदा

पडले-दिडऽदा दिडऽदा दिडऽदा!

"सतारिचे बोल" या रचनीतील या ओळी. मनात दाटून आलेला विषाद उराशी घेऊन कवी आयुष्याचा वाटेवर निघतो, रस्त्यात त्याच्या कानावर सतारीचे सूर पडतात आणि या सूरांच्या नादात त्याची घालमेल वाढतच जाते. अचानक सूर लागावा तसा कवीला आत्मसाक्षात्कार होतो. या आनंदात तो धुंद होतो, या आशयाभोवती गुंफलेली ही रचना. यात कवीचे चित्त पुन्हा समेवर येते तेव्हाचे बोल असे आहेत:

शांत वाजली गती शेवटी

शांत धरित्री शांत निशा ती

शांतच वारे शांतच तारे

शांतच ह्रदयी झाले सारे!

या कवितांतील कल्पना केशवसुतानां जरी स्वतंत्रपणे सुचल्या नसल्या तरी त्यातून विस्तृत मराठी कविता निश्चितच अमुल्य आहे. कवितेत व्यक्त कल्पना जरी परकीय असली तरी त्यात व्यक्त नाद, लय, आशय, अभिव्यक्ती आणि शब्दसंपदा सर्वस्वी केशवसुतांची आहे. आणि इथेच जुन्या-नव्या वळणावर घुटमळणाऱ्या कवितेला एक दिशा मिळाली आणि आधुनिक कवितेचा प्रवास सुरु झाला.

केशवसुतांच्या सुरवातीच्या रचनांमधून त्यांचा एककल्लीपणा, उदासीनवृत्ती आणि भिडस्त स्वभाव प्रत्ययास येतो. "दुर्मुखलेला" या रचनेत ते स्वत:ला उद्देश्यून म्हणतात:

माझ्या दुर्मुखलेल्या मुखामधुनिया, चालावयाचा पुढे

आहे सुन्दर तो सदा सरसवांङ्निष्यन्द चोहिकडे!

तुम्ही नांही तरी सुतादि तुमचे धातील तो प्राशुनी!

कोणीही पुसणार नांहि,"कवि तो होता कसा आननी?"

एका शिक्षकाने त्यांना दुर्मुखलेला म्हंटले त्यावरून त्यांना ही रचना सुचली. या कवितेत व्यक्त स्वसामर्थ्याची कल्पना आणि इतरांसाठी बेफिकीर वृती डोकावून जाते.

त्यांचा विवाह त्याकाळातील परंपरेनुसार वयाच्या पंधराव्या वर्षी सन्१८८१ साली केशव गंगाधर चितळे यांच्या कन्येशी झाला. सन १८८२साली ते बडोद्यास त्यांचे थोरले बंधू श्रीधरपंत यांच्याकडे इंग्रजी शिक्षणाकरिता गेले. परन्तु श्रीधरपंतांच्या अकाली निधनामुळे वर्धा आणि नागपूरला जवळपास एक वर्ष इंग्रजी शिक्षणासाठी वास्तव्यास होते. सन१८८४साली ते पुण्यात आधी सरकारी हायस्कूलमधे नंतर न्यू इंग्लिश हायस्कूलमधे इंग्रजी चौथीत प्रवेष घेतला. ते इ.स.१८८९साली मॅट्रीक झाले. मॅट्रीकनंतर केशवसुत नोकरीसाठी मुंबईला गेले. तिथे त्यांनी "न्यू इंग्लिश स्कूल", "मिशनरी स्कूल", "ज्ञानोदय"च्या कचेरीत अशा अनेक तात्पुरत्या नोकऱ्या केल्या. नोकरी निमित्त सन१८९२-९३ सालचा काही काळ त्यांचा मुक्काम सावंतवाडी येथे होता. त्यांच्या १८९०ते१८९६ च्या मुंबई यिथिल वास्तव्यात अनेक साहित्यप्रेमी मित्रांशी जसे ना.वा.टिळक, वासुदेव बळवंत पटवर्धन, ह.ना.आपटे, कवी गोविंद, गोविंद कानिटकर, न.शं रहाळकर, वासुदेव वामन गद्रे यांच्याशी परिचय झाला. सन्१८९०साली ह.ना.आपटे यांच्या "करमणुक" पत्रात केशवसुतांच्या काव्याला प्रसिद्धी मिळाली. त्यांच्या एकुण ४६कविता करमणुकमधे प्रसिद्ध झाल्या. इथेच त्यांचा मनोरंजनकार काशीनाथ रघुनाथ मित्र, "प्रभाकर", व विद्यार्थी मित्र मासिक"चे संपादक जगन्नाथ भांगले, कवि माधवानुज अर्थात हरी मोडक, कवि विनायक , कवि किरात अर्थात कृष्णाजी लक्ष्मण सोमण, "हिंदु मिशनरी" म्हणून प्रसिद्ध असलेले गजानन भास्कर वैद्द यांच्याशी स्नेह वाढला.

कवीचे रखडत झालेले शिक्षण व बेताची आर्थिक परिस्थिती, भिडस्त-संकोची-मानी स्वभाव यामुळे जीवनात स्थैर्य नव्हते. अर्थार्जनासाठी तात्पुरती शिक्षकी नोकरी केली. परन्तु सतत अस्थिरतेमुळे एक उदासीन व अंतर्मुख वृती त्यांना कायम घेरुन होती. केशवसुतांच्या एकूण रचनांमधे कवि आणि काव्यविषयक रचना विपुल प्रमाणात आहे. कवि-कवितेविषयी त्यांनी विविध दृष्टीकोनातून विचार व्यक्त केले आहे. "कवितेचे प्रयोजन" या रचनेत ते लिहितात:

कालक्रीडित हे बघून रडला, हे व्यस्त काही नसे

प्रौढत्वी निजं शैशवास जपणे, बाणा कवीचा असे.

तर "कविता आणि कवि" या रचनेत त्यांचे विचार असे आहेत:

करुनिया काव्य जनात आणणे

न मुख्य हेतु तदीय मी म्हणे;

करुनि ते दंग मनात गुंगणे

तदीय हा सुंदर हेतु मी म्हणे;

"काव्य कुणाचे?" एक संवादात्मक रचना, यात वाचक मुग्ध होऊन म्हणतो, "ही रम्य फार आहे". कवि म्हणतो, "ते माझे नाही". या कथनावरुन वाचकाच्या मनात संदेह येतो. या संदेहाचे निरसन कवीने असे केले आहे:

नव्हे ऐसेंही! कवी वदे त्याते

"काव्य लिहिले मी खरे,परि माते

शारदेने जो मंत्र दिला कानी,

तसे लिहिले मी-काव्य तिचे मानी!

तर "आम्ही कोण?" या रचनेत केशवसुत लिहितात:

शून्यामाजी वसाहती वसविल्या कोणी सुरांच्या बरे?

पृथ्वीला सुरलोकसाम्य झटती आणावया कोण ते?

ते आम्हीच, सुधा कृतीमधुनिया ज्यांच्या सदा पाझरे

ते आम्हीच, शरण्य,मंगल, तुम्हा ज्यांपासुनी लाभते!

आम्हाला वगळा, गतप्रभ झणी होतील तारांगणे

आम्हाला वगळा, विकेल कवडीमोलावरी हे जिणे!

कवी आणि कवितेशिवाय सामान्यांच जगणं किती निरर्थक आणि नीरस आहे, एवढच केशवसुतांना सांगायचं नाही तर कवीचे अस्तित्व किती महत्वाचे आहे हा त्यांच्या रचनांचा मुख्य उद्देश्य होता. कुठे कुठे हे वर्णन अवास्तव वाटत असले तरी ती तत्कालीन काळाची गरज आहे, असे केशवसुतांना वाटले असावे किंवा मानसिक समाधानासाठी या रचनांची निर्मिती झली असावी.

केशवसुतांना काव्यलेखनातून कुठलाच आर्थिक लाभ झाला नाही. मासिक मनोरंजनाचे संपादक श्री.काशीनाथ रघुनाथ मित्र हे त्यांना अधूनमधून मोबदला देत असे. या मासिकाने केशवसुतांच्या हयातीत आणि पश्चात त्यांची कविता उचलून धरली होती. "करमणूक"चे संपादक श्री हरिभाऊ आपटे यांनी केशवसुतांची कविता सर्वप्रथम पुस्तक स्वरुपात प्रसिद्ध करु असे त्यांनी नोव्हेंबर १९१३च्या अंकात जाहीर केले होते, वैयक्तिक अडचंणीमुळे त्यांनी चारवर्षांनी हे पुस्तक प्रसिद्ध केले.

केशवसुतांच्या "जास्वंदीची फुले" आणि "पारिजातकाची फुले" या रचना काव्यरत्नावली, ऑक्टोबर १९८८ च्या अंकात प्रथमच मुद्रित झाल्या. चार-पाच कविता

वगळता काव्यरत्नावलीत प्रसिद्ध कवीच्या बहुतांश कविता त्यापूर्वीच "करमणूक" आणि "मासिक मनोरंजन" मधे प्रसिद्ध झाल्या होत्या. या कवितांखाली केशवसुतांचे नाव नव्हते. क्वचितच एखाद्या कवितेवर "कृ.के.दामले", "कुणीतरी", "कोणी एक कवि", असे नाव होते. त्यामुळे ही कविता केशवसुतांची आहे अशी ओळख सर्वसामान्यात झाली नव्हती. अशा प्रकारांमुळे प्रारंभी कवीच्या कवितांबद्दल बरेच वाद झालेत. काव्यरत्नावलीकरांनी "केशवसुत" हे काव्यनाव त्यांच्या कवितेसोबत छापण्यास सुरवात केली. नंतर इ.स.१९०० नंतर "मासिक मनोरंजन" यांनी केशवसुत असा उल्लेख करण्यास सुरवात केली. काव्यलेखन सुरु करुन जवळजवळ एक तपानंतर "केशवसुत" हे नाव प्रचलित झाले.

केशवसुतांनी प्रेमविषयक आणि निसर्गकवितेची एक वेगळीच काव्यधारा निर्माण केली. पुराणातील शृंगारकथांव्यतिरिक्त सर्वसामान्यांच्या प्रेमभावनांना कवितेत कुठेही स्थान नव्हते. त्यांनी इंग्रजी कवितेच्या धर्तीवर प्रणयगीतांची निर्मिती केली. त्यात सर्वसामान्यांच्या प्रेमभावना प्रथमच व्यक्त झाल्यात. कवीच्या कवितेतील प्रणय धुंद असला तरी आसक्त नाही. त्यात कुठलाही उन्माद वा उन्मत्तता जाणवत नाही. त्यात पर्स्परावरील दिव्य प्रेमाचे तत्वज्ञान मांडलेले आहे. "प्रणयकथन" या रचनेतील या ओळी:

विसर तर झणी व्यवाहाराला, विसर शहाणपणाला

आणिक वेडी होऊनि वद जें व्हवे या वेड्याला

म्हण मला आपला-प्रिय जिवलग हे मधुरे

वद असे मजवरी प्रेम तुझे ग तारे!

हे काव्य स्न १८९७-९८ च्या सुमारातील आहे. तो काळ स्त्रियांनी प्रेम व्यक्त करण्याचा नव्हता. मुळात हे स्वातंत्र्यच स्त्रीला नव्हते. पण कवीला आपल्या प्रियेकडून या धिटाईची अपेक्षा आहे. तो तिला म्हणतो "शहाणपणा विसरुन मला आपला प्रिय जिवलग म्हण. अर्थात कवीला दोघांचे परस्परावर प्रेम अपेक्षित आहे. "सुन्दरीदर्शन" या रचनेत केशवसुतांना सौंदर्य बघून आनंद झाला आहे, त्या वर्णनात कुठेही उन्माद व्यक्त होत नाही:

वरणया कवनी मला गवसला उत्कृष्ट हा मासला
बुद्धीने असल्या जरी तुजवरी मी लाविले दृष्टीला
आकांक्षा ह्रदयातल्या निकट या आता पहा धावती
त्वन्नामादिक सर्वही समजूनी त्या घ्यावया पहाती!

सौंदर्य बघून कवीचे मन विचलित होत नाही, त्यांचा सौंदर्यतील विवेक शोधण्याच्या प्रयत्नाला काय म्हणावे? केशवसुतांच्या प्रेमगीतांमधे प्रेमापेक्षा वियोगाची उत्कटता अधिक तीव्र असल्याचा प्रत्यय येतो. "स्वप्न" या रचनेतील ओळी:

प्रीतीला विरहीदशा कठीण ही मी फार गाऱ्हाणिली
हंसाचे मग पक्ष ती द्रवुनिया देती मला जाहली

केशवसुतांच्या प्रेमगीतांमधे "प्रियेचे ध्यान", "जरी तू त्यां तेथे असतिस सखे सौख्याद मला", "अपर कविता दैवत", "नाही ज्यापरि डोंगळा", व "प्रयाणगीत" त्यांच्या पत्नीला उद्देश्यून लिहिल्या आहेत.

नाही ज्यापरि डोंगळा कधिही तो गेला झणी साखरे
नाही ज्यापरि चालला कधिही तो मार्जर साइकडे
नाही कृष्ण कधिही ज्यापरि सखे गेला दह्यान्डीप्रत

तैसा येईन मी समुत्सुक गडे तुझ्याकडे चालत!

तर "प्रयाणगीत" रचनेतील या ओळी:

तुजविण मजला कांहि असेना प्रिय या गे जगती

तू मम जिवित, तू मम आत्मा, तू माझी शक्ती

तुजला सिडुनि जाणेम येई,सखे! जिवावरती

परि ओढूनी दूर नेती या, निर्दयी दैवगती!

या रचनेतील शब्द, केशवसुत व त्यांच्या पत्नीचे एकमेकांवर असलेल्या असीम प्रेमाची साक्ष देतात.

केशवसुतांच्या निसर्ग-कविता म्हणजे आधुनिक कवितेला त्यांनी दिलेले एक वरदान आहे. संस्कृत आणि प्राचीन काव्यात प्रासंगिक चित्रांखेरीज स्वतंत्र असे निसर्गवर्णन कुठेच आढळत नाही. काव्यात सहज,सोप्या, भाषेत निसर्गाची अनुभूती प्रथम केशवसुतांनी करुन दिली. निसर्गाचे विविध रुप, त्यातील शक्तींचे वर्णन सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत करण्याची प्रथा कवीनेच सुरु केली. खरे काव्य-खरे सौंदर्य-खरे सामर्थ्य मानवाला निसर्गातून प्राप्त होते हे तत्वज्ञान केशवसुतांचे. निसर्गाचे सूक्ष्मावलोकन, सौंदर्य शब्दातून व्यक्त करतांना कवीने निसर्ग-मानव हा दुवा साधला आहे. "अढळ सौंदर्य" या रचनेतील या ओळी:

म्हणुनि कथितो नि:शंक मी तुम्हाते

असे सुन्दरता अढळ जरी कोठे

तर करी ती सृष्टीत मात्र वास

पहा मोहिल सर्वदा ती तुम्हास

निसर्गातून ज्याने त्याने आपला आत्मानुभव घेऊन त्यात रमणे कवील अपेक्षित आहे. प्रत्येकाला स्वत:ची सौंदर्यदृष्टी असते. ती जागृत करुन स्वत:साठी निसर्गसौंदर्याचा अस्वाद घेणे कवीला अभिप्रेत आहे.

आकाशी ढग हे पहा विखुरले त्यांच्यावरी सुंदर

रंगाच्या खुलती छटा, बघुनि त्या येते स्वचित्तावर

हा मृत्युंगत होतसे दिवस, तन्मस्तिष्क पिंडावरी

येती अक्षयमोक्ष सिन्धुलहरी तेजोयुता यापरि

निसर्गातील रुप-रस-गंध-स्पर्श-नाद यासर्वांमुळे इंद्रियांना प्रतीत होणारी कवीची सौंदर्य अनुभुती इंतरापेक्षा निराळी होती. या ओळीत व्यक्त संध्याकाळच्या वर्णनावरुन कवीची वैचारिक झेप प्रत्ययास येते. आत्मपर, प्रेमकाव्य आणि निसर्गकाव्या प्रमाणेच केशवसुतांची सामाजिक कविता समर्थ आणि स्फूर्तीदायक आहे. सामाजिक कवितांचा अंतरंग-बहिर्रंग सर्वस्वी केशवसुतांचा आहे. त्याकाळी इंग्रजी संस्कृतीची जेमतेम ओळख समाजातील सर्व स्तरांवर पोहचली होती. पाश्चात्य संस्कृती आणि समाजात रुढ परंपरा यात मुक संघर्ष सुरु झाला होता. आपल्या समाजरचनेतील दोष व अन्याय सामान्यांच्या निदर्शनास आणण्यास सुरवात झाली होती. समाजव्यवस्था डळमळत असतांना ती सावरण्यासाठी अनेक समाजकार्यकर्ते धडपड करत होते. या सर्वांचा परिणाम तत्कालीन साहित्यिकांवर होत होता. केशवसुतांची सामाजिक दृष्टी हे सर्व न्याहळत होती. त्यांना निर्दयी वृत्तींची आणि अन्यायाची चीड आली असतां अत्यंत संतप्त आणि तीव्र शब्दात त्यांनी या स्थितीचे शब्दांकन केले आणि तुतारी फुंकली.

रुढी जुलूम यांची दुमर्द

संतानी राक्षसी-हंत हा!

खादाड तुम्हा खातात पहा!

जल्शाचा का समय असे हा?

तुतारिने या व्हा सावध तर!

कवीचा संतप्त भावनांचा उद्रेक "तुतारी", "स्फूर्ती", "नवा शिपाई" यासारख्या तेजस्वी रचनांमधे अनुभवास येतो. "पण लक्षात कोण घेतो? च्या कर्त्यास" उद्देश्यून लिहिलेल्या या रचनेत स्त्री दास्याबद्दल कवीचे तळमळणारे मन प्रचितीस येते. त्यांची समाजहिताची दृष्टी "अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न" आणि "मजुरावर उपासमारीचे पाळी" यात व्यापक होत गेल्याची आढळते. बदलत्या समाजव्यवस्थेत या प्रश्नांकडे केशवसुतांचे लक्ष गेले आणि ते त्यांनी शब्दात व्यक्त करुन सामान्यांपर्यन्त पोहचवले.

केशवसुतांच्या रचनांमधे चिंतनशील व तात्विक रचनांचा समावेष आहे. जीवनातील अनाअकलनीय सत्य शोधण्याचा त्यांचा प्रयत्न "कोणीकडून!कोणीकडे!" या रचनेत केला आहे. आपल्या भोवती घडाणारे पण कधी कधी न उमगणारे हे गूढ त्यांनाही उमगले नाही.

कोणीकडून! कोणीकडे!

"इकडूनि-तिकडे म्हणती गडे!

येथुनि-तेथे, मागुनि पुढे

हे तर नित्यच कानी पडे

पण समाधान का कधी तयाने घडे? जिवलगे

याच पार्श्वभूमीवरील अत्यंत लोकप्रिय रचना म्हणजे "झपूर्झा". अनेकांनी केशवसुतांना तत्वज्ञ कवी म्हंटले आहे. त्यांच्या कवितेत भावनेपेक्षा विचारांना श्रेष्ठत्व दिल्यामुळे त्या तात्विक ठरतात.

सूर्य चंद्र आणिक तारे

नाचत सारे। हे प्रेमभरे

खुडित खपुष्पें फिरती जिथे,

आहे जर जाणे तेथें,

धरा जरा नि:संगपणा,

मारा फिरके, मारा गिरके,

नाचत गुंगत म्हणा, म्हणा-

झपूर्झा! गडे झपूर्झा!

"हरपलेले श्रेय" ही कवीची लोकप्रिय रचना. या रचनेत मनातील उदासीन आणि अस्वस्थ अशी उत्सुकता व्यक्त केली आहे. या रचनेत निराशेचा सूर इतर कवितांपेक्षा अधिक तीव्र असला तरी या संवेदनशील रचनेत विचारांचे प्रतिबिंबही उमटलेले आहे.

किरण झरोक्यांतुनी पडे

अणूंसवे त्यांतून उडे;

परोक्षविषयीं मन माझे

विसरुनियाम अवघीं काजें;

हयगय त्यांची मज जाची

परि न मला पर्वा त्याची

वेडी होउन

बसले अनुदिन

एकच घेउन

मज माझे लाभेल कसें?

न प्रि हरपले तें गवसे!

केशवसुतांचे कविततेतील प्रयोग

केशवसुतांनी लेखनास सुरवात केली तो काळ संक्रमणाचा होता. जुन्या नव्या विचारांचे मंथन सर्वत्र सर्व स्तरावर होत होते या मंथनातूनच आणि मुद्रणाचा प्रसार होताच विष्णु कृष्ण चिपळूणकरांचा निबंधमाला हा वाङ्मयीन आविष्कार तसेच दर्पण, ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश सारख्या नियतकालिके प्रसिद्ध होत होते, देशात 'राष्ट्रसभेची" स्थपना झाली होती. इंग्राजी साहित्य व शिक्षणाच्या माध्यमातून पाश्चात्य साहित्यप्रकारास मान्यता मिळत होती. हे विचारांचे परिवर्तन होत असतांना केशवसुतांनी इंग्रजी कवितांच्या भाषांतराने सुरवात केली, नंतर स्वैर अनुवाद व मध्यवर्ती कल्पनेवर आधारित व नंतर स्वतंत्र काव्यरचना लिहिण्यास सुरवात केली. कवीच्या सुरवातीच्या रचनेत "थडगे" या सारखे पाश्चात्य संकेत आढळातात. नंतराच्या रचनेत मात्र हे संकेत फारसे आढळत नाहीत.

केशवसुतांनी आत्माविष्कारण( एक्सप्रेशन ऑफ इनव्हीज्युॲलिटी) पद्धती ही इंग्रजी साहित्यातून उचलली. त्यांच्या आत्ममग्न कवितेत त्याचा प्रत्यय येतो.

कवितेच्या पायथ्याशी स्थलकालनिर्देश देण्याची प्रथा केशवसुतांनी आरंभ केली. सबजेअक्टीव पोएट्री अर्थात आत्मनिष्ठ कवितेच्य अभ्यासाठी हा निर्देश अत्यंत महत्वाचा ठरतो.

"माझा अंत" या रचनेत केशवसुतांनी एक चरण इंद्रवज्रा, दुसरे चरण उपेन्द्रवज्रा, तसरे उपजाती व चौथा वसंततिलका असे योजून वृत्तवैचित्र्य साधले आहे, मात्र या रचनेत स्वरसंगती साधण्यासाठी सर्व वृत्ताच्यां अखेरीस 'ज'गण व दोन गुरु यांची आवृत्ती कायम ठेवली आहे. जे तत्कालिन कवितेच्या दृष्टीने बंडखोरी होती.

तत्कालीन मराठी काव्य परंपरेप्रमाणे रचनेत दोन व चार चरणांची प्रथा होती, केशवसुतांनी इंग्रजीतील स्टॅन्झा वरुन प्रेरणा घेत रचनेत चरणांची संख्या ३,५ किंवा ७ अशी योजली.

यमक या शब्दालंकाराबाबत केशवसुतांनी रचनेच्या आवश्यकतेनुसार नियम थोडे सैल केले आणि यमक साधले आहे. रचनेत अनुप्रास साधण्याचा अट्टहास न करता अगदी सहजपणे ते साधले आहे. जसे;

हे अप्रतिम प्रिये प्रियतमे,

स्वर्ग धरेला चुंबायाला खाली लवला मजला गमला,

छंद फंद उच्छृंखल आमुचे,

बटरफ्लाय या इंग्रजी शब्दासाठी केशवसुतांनी प्रथम फुलपाखरु हा शब्द योजला, या आधी त्याला चितुर म्हणण्याची प्रथा होती. तसेच गार्ड किंव गार्डियनसाठी पालकदेव वा पालकदेवी हा शब्द हे त्यांनी रुढ केला, मरमेड व मर्मेन साठी त्यांनी पयोदेवी व पयोदेव हे शब्द योजून नव्या शब्दाना मराठीत रुजवले.

इंग्रजीकवितेच्या प्रभावामुळे केशवसुतांच्या कवितेत चेतनागुणोक्ती अर्थात परसोनिफिकेशन विरुद्धगुणन्यास अर्थात कॉन्ट्रास्ट हे नंतरच्या काळात मराठी कवितेच्या प्रगतीच्या दृष्टीने महत्वाचे ठरले. इमरसन, एडगर पो, लॉंगफेलो हे त्यांचे आवडते कवि. यांच्या काव्याने प्रभावित होऊन केशवसुतांनी इंग्रजीतील लव लिरिक हा प्रकार मराठीत आणला, महाराष्ट्रात त्याकाळी हा प्रकार अनोखा व नवखा होता, तसेच याचे स्वरुपही थोडे अस्पष्ट होते. लव लिरिकला पॅशन लिरिकही म्हंटले जात असे. केशवसुतांनी लवलिरिक अर्थात प्रेमगीत या प्रकारास प्रणयगीत (रोमॅंटिक) हे संबोधन उपयुक्त ठरेल. या कवितांना उद्देश्यून कै.वासुदेव बळवंत पटवर्धन यांनी त्यांस आषकाचे वेड असे संबोधले आहे. कवि विनायकांना केशवसुत त्यांच्या स्वैर स्वभाव व काव्यातील उत्कटता बघून महाराष्ट्राचा बायरन असे म्हणत. तर तांबे यांना जीवंतवाणीचे निसर्गकवि म्हणत.

केशवसुतांनी इंग्रजी काव्य भाषांतराने जरी सुरवात केली असली तरी, नंतर अनेक काव्यप्रयोगातून त्यांनी मराठी आधुनिक कवितेचा एक बंध तयार केला. त्यात अत्यंत महत्वाचा काव्यप्रकार म्हणजे सुनीत.

"सॉनेट" हा काव्यप्रकार इटलीचा. पहिले इटालिअन सॉनेट गिआकोमोडो दा सेन्टिनी ( १२३५ ते १२९४) यांनी सादर केले. त्यांनी सुमारे २५० सॉनेटसची रचना केली. नंतर हा काव्यप्रकार दान्ते (१२६५ ते १३२१) आणि गुडिओ कावेन्टी (१२५९ ते १३००) यांनी साहित्यात रुजवला. इटालिअन सॉनेट म्हणजे लिटिल सॉंग. यात १४ ओळींचे बंधन. पहिल्या आठ ओळी(ऑक्टेव- ४ ओळींचे दोन कडवे) नंतर सहा ओळी( सेस्टेट-३ ओळींचे दोन कडवे) सॉनेट मधे यमक आणि गेयता यांचे खुप महत्व आहे.

इंग्लंडमधे अनेक साहित्यिकांनी तो समर्थपणे हाताळला. शेक्सपिअर आणि जॉन मिल्टन यांनी त्याची रुपे निश्चित केली. आणि ते "शेक्सपिअर सॉनेट" व "मिल्टन सॉनेट" या नावे ओळखले गेले. थोडा फार मात्रांचा फरक सोडला तर "शेक्सपिअर सॉनेट" विचारांपेक्षा कल्पनेला प्राधान्य देते तर "मिल्टन सॉनेट" हे विचारांना प्राधान्य देणारे होते.

सुनीत हा काव्यप्रकार मराठीत रुजवला तो केशवसुतांनी. त्यांनी १८९२ पासून सुनीत रचनांचे प्रयोग सुरु केले. प्रथम त्यांनी इंग्रजीसुनीतांची भाषांतरे करुन मराठीत विविध

प्रयोग केलेत.केशवकरणी तर कधी इंद्रवज्रा पण शार्दूलविक्रिडीत हे अक्षरगण वृत्त सुनीतसाठी निश्चित केले. या वृत्तात पूर्वाधात-गंभीरता व कल्पकता तर उत्तरार्धात भावनांचा आरोह अवरोह असे आलटुन पालटुन वापरले. केशवसुतांनी सुनीत च्या निर्मितीसाठी बंगाली कवि मधुसुदन दत्त यांच्या सुनीतकाव्याचाही आधार घेतला मात्र दत्तबाबूंच्या सुनीतला चौदा ओळी-चौदा अक्षरांचे बंधन होते. मात्र केशवसुतांनी त्यात चौदा ओळींचे बंधन तेवढे ठेवले..अक्षरांचे नाही. केशवसुतांना सुनीत हा काव्यप्रकार मराठीत रुढ व्हावा असे मनापासून वाटत असे आणि नंतरच्या काळात रविकिरण मंडळ आणि इतर कवींनी हा समर्थपणे हाताळला.

पुढे सन्१८९७तेसन्१९०४पर्यन्त त्यांचे वास्तव्य खानदेशात होते. धुळयाहून एस.टी.एसची परीक्षा उत्तीर्ण करून ते फैज़पूरच्या शाळेत हेडमास्तर म्हणून रुजू झाले. प्लेगच्या साथीमुळे ते फैज़पूरसोडून धारवाडला मराठी शिक्षक म्हणून रुजू झाले. केशवसुतांच्या आयुष्यातील हा काळ थोडाफार सुखसमाधानात व्यतीत झाला. केशवसुतांचे आप्त आणि स्नेही यांनी केलेल्या वर्णनाप्रमाणे ते स्वभावाने अत्यंत मानी व बाणेदार होते. त्यांची रहाणी अत्यंत साधी होती. ते लांब कोट, धोतर, उपरणे, पुणेरीजोडा व पगडी असा वेष परिधान करत असे. त्यांची उंची पाच फूट,चेहरा वाटोळा, रंग गोरा होता. ते संकोची व मितभाशी होती. केशवसुतांचे चुलतबंधु हरि सदाशिव दामले यांच्या आईची निधनाची वार्ता ऐकून ते हुबळीला गेले असता त्यांना व त्यांच्या पत्नीला प्लेग झाला. ७ नोव्हेंबरला १९०५ रोजी केशवसुत बरोबर आठ दिवसांनी १५ नोव्हेंबर १९०५ रोजी त्यांच्या पत्नीचा मृत्यु झाला. त्यांच्या पश्चात त्यांच्या तीनही मुलींचे संगोपन केशवसुतांचे वडिलबंधु चिंतोपंत व सीतारामपंत यांनी केले.

केशवसुतांच्या काही काव्यातील कल्पना जरी परकिय असल्या तरी त्यांचा गाभा मराठी आहे. केशवसुतांचे चिंतनशील आणि सामाजिक काव्य सर्वस्वी त्यांची आहे, त्यावर कुणाचाच प्रभाव आढळत नाही. केशवसुतांच्या लेखनात भावनांचा आणि विचारांचा, संयम व संतुलन प्रकर्षाने जाणवतो. त्यांच्या विविध प्रयोगातून मराठी कवितेचे स्वरुप व्यापक आणि विस्तृत झाले. केशवसुत आणि त्यांचे काव्य याची कोणाशीच तुलना होऊ शकत नाही.ते एक तेजस्वी व्यक्तिमत्व, ओजस्वी कवी होते आणि आजही आहेत. या लेखाचा शेवट कवीची कल्याण, मुंबई २१एप्रिल१८९१ रोजी लिखित एक इंग्रजी कवितेने केल्यास सार्थ होईल असे वाटते.

# TO A POET

Whenever dark clouds flit apart

To drink sweet Luna's liquid ray:

Wheneverér  high dreams wingup my heart

to tread bright heaven's milky way:

Wheneverér my wither'd tree of life

can blossom forth a charming flower

regarding not Want's cutting knife,

To get it pearl'd in Fancy's shower

And, when by chance the cuckoo free

comes to my bower desolate,

To catch its song and try to be

A song incarnate soon or late:-

Such are my wishes ever sweet:

But sweeter far to find a time

To bend low at a poet's feet,

And, at its source to taste his rhyme!

# शब्दप्रभू

मराठी साहित्यसृष्टीत एक अष्टपैलू हिरा आजही तेजाने झळाळत आहे, तो म्हणजे गोविंदाग्रज अर्थात शब्दप्रभू राम गणेश गडकरी. विनोदी लेखक, कवि आणि नाटककार म्हणून या प्रतिभेने साहित्यविश्वात अदभूत कार्य केले. गोविंदाग्रज अर्थात राम गणेश गडकरी यांचा जन्म २६ मे १८८५ रोजी गुजरात राज्यातील नवसारी गावी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण नवसारी येथे व वडिलांच्या मृत्यु पश्चात चुलत्यांसोबत कर्जत येथे पुढचे शिक्षण झाले. त्यांनी न्यू इंग्लिश स्कूल, पुणे इथून मॅट्रिकची परिक्षा दिली. कवीचे पुढचे शिक्षण फर्ग्युसन कॉलेजमध्ये झाले. याच कॉलेजम्ध्ये कवीने पानपतचा फटका लिहिला. या काळत त्यांनी अफाट वाचन केले. झोपण्यापूर्वी किमान पन्नास पानं वाचावी हा त्यांचा निश्चय होता. काही काळ शिक्षक व पत्रकारिता केल्यावर त्यांनी किर्लोस्कर मंडळात काम केले. या मंडळात राहूनच त्यांनी नाटक, नाट्यटिका, काव्य, काव्यटिका, विनोदीलेखन असे विपुल साहित्यनिर्मिती केली. गडकरी यांचे आवडते नाटककार म्हणजे व्हिक्टर ह्युगो व मार्क ट्वेन, बायरन त्यांचे आवडते कवी होते. चिपळुणकरांचे भाषांतरित मेघदूत त्यांचे आवडते साहित्य. संस्कृतकवि कालिदास रचित शाकुंतलाचा त्यांनी खूप अभ्यास केला होता. त्यांच्या वाचनाबद्दल लिहावे तेवढे कमीच आहे, एकूण बत्तीस वर्षाच्या आयुष्यातील जवळजवळ पंचवीस-सव्वीस वर्षे त्यांनी वाचन केले.

जन्मसिद्ध विनोदी स्वभाव, कोटिबाजपणा, अलौकिक बुद्धी, असामान्य शब्दसामर्थ्य आणि अफाट वाचन यांचा संगम म्हणजे राम गणेश गडकरी. त्यांच्या एकूण बत्तीस वर्षाच्या अल्पायुषात, त्यांची चोवीस-पंचवीस वर्षे वाचनात गेले. गडकरींनी "गोविंदाग्रज या नावाने काव्यसंसारास सुरवात केली. "अल्लड प्रेमास" ही कविता त्यांनी जरी सन १९०९ साली लिहिली असली तरी त्यांचा खरा काव्यप्रवास सन१९११पासून सुरु झाला.

"कुणी मनाचा असेल कच्चा

करील त्याला ही मनशूर

या गाण्याने गाऊनि सूर

केशवपुत्राचा महशूर

गोविंदाग्रज चेला सच्चा"

"दसरा" कवीच्या या रचनेतील शेवटच्या पाच ओळीतून त्यांचे प्रेरणास्थान केशवसुत होते हे सहजच लक्षात येते. आपल्या भोवतालच्या समाजातील अस्वस्थतता बघून कवींने श्री.त्र्यं.सी.कारखानीस, कवी भालचंद्र अर्थात श्री.ग.ना.टिपणीस यांच्या मदतीने आणि केशवसुतांच्या "तुतारी" या रचनेची प्रेरणा घेऊन १९फेब्रुवारी१९११रोजी "तुतारी मंडळा"ची स्थापना केली. मनातील विचार निर्भयपणे प्रकट करण्याचे साधन म्हणून मासिक काढावे असा मंडळाचा मानस होता. केशवसुतांनी फुंकलेली तुतारी सदैव सर्वसामांन्यांना जागृत करत रहावी या उद्देष्यानेच या मंडळाची स्थापना झाले होती.

व्यवहारी जगात रमलेला सर्वसामान्य मानव आणि या मानवाच्या मनात अधेमधे डोकावणारा सुधारणावाद याचे गोविंदाग्रजांनी "एक समस्या" या कवितेत उपहासात्मक वर्णन केले आहे.

"धिग्धर्माला धिग्रुढीला! तेवीस कोटी देवांना

किती बोललो-नको सांगणे! पाठ असे ते सर्वांना

काम कशाचे! धाम कशाचे! एक प्रश्न मग ह्रदयात

"सुधारणा होणार तरि कधी या दुर्दैवी देशात?"

कवीने सन१९१७साली रचलेली ही रचना, पंच्याण्णव वर्षांपूर्वी त्यांना पडलेला हा प्रश्न, देशाची सद्य परिस्थितीचा आढावा घेता, या प्रश्नाचे अस्तित्व आजही जसेच्या तसे वर्तमानात आढळून येते.

गोविंदाग्रजांनी न्यू इंग्लिश स्कूल,पुणे येथून मॅट्रीकची परीक्षा दिली. त्यांचे पुढचे शिक्षण फर्ग्युसन कॉलेजमधे झाले. याच कॉलेजमधे त्यांनी "पानपतचा फटका" लिहिला. या काळात त्यांनी भरपूर वाचन केले. झोपण्यापूरवी रोज पन्नास पानं वाचण्याचा त्यांचा निश्चय होता. काही काळ शिक्षक व पत्रकारिता केल्यानंतर त्यांनी किर्लोस्कर मंडळात काम केले. या मंडळात राहून त्यांनी अनेक नाटकं, नाट्यटीका, काव्य, काव्यटीका, विनोदी लेखन असे विपुल

साहित्यनिर्मिती केली. गोविंदाग्रजांचे व्हिक्टर ह्यूगो आणि मार्क ट्वेन हे आवडते नाटककार तर बायरन हे आवडते कवी होते.

"राजहंस माझा निजला" गोविंदाग्रजांच्या या नाट्यगीताने अवघा महाराष्ट्र हुंदक्यांनी आणि आसवांनी भिजला होता.

हे कोण बोलले बोला? राजहंस माझा निजला

दुर्दैवनगाच्या शिखरी! नवविधवा दु:खी आई!

ते ह्रदय कसे आईचे! मी उगाच सांगत नाही!

जे आनंदेही रडते! दु:खात कसे ते होई

हे कुणी कुणा सांगावे!

आईच्या बाळा ठावे!

प्रेमाच्या गावा जावे.

मग ऐकावे या बोलाला, राजहंस माझा निजला!

हे नाट्यगीत म्हणजे एका नवविधवेचे स्वगत आहे. पतीनिधनानंतर अल्पावधितच तिच्या एकुलत्याएक मुलाचे निधन पहाण्याच प्रसंग तिच्यावर येतो. तीव्र दु:खातील आक्रोश या गीतात कवीने मांडला आहे. करुणरसाने ओथंबलेली कवीची अजून एक रचना म्हणजे "अवेळी ओरडणाऱ्या कोकिळेस".

अवेळ तरिही बोल कोकिळे,अवेळ तरिही बोल!

रात्र पसरली जगतावरती

भुरके काळे मेघही फिरती

वारा वाहे भरभर भवती

बालचंद्रिका घाबरी गोरीमोरी होतं.

दिवसा गाणारी कोकिळा अचानक मध्यरात्री गाऊ लागते. कवीच्या निराश व व्याकुळ मनाला, कोकिळेचा आर्तस्वर भेदून जातो. कवी कोकिळेला विनवणी करतो "अवेळ तरिही बोल". माध्यरात्रीच्या काळोखात कवीच्या अंत:करणातील उदासीनता कोकिळेच्या आर्तस्वरात चिंब भिजऊन गेली आहे.

अवेळ येथे कसली बाई?

दु:ख सांत्वना गा केव्हाही!

अनुकंपेला नियम ना काही!

रित्या मनी या ओत सूर, त्या जाऊ दे अति खोल

कोकिळेच्या आर्ततेत कावी स्वत:साठी सांत्वन शोधतांना दिसतो, ह्रदयात दडलेल्या व्यथांना वाट मोकळी करुन देण्याची ही आगळीवेगळी अनुभुती मनाला भुरळ पाडते. "गुलाबी कोडे" हे कवीचे कल्पनाविलासात रमलेले एक उत्तम कथाकाव्य.

परि पशिमह्रदयिं तांबडे सूर्यबिंब विलसे

कशी रंगली पुर्वा याचे कारन काही नसे

मावळत्या रविकिरणांच्या स्पर्शाने पश्चिमदिशा तांबडीलाल होते, पण पूर्वदिशेस हा स्पर्श न होता ती लाल का होते? एका प्रियेने आपल्या नाथाला केलेला हा प्रश्न. या प्रश्नोत्तरात रंगलेले हे काव्य आणि या काव्यात दंग असलेला नाथ आणि त्याच्या प्रियेचा प्रणय अशी सुरेख-सुरेल गुंफण कवीने या रचनेत केली आहे.

रविबिंबासम चुंबनबिंबचि विलसत या गाली!

सहज तयाची छटा गुलाबी पसरे भवताली.

नाथाचे हे उत्तर ऐकून प्रिया लाजून गुलाबी होते. या रचनेतील अलंकारिक भाषेतील चातुर्य आणि माधुर्य मनाला मंत्रमुग्ध करते.

गोविंदग्रजांच्या कवितेत करुणरस आणि प्रणय जसा आपल्याला मोहून टाकतो तसाच त्यांच्या मार्मिक व विनोद्बुद्धीचा प्रत्यय "विहिणींचा कलकलाट", "चिन्तातूर जन्तू", "आंधळयांची माळ", "हुकमेहुकुम", "काय करावे?" इत्यादी कावितेत येतो.

करमत नव्हते म्हणुनि एकदां असाच गेलो रानी

वसंत का-परि ऋतु दुसरा कधि कुणी पाहिला का वनी.

"हुकमेहुकुम" या रचनेतील या ओळी. केवी एकदा सहज रानात फिरायला गेले असतां, त्यांचे लक्ष झाडावर बसलेल्या पक्षाकडे जाते. ते त्या पक्षास गाणे गाण्यास अनेक विनवण्या करतात. मात्र एवढ्या रम्य वातावरणात, वसंतऋतु असुनही तो पक्षी काही केल्या गात नाही. राग येऊन कवी पक्ष्यास दगड मारणार, तोच त्यांना एक संपादक हटकतो आणि वसंतऋतुवर अठरा-वीस ओळी लिहून लवकर देण्याची तंबी देऊन निघून जातो. तो क्षण वर्णन करतांना कवीने त्याची अवस्था त्या पक्षाप्रमाणे कशी होते ते अतिशय मार्मिक शब्दात सांगितले आहे. संपादकाच्या मुखातून निघालेला शाब्दिक दगड कवीच्या मनावर आणि विचारांवर ओरखडा ओढून जातो. कवितेचा समारोप करतांना कवी म्हणतो:

झाडावरचा पिसाट कवि तो तसाच टाकुनि रानी

चला रसिक हो लांबी रुंदी नीट ठेवूनी ध्यानी

वसंतकाळी त्या वर्णाया वनांतुनी माघारी

गोविंदाग्रज कविश्वराची घरी परतली स्वारी!

केशवसुतांनी रुजवलेला काव्यप्रकार "सुनीत", गोविंदाग्रजांनी यावर आधारित रचनांची निर्मिती करुन या काव्यप्रकाराचा प्रसार तर केलाच, ते केशवसुतांचे सच्चे चेले होते हेही सिद्ध केले. "ती कोण?", "वेडा", "ओसाड आडातील एकच फुल", "हूरहूर" गोविंदाग्रजांच्या या सुनीत रचना खूप लोकप्रिय झाल्यात.

आपल्या रोजच्या जगण्यात स्वत:च्या भाववृत्तीचे प्रतिबिंब दुसऱ्य़ात बघतो अणि आपल्याला त्याचा मोह होतो. ही पडछाया कधे कधी फसवी असते, इतकी की त्याचा मोह

अनावर होतो. त्यावर संयम ठेवणे हे प्रत्येक माणसाच्या स्वभावावर अवलंबून असते. असाच आशय त्यांनी "ओसाड आडातील एक फूल" या कवितेत गुंफली आहे. ओसाड आडातील एक फूल पाण्यात आपलेच प्रतिबिंब बघून त्याच्या प्रेमात पडतो आणि त्या बिंबाचे चुंबन घेण्यासाठी वाकले असता तो त्या पाण्यात विरुन जातो.

पाण्यामाजी गळून पडले ते फूल वेडेपिसे

पाताळात कुठे असेल दडले का प्रेमनिर्माल्य ते?

छे! छे! प्रेममय स्वरुप धरुनी भूतापरी हिंडते

कोठे आज उनाड जे, अजुनही तेथे कधि ते दिसे

ते मेले म्हणुनी उणे न ठरते, मच्चित त्याला भुले

मेलेल्या ह्रदयी मदीय असली वाहीन मेली फुले.

सातत्याने आढळनाऱ्या निराशा आणि उदासीनतेचा अतिरेक होऊन गोविंदाग्रजांच्या काही कवितेत हे औदासिन्य, गूढ-भीषण रुप घेतांना आढळते. याचा प्रत्यय "घुबडास" आणि "स्मशानातले गाणे" या रचनांमधे येतो. कवीने ही रचना लिहिली त्याकाळात समाजात सुधारणावाद व परंपरावाद यात वैचारिक संघर्ष सुरु होता. या संघर्षातील भयाण समाजाचे चित्र कवीने यात रेखाटलेले आहे.

भयाण जागी, भयाण काळी

भयाण वृत्ती होत निराळी

भयाण झाली तों आरोळी

जरा दचकला, कवि तो उठला ऐके देऊनि कान

शांतीची ही स्मशानकारा

सजीवतेला इथें ना थारा

म्हणती मरुनी पडतो वारा!

प्रेम जगाचें, जर हे साचे, कसला मग हा नाद?

समाजातील भिषण अवस्था कवी मनाला अस्वस्थ करते. कवि म्हणून असलेली सामाजिक जवाबदारी पार पडण्याची आपली वेळ आली आहे हे जाणून, सुधारणेच्या नावाखाली सोयीनुसार बदलेल्या परंपरा व यात बदलणारी सर्वसामान्यांची मानसिकता रेखाटून समाजाचे वास्तववादी चित्र समाजापुढे ठेवण्याचे कवीचे प्रामाणिक प्रयत्न खरच स्तुत्य आहे.

म्हणे वरुनि जगं दिसते सुंदर

राम जाणितो क्या है अंदर

स्मशानातले गाणे सत्वर

अमोल म्हणुनी, टाकि उधळूनी चहूकडे जगतात.

या ओळीत व्यक्त "राम जाणतो क्या है अंदर" यात नमूद "राम" म्हणजे प्रत्येक माणसात जागृत असलेली सद्सद्विवेकबुद्धी कवीला अभिप्रेत आहे. वरवर आपण व्यक्त होत नसलो तरी आपली सद्सद्विवेकबुद्धीस खरे काय ते ठाऊक असते. नेमके हेच कवीला इथे सांगायचे आहे. आपल्यातील कृतीशून्यता टिपण्याचा नेमका प्रयत्न कवीने केला आहे. या परिस्थितीला जवाबदार धरुन बोभाटा करणारे आणि बुद्धीला पटूनही परिस्थितीशी तडजोड करणारी माणसाची वृत्ती या दोघांकडे कवीने बोट दाखवले आहे.

"मंगल देशा! पवित्र देशा! महाराष्ट्र देशा! प्रणाम घ्यावा हा माझा! श्री महाराष्ट्र देशा" अवघ्या महाराष्ट्राचे हे अभिमान गीत. १मे१९६०रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली, तेव्हापासून प्रत्येक महाराष्ट्रदिन या गीतानेच साजरा होतो. हे गीत म्हणजे गोविंदाग्रजांची महाराष्ट्र आणि त्यांची इतिहासावर असलेली श्रद्धा व अपार प्रेमाचे प्रतीक आहे.

प्रेमसन्यास या नाटकात गोविंदाग्रजांनी स्त्री-पुरुष या दोघांमधील शुद्ध आणि निष्काम प्रेमाची कल्पना मांडली आहे.

तोच आशय त्यांच्या "दिव्यप्रेमाची जाति" या रचनेत व्यक्त केला आहे.

प्रेमविषय अपरंपार
सूक्ष्म-रुप भव्यकार
निरभिलाष तन्मयता ती
दिव्यप्रेमाची जाति
कौतुक, विस्मय, आश्चर्य,
शून्यवृत्ती किंवा सभय
अनेक परिंची
त्या प्रेमाची
रुपें साची
आविष्करणी जाणविती
दिव्यप्रेमाची जाति.

"फुले वेचिली पण...' या रचनेत कवीने प्रेममय मनाची तळमळ व्यक्त केली आहे. तीच तळमळ-तीच आर्तता त्यांच्या "ती कोण?", "हलत्या पिंपळपानास", "पुनर्विकसन", इत्यादी कवितेत प्रकट होते. या रचनांमधील उत्कट भावनाविष्कार आनि तरल शब्दाविष्कार मनाला भारावून टाकतात. कवीच्या अजून उल्लेखनीय रचानांमधे "निर्वाणीची विनवणी", "ह्रदयास", "एका शब्दासाठी विनंती", "निर्दय बालेस", "शेवटचे प्रेमगीत" यात कवीने उत्कट भावनांचे नाट्यमय वर्णन केले आहे.

संशयविष हे जाळीत जीवा अधरसुधा दे रमणि
करी विनवणी निर्वाणाची गोविंदाग्रज वाणी!

"निर्वाणीची विनंती" या रचनेतील या ओळी. प्रेमभंगाच्या भितीने, प्रेयसीला शरण गेलेल्या प्रियकराची ही केवीलवाणी आळवणी आहे. मनातील संशयात दडलेली एक आशा यात सहजपणे व्यक्त केली आहे.

"मुरली" ही गोविंदाग्रजांची प्रीती व भक्ती यांचा संगम साधणारी रचना. राधाची भक्ती मुरलीच्या स्वरात तन्मय झाली आहे. राधेची ही उत्कट प्रीती म्हणजेच भक्तीची शेवटची पायरी हा प्रत्यय ही रचना देऊन जाते.

उरले ना शीत वा उष्ण ॥ काही ना शुभ्र वा कृष्ण

एकरुप राधा कृष्ण ॥

जयनाद गात ही मुरली ॥ कन्हय्या बजाव बजाव मुरली ॥

चहुकडे आता शांत ॥ विश्व शांत, आत्मा शांत ॥

कृष्ण शांत, राधा शांत

मुरलीत शांतता भरली ॥ कन्हय्या बजाव बजाव मुरली ॥

राधा-कृष्णातील भक्ती व प्रीती हे कोडे सोडवण्याचा अनेकांनी प्रयत्न केला आहे. गोविंदाग्रजांनी हे गूढ उकलण्याचा प्रयत्न या रचनेतून केला आहे. राधा-कृष्ण यांच्या भक्ती-प्रीतीकडे बघण्याचा दृष्टीकोन आपण आपला ठरवायचा आहे. कोणाला त्यांच्यातील भक्ती श्रेष्ठ वाटते तर कोणाला प्रीती. आपल्या दृष्टीने हे कोडे सुटल्यावर जे अफाट समाधान मिळते त्याची नेमकी अनुभुती कवीने यात व्यक्त केली आहे.

"पानपतचा फटका" व "कृष्णकाठी कुंडल" या कवीच्या दीर्घ रचना. या रचनांमुळे गोविंदाग्रजांची "सात्विक प्रेमाचे शाहीर" म्हणून एक नवी ओळख कायम केली.

पुरे पुरे हे राष्ट्रविघातक परस्परातील वैर अहो

पानपतची कथा ऐकूनी बोध एवढा तरी घ्या हो

भारतबांधव! पहा केवढा नाश दुहीने हा झाला

परस्पराशी कलह करिता मरण मराठी राज्याला

इतिहास हा केवळ जतन करण्यासाठी वा स्फुरण आणण्यासाठी नसून त्यातून बोध घेणे ही काळाची गरज आहे हे कवी कळवळून सांगत आहे. त्यांना आपल्या इतिहासाचा अभिमान आहे. "पनपतचा फटका म्हणजे युद्ध व युद्धाचे भीषण परिणाम यांचे चित्र समाजापुढे उभे करुन, पुढचा इतिहास रक्तरंजित नसावा हे गोविंदाग्रजांना अपेक्षित आहे.

गोविंदाग्रजांच्या अनेक रचना निराशा आणि उदासीनतेते गुरफटलेल्या आहेत, तर काही नाट्यात गुंफलेल्या आहेत. काही कविता कल्पनाविलासातील एक नवा आविष्कार आहे. थोडक्यात त्यांची कविता म्हणजे कल्पनेच्या महासागरात, भावनांच्या लाटेवर अलगद आशा-निराशेचे तरंग यावे, कधी उदासीनतेची ओहोटी तर कधी प्रेमाची भरती यावी अशी अदभूत आणि अलौकिक आहे. गोविंदाग्रजांच्या रचनांचे महत्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे सर्व रचना भावोत्कट असल्या तरी त्यांचा आशय विचारांवर जाऊन स्थिर होतो. नेमका काव्यातील हा विचार त्यांचे श्रेश्ठत्व सिद्ध करतो. हा तर केवळ गोविंदाग्रजांसोबत काव्यप्रवास होता, राम गणेश गडकरी आणि बाळकराम यांच्यासह प्रवास अतिशय विलक्षण आहे. खरच बालकवी यांनी "नवकवितेच्या जरिपटक्याचा तुलाच अधिकार" या शब्दात दिलेला अधिकार सर्वार्थाने सार्थ आहे.

राम गणेश गडकरी यांनी गोविंदाग्रज या नावे काव्यलेखन बाळक्राम या टोपण नावे विनोदी लेखन केले. "वाग्वैजयंती" हा एकमेव काव्यसंग्रह सन १९२१साली न.चि.केळकर यांनी प्रसिद्ध केला. भावबंधन, पुण्यप्रभाव, एकच प्याला, प्रेमसन्यास, राजसन्यास, हे त्यांचे गाजलेले नाटकं, तर "संपूर्ण बाळकराम" हे विनोदी साहित्य मराठी साहित्यसृष्टीत अजरामर झाले. २३ जानेवारी १९१९ रोजी टी.बी. या रोगाने अवेळी मृत्यु झाला.

## निसर्गकवि

बालकवी हे नाव घेताक्षणी नितळ निळे आकाश, त्यात स्वच्छंद भरारी घेणारी पाखरं, निश्चल पर्वत रांगा, त्यांच्यामधून खळखळ वाहणारे झरे, मेघांचा कापूस, पावसाच्या सरीत भिजलेली गर्द वनराई, शांत रम्य वन, वनात कुंजन करणारे पक्षी, अशी अनेक दृश्ये डोळयापुढे उभे रहातात. बालकवींनी सृष्टीसौंदर्याची विविध रुपे बघण्याची दृष्टी रसिकांना दिली. निसर्गातील सारे सौंदर्य प्रत्येक मराठी मन बालकवींच्या शब्दांतून अनुभवतो असे म्हटल्यास अतिरेक होणार नाही. श्रावणाची चाहुल आजही आपल्याला "श्रावणमासी हर्ष मानसी" या शब्दांत ऐकू येते, आपला आनंद आपण आनंदी आनंद गडे या ओळीतून व्यक्त करतो, आपले जीवन गाणे कुठलेही असले तरी त्याचा उल्लेख आपण "माझे गाणे एकची गाणे" असा करतो, केव्हाही नजरेस पडणारे हिरवे शेत बघून "हिरवे हिरवे गार गालिचे" हे शब्द नकळत ओठावर येतात, एक नाही अशा अनेक ओळी आपल्या जीवनात एकरुप झाल्या आहेत. कदाचित यालाच कवितेचे संस्कार म्हणतात. बालकवींच्या कविता आणी मराठी रसिकाचा गोफ हा असाच अनंतकाळापर्यन्त अखंड रहाणार यात शंकाच नाही.

ऑक्टोबर१९०७ सालचा प्रसंग, जळगाव इथे भरलेल्या एका कविसंमेलनात वि.मो.महाजनी, चंद्रशेखर, अनंततनय, माधवानुज, लोंढे यांसारखे दिग्गज कवींच्या उपस्थितीत सोळा-सतरा वर्षाच्या एका तरुणाने शब्दाश्ब्दातून रसिकांना मंत्रमुग्ध केले, याच तरुणाला अर्थात त्र्यंबक बापूजी ठोमरे यांना "बालकवी" म्हणून गौरविण्यात आले आणि बालकवींचा काव्यप्रवासाला आरंभ झाला. बालकवींना पहिली कविता स्फुरली ती वयाच्या तेराव्या वर्षी आणि ती ही एका फुलबागेत. निसर्गप्रेमातूनच या कवितेचा जन्म झाला होता.

हे फुल या उडत्या स्वर्गातील

माणिक हे बाई झुलते आहे !

हे तान्हे सृष्टीचे गोजिरवाणे

कौतुकली मधुवंदना हसली वदली

बालकवी अर्थात त्र्यंबक बापूजी ठोमरे यांचा जन्म १३ऑगस्ट१८९०रोजी खानदेशातील धरणगाव येथे झाला. एरंडोल, यावल, नगर, धुळे येथे तांचे शिक्षण झाले. बालकवींना लहानपणापासून असलेली निसर्गाची ओढ वयासोबत उत्कट होत गेली. ही उत्कट ओढ वाढता वाढता बालकवींचे सारे लक्ष- सर्व इंद्रिय सृष्टीसौंदर्य या एकाच तत्वावर केंद्रीत होत गेली.

सुंदरतेच्या सुमनावरचे दव चुंबुनि घ्यावे

चैतन्याच्या गोड कोवळया उन्हात हिंडावे

प्रितिसारिका गीत तियेचे ऐकावे कानी

बनवावे मन धुंद रंगुनी काव्यसुधापानी

अंधाराचे पाश मनाचे हे गळुनी जावे

चित्त वाटते तरळ तुझ्यापरि खगबाळा व्हावे.

"अष्टदिशांचा गोफ" या रचनेतील या ओळी. निसर्ग व स्वप्नसृष्टीतील तद्रूपता अशा भारावलेल्या अवस्थेत बालकवींनी अनेक रचनांची निर्मिती केली. "फुलराणी" ही या अवस्थेतील एक सर्वांगसुंदर रचना, आणि याच अवस्थेतील अजून एक उत्तमोत्तम रचना म्हणजे "अरुण" :

उठ कोकिळा, भारद्वाजा! उठ गडे आता

मंगलगानी टाका मोहुनी जगताच्या चित्ता

सरिते! गाणे तुझे सुरामंधि या मिळवी बाई

साध्या भोळया तुझ्या गायना खंड मुळी नाही

पिवळी कुरणे या गाण्याने हर्षोत्कट झाली

गाऊ लागली, नाचू लागली, वेडावुनी गेली

चराचरांच्या चित्ती भरले दिव्याचे गान

मूर्तगान हे दिव्य तयाला गाणारे कोण?

दिव्य गायने, दिव्य शांतता, दिव्याचे झोत

वसुंधरेच्या अरुण ओतितो नकळत ह्रदयात.

हे दीर्घकाव्य एका कल्पनासृष्टीत रमलेले आहे. बालकवींच्या कवितेतील निसर्गाबद्दल लिहायचे म्हणजे ब्रम्हदेवाने

सृष्टी्सौंदर्याची उधळण करायची, बालकवींनी ती शब्दात गुंफायची, त्याच शब्दांतून आपण सर्वांना सृष्टीचे रुप अनुभवायचे इतकी सहज व स्वाभाविक क्रिया आहे. बालकवी नुसतेच शब्दचित्र उभे करत नाही तर त्यात रंग, स्पर्श, गंध, नाद, ताल, सुर, लय यांच्यासह सादर करतात. इथेच कवीचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. निसर्गसौंदर्याच्या स्वप्नसृष्टीत इतके तल्लीन व समरस झाले होते की इतर कुठलेही सौंदर्य त्यांना भुरळ घालु शकले नाही. "औदुंबर" ही कवीची दहा ओळींची कविता म्हणजे निसर्ग आणि जीवनाची सांगड घालणारे अत्यंत सुंदर शब्दचित्र.

ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी घेऊन

निळासावळा झरा वाहतो बेटाबेटातुन

चार घरांचे गाव चिमुकले पैल टेकडीकडे

शेतमळ्याची दाट लागली हिरवी गरदी पुढे

पायवाट पांढरी तयांतुनी आडवीतिडवी पडे

हिरव्या कुरणांमधुन चालली काळया डोहाकडे

झांकळुनी जळ गोड काळीमा पसरे लाटांवर

पाय टाकुनी जळांत बसला असला औदुंबर

ही रचना म्हणजे आशा-निराशा, सुख-दु:खाच्या अनुभवांचा प्रवास आहे. हिरवळ अर्थात स्वप्न हातात घेऊन एक अल्लड प्रवास सुरु होतो, तो बेटांतून, कधी शेतातील पांढऱ्या अर्थात दु:खाच्या पायवाटेवरुन कधी हिरव्या कुरणांमधुन अर्थात सुखाच्यावाटेवरुन, काळया डोहाजवळ अर्थात आयुष्याच्या स्थितप्रज्ञस्थितीपर्यन्त येऊन पोहचतो. आयुष्यातील चिंतन अवस्था शेवटच्या दोन ओळीत कवीन यथार्थ व्यक्त केली आहे.

सृष्टीसौंदर्यात एकरुप झालेल्या बालकवींच्या कवीमनाला मानवी जीवनातील अस्थिरता अस्वस्थ करत असे. हे जग वेदना, निराशा व दु:खाने भरलेले आहे या जाणीवांच्या तीव्रतेमुळे ते व त्यांचे मन मोहमयी जगाच्या नेहमीच दूर गेलेले आढळते. कवीचे प्रत्येक काव्य कल्पनाविलासात हरवलेले आहे. मन-निसर्ग यांची सांगड घालतांना बालकवींची कविता व्यवहारी जगाच्या पाशातून सुटून मोकळी होते आणि एका नव्या विश्वात विहार करतांना आढळते.

तुला बघावे गुंगावे ! गुंगतच चुंबुनि घ्यावे

गुंगतच होऊनि जावे! त्वदाधीन जीवभावे

गुं गुं गुं गुं जोवरती ! जडतेची पडते माती

तरलित हो ह्रदयज्योती! दिव्यसूर श्रवणी येती

मग त्याला धरुनी सोल ! एकेकच गुंफित बोल

"कवीची इच्छा" या रचनेतील या ओळीतून कवीचा मानस प्रत्ययास येतो. कवितेत गुंगुन जाणे हीच त्यांची एकमेव इच्छा होती व त्यातच ते दंग होते.

"तो एक खाणीतील अनगड हिरा आहे" हे कविवर्य विनायकांनी बालकवींना उद्देश्यून काढलेले उद्गार आहेत. कविवर्य विनायकांनी रेव्हरंड टिळक आणि बालकवींची भेट घडवून आणली. उत्तरोत्तर टिळक-बालकवींचा स्नेह वाढत गेला. सन १९१०च्या सुमारास बालकवी टिळकांच्या अहमदनगर येथिल घरी रहाण्यास आले. त्यांच्या नगरच्या वास्तव्यातील अनेक स्मृती लक्ष्मीबाई टिळक यांनी "स्मृतिचित्र" यात टिपल्या आहेत. बालकवी "तुतारी" मंडळाचे सदस्य होते, याच मंडळात त्यांची व गोविंदाग्रजांशी मैत्री वाढली. बालकवींचे

निसर्गप्रेम त्यांच्या स्नेहींना चांगलेच ठाऊक होते. निसर्गाचे अमर्याद सौंदर्य बघून त्यांना कुठलेच भान रहात नसे. कवीचा नगर-पुणे-जळगाव प्रवास सतत होत असे. अनेक तकालीन मासिक, वृत्तपत्र आणि नियतकालिकांमधून त्यांची कविता प्रसिद्ध होत होती. बालकवीच्या लेखनकाळाचा आढावा घेता, तो काळ वैचारिक क्रांतीचा होता. कवीचे समकालीन कवी मित्र तत्कालीन विचारप्रवाहाने प्रेरीत होऊन लेखन करित होते. परन्तु बालकवींची कविता या वास्तववादी परिस्थितीहून अलिप्त होती. समाजातील व्यथा, निराशा, वेदना, अन्याय, अज्ञान, असमता यासारंखे विषयांवर लेखन करणे हा त्यांचा उद्देश्य कधीच नव्हता. आणि तो व्यक्त करण्याचा कणखरपणा त्यांच्या शब्दात नव्हता. कवितेत व्यक्त दु:ख ही बालकवींची वैयक्तिक होती. तत्कालीन परिस्थितीशी बालकवी चांगलेच परिचित होते, परन्तु त्या परिस्थितीचा स्वीकार त्यांनी केला नव्हता किंवा त्यात ते एकरुप झाले नव्हते. वास्तवात जगणे बालकवीच्या स्वभावातच नव्हते. उदरनिर्वाहासाठी अर्थार्जन, अर्थार्जनासाठी करावी लागणारी वणवण या वास्तवात सतत खुणावणारे निसर्गसौंदर्य अशा त्रिविध मनस्थितीत त्यांची घालमेल होत असे. या अस्वस्थ भावनांच्या कल्लोळात अनेक व्याकूळ काव्यांचा जन्म झाला. भावनांचा उद्रेक कवीच्या आत्ममग्न रचनेत प्रचितीस येतो.

कसे हाकारु! शीडाविण दुबळे तांरु?

तुडुंब सागर भरला आहे

दुष्टकाल झंझानिल वाहे

तुफान तेणे खेळत राहे

कसे हाकारु! शीडाविण दुबळे तांरु?

अस्वस्थ अवस्थेत स्फुरलेली बालकवींची सर्वोत्तम रचना म्हणजे "ह्रदयाची गुंतागुत" :

ह्रदयाची गुंतागुत कशी उकलावी?

ही तीव्र वेदना मनामनाची ठावी

ही बुद्धी सांगता मन ऐके ना तीते

हे चित्त वदे ते पटेच ना बुद्धीते

निराशा आणि अस्वस्थता यातून कवीला बाहेर पडता आले नाही, याचा प्रत्यय देणारी ही रचना. या रचनेत स्वत:ला पडणाऱ्या या प्रश्नांचे उत्तर कवी शोधत आहे.

वैराग्य बरा की सुखद बरा अनुराग

परि हाय प्रीतीचे उगाच माझे सोंग

ते कर्म बरे की बरवा कर्मत्याग?

दुर्दैव तसे, मज नव्हे त्याग ना भोग.

अस्वस्थता, निराशा, उदासीनता बालकवींच्या रचनेत वारंवार प्रत्ययास येतात. त्यांच्या एकूण अठ्ठावीस वर्षांच्या आयुष्यात, सुरवातीचा काळ सोडता ही अस्वस्थता त्यांना शेवटपर्यन्त घेरुन होती. परिस्थितीशी सामना करण्याऐवजी ते व त्यांची कविता या अस्वस्थतेत एकरुप होऊन गेली. या अवस्थेत रचलेल्या रचनांमधून त्यांची विषण्णमनस्थिती लक्षात येते.

कोठुनि येये मला कळेना

उदासीनता ही ह्लदयाला

काय बोचते हे समजेना

ह्लदयाच्या अंतर्ह्लदयाला

ही विषण्णमनस्थिती बालकवींच्या काव्यातील सृष्टीसौंदर्य कधीच विद्रुप करित नाही. तर दु:खमय मनाला ती कशी भासतात याचे वर्णन त्यांनी "पाखरास" या रचनेत केले आहे:

पाखरा, गाइले का तुला कधीही न कुणी

नच अश्रु गाळिले कुणी वनी येवोनी

निश्वास धावती सौख्यामागे सारे

दु:खाचा वाली कुणा कुणीही न बा रे!

हे पाखरु म्हणजे कवीने स्वत:साठी योजलेली प्रतिमा आहे. माणसांच्या वनात सारे सुखाच्या मागे पळतांना पाहून त्यांच्या कवीमनाला जगण्यातला व्यवहार खिन्न करतो. त्यांच्या या खिन्न मनाला भोवतालचा आनंद प्रसन्नता देत नाही. उलट मृत्युखेरीज या विषण्णमनस्थितीतून मुक्तता मिळणार नाही ही विकोपाची भावना या कवितेते  कवीने व्यक्त केली आहे. ह्दयाचे स्पंदन थांबताच यातनाही संपुष्टात येतील हा भावाशय या रचनेत गुंफला आहे.

येईल एक परि धन्य दिवस सौख्याचा

जो करिल तुझ्यासह अंत तुझ्या गीतांचा

फिरवून फरारा गोफण तो झाडील

काट्यांवर उपडे भग्न ह्दय पाडील

मग एकच धडकी, एकच अंतिम बोल

बोलून तुझे हे जळते ह्दय निवेल.

बालकवीसारख्या संवेदनशील कवीला प्रेमाने भुरळ पाडली नाही तर नवलच. पण त्यांच्या काही पूर्ण काही अपूर्ण अशा एकूण दोनशे कवितांमधून त्यांची प्रेमकविता शोधणे अवघडच आहे. त्यांच्या ेहाच कवितेतील प्रणय कुठे अल्लड कुठे अतृप्त आहे. देहाची आसक्ती त्यांच्या रचनेत कुठेच आढळून येत नाही. प्रेम हा विषय बालकवींच्या कवितेते वारंवार डोकावला असला तरी त्याला पूर्णत्व प्राप्त झालेले आढळत नाही. कदाचित निसर्गकविता हीच त्यांची प्रेमकविता असावी. "प्रेमाचे गाणे" या रचनेतून त्यांनी प्रेम व्यक्त केले ते असे:

| | |
|---|---|
| प्रेमावाचूनी सर्व सुने | संध्या म्हणो कोणी |
| जग भासे बापुडवाणे | याते मी अक्षय मानी |
| मोठ्या उल्हासे म्हणुनी | म्हणो कोणी 'ती भूल खरी' |
| प्रेमाचे रचितो गाणी | नाही मी म्हणणार परि |
| आकाशी ते | सौख्य मावळे |
| जगी विलसते | दु:ख कोसळे |

दिशात हसते | उदास सगळे
विश्व वेष्टिले प्रेमाने | प्रेम वाटते परि दुणे
प्रेमावाचुनी सर्व सुने {१} | प्रेमावाचुनी सर्व सुने {२}

बालकवींच्या कवितेवर कोणा एका विशेष कवीचा प्रभाव होता किंवा कुणाचे अनुकरण होते महणणे चुकीचे ठरेल. त्यांची कविता सर्वस्वी त्यांची होती. त्यांनी जे जे अनुभवले त्याचे सूर त्यांच्या शब्दातून उमटले. आपल्याच भावविश्वात जरी बालकवींची कविता गुरफटलेली होती, तरी त्यांना तत्कालीन परिस्थितीची जाण जागृत होती याचा प्रत्यय त्यांच्या "धर्मवीर" या रचनेत येतो.

आद्य ॠषींनी जी केली तेजाची पूजा पहिली

ती करणे ज्यां ज्यां लोका ते सारे सावध ऐका

गर्जू द्या हिंदीस्तान, ऐकूनी भासे हे गान

धर्मवीर हिंदीस्तान, देवाचा कलिजा प्राण

"सृष्टीतील सौंदर्य उकलून दाखविण्यासाठीच माझा जन्म झाला आहे. तारकांचे संगीत मला नेहमी ऐकू येते. आकाशाची शोभा आणि जलाशयाची गती, स्थिती यातून मला संदेश येतात ........... " असे बालकवी आपल्या मित्रांजवळ सांगत असे. बालकवींच्या कविता वाचतांना त्यांचा कविस्वभावाची प्रचिती शब्दाशब्दाला येते. बालकवींचे काव्यसामर्थ्य म्हणजे इतरांपेक्षा त्वरेने होणारा निसर्गातील सौंदर्यसाक्षात्कार. हा साक्षात्कार ते हळुवारपणे उकलुन सांगत. ते सांगताना त्यांच्या आत्यंतिक भावनावशता प्रत्ययास येते. त्यांचे मन अतिशय मृदु होते, एखाद्या निरागस बालकाप्रमाणे. अशी मृदु व निरागस व्यक्ति स्वप्नाळू वृत्तीची असतात. कवीच्या रचनेत कुठे कुठे नाजुकतेचा कोवळिकतेचा अतिरेक होतो असे वाटते. परन्तु रचना परत परत वाचल्यावर लक्षात येते की रचनेतील संवेदनशीलता-कोमलता कवितेचा आत्मा

आहे, इथेच त्यांचे श्रेष्ठत्व आणि समर्थता सिद्ध होते. स्वप्नसृष्टीत गुंगुन कल्पनाविलसित रचना हेच कवीचे काव्यविशेष आणि वैशिष्ट्ये आहेत.

बालकवी आणि त्यांची कविता मोजक्या शब्दात सांगणे खरच अवघड आहे. अनेकांनी त्यांच्या रचनांचा अभ्यास करुन ग्रंथनिर्मिती केली आहे. काव्याचा विषय कुठलाही असला तरी बालकवींच्या कवितेला निसर्ग एखाद्या वेलीसारखा बिलगुन असतो. बालकवींच्या संदर्भात उल्लेखनीय कविता, विशेष कविता वैगरे शब्द त्यांच्या काव्यापुढे थिटे वाटतात. सर्वच रचना सर्वोत्तम आहेत.

स्वप्नीही स्वप्ने बघत, स्वप्नातच व्हावा अंत

मरण्याचे स्वप्नही गोड, जगण्याचे स्वप्नही गोड

भासाची सर्वही सुमने, चला चला चुंबित वदने

होईल मग सर्वचि गोड, मरण गोड - जगणे गोड

बालकवींचे हे शब्द खरे ठरलेत. त्यांचे स्नेही श्री सोनाळकर यांची तातडीने निघून येण्याची तार मिळाली, त्याच विचारांत तल्लीन झालेले बालकवी भादली स्टेशनजवळील पायवाटेवरुन चालत होते. आपल्याच विचारात ते इतके मग्न होते की मालगाडीचा गडग आवाजही त्यांना ऐकू आला नाही. रुळ ओलांडतांना मालगाडीचा धक्का लागून त्यांच्या प्राणपाखराने दिव्यत्वाकडे झेप घेतली. एका तल्लीन- तदृप अवस्थेत या निसर्गकवीची इतिश्री झाली.

बालकवीच्या एका अपूर्ण पत्रातील काही वाक्ये :

"एक लहानसे पान घेतले तर त्याच्यावर वाऱ्याच्या अनंत लहरी, सूर्याचे अनंत किरणे, बाष्पाच्या अनंत कणिका, बीजाने त्या अंगी दिलेली बाह्यपदार्थ संग्रहणाची शक्ती, वृक्षावर त्याचे झालेले परिणाम, फांदिला लागलेले आघात इ. अनेक अनंत संस्कार झाले आहेत. हाच किंवा याहिपेक्षा गहन विचार केला तर आपणास मनुष्यत्व व्यक्तित्वाची कल्पना येणार आहे."

अक्षरवेल

"निसर्गकन्या", "सरस्वतीची लेक" या नावाने ओळखल्या जाणार्या बहिणाबाईंचे मराठी साहित्यात विशेष स्थान आहे.यांच्या नवाचा उल्लेख करताच "अरे संसार संसार", "मन वढाय वढाय" "माझी माय सरोसती" ही गाणी सहज ओठावर येतात. बहिणाबाई निसर्गाच्या सानिध्यात रुजल्या, वाढ्ल्या. पावसाने ओलचिंब  झालेल्या मातीचा गंध त्यांच्या मनात दरवळुन तो मधुर शब्दात उमटत असे. मातीच्या सहवासात राहिलेल्या बहिणाबाईंच्या स्वभावात सहाजिकच काळयाआईची सहनशक्ती,कणखरपणा मृदुता हे गुण उतरलेत. त्यांच्या या स्वभावामुळे त्यांच्या रचनेत मातीची ओढ आणि आत्मियता प्रकर्षाने जाणवते. एखाद्या आईच्या मायेन त्यांनी मातीच्या कुशीत बीज अंकुरतांना, रुजतांना, वाढतांना अनुभवलं होतं. त्याचं सहज सोप्या भाषेत शब्दांकन केल :

उन वार्याशी खेयता
एका एका कोंबातून
पर्गटले दोन पान
जसे हात जोडीसान
दंग देवाच्या भजनी
टाया वाजवती पान
जसे करती करोन्या
होउ दे रे आबादानी

जगाचे पोट भरण्यासाठी शेतकरी राब राब राबतो. शेतातील साऱ्या प्रक्रिया आणि पावसाची आतुरतेने वाट पहाणारा शेतकरी सारे काही चित्र रेखावे तसे शब्दात टिपले आहे. शेतकर्यांच्या अपार कष्टांबद्दल त्या कळवळून म्हणतात:

शेतकर्या तुझे हाड

शेतामधी रे मुडले

मुडीसनी झाली राख

तापी माईत पडले.

बहिणाबाईंनी आपल्या काव्यात निसर्ग, शेती इ. सोबत घरात - अंगणात-सुखदुखात- सणवार - संसार यात जे जे अनुभव आले ते सहज ओवींमधे गुंफले. तो काळ स्त्री ने चौकटीत राहून चुलं-मुल-घर सांभाळत जगण्याचा होता. बहिणाबाईंनी याच चौकटीत राहून वैधव्याचे दु:ख पांघरुन आयुष्यातील सारे आघात न खचता सहन केले. आपल्या आयुष्याचा खडतर प्रवास शब्द शब्द ओवीत गुंफून सोपा केला. त्या स्वतालाच धीर देतांना म्हणतात:

देव गेले देवाघरी

आठी ठेयीसान ठेवा

डोयापुढे दोन लाल

रडू नको माझ्या जीवा

रडू नको माझ्या जीवा

तुला रडण्याची रे सव

रडू हासव रे जरा

त्यात संसाराची चव.

जाणारा आठवणी मागे ठेवून देवाघरी निघून गेला, पण बहिणाबाईंनी मुलांकडे बघून बाळाला कुशीत घ्यावे तसे दु:खाला पोटात घेतले. आणि सर्वांना सांगितले:

नका नका आयाबाया

नका करु माझी कीव

झाल माझ समाधान

आता माझा मले जीव

त्या काळी वैधव्याची जाणीव सतत करुन दिली जात असे. अशा स्थितीत एक साधारण स्त्री आयुष्यभर हे दु:ख पेलत कशी जगली असेल? पण या दु:खातून बहिणाबाईंनी स्वताला सावरण्याचा धीटपणा दाखवला. वाटेला येणारी कीव नाकारली. आणि मुख्य म्हणजे या दु:खात गुंतून न पडता मार्गस्थ झाल्यात. जीवनाकडे बघण्याचा त्यांचा दृश्टीकोन या ओवीत स्पष्ट होतो:

फाटी गेल पांघरुन

नको बोचकू रे चिंध्या

झाल गेल पार पडी

नको काढू आता गिंध्या.

बहिणाबाई जरी स्वताच्या दु:खात गुंतल्या नसतील पण सासर-माहेर च्या कोड्यात मात्र गुंतल्या होत्या. या नात्यांची कोडी त्यांनी ओवीत गुंफ्ली आहेत. जेवढी माया त्यांच्या माहेरच्या रचनांमधे आढळते तेवढाच आदर-जिव्हाळा सासरच्या व्यक्तिचित्र साकारणार्या ओव्यांमधी ही अनुभवायला मिळतो.

लागे पायाला चटके

रस्ता तापीसानी लाल

माझ्या माहेरची वाट

मला वाटे मखमल

माझ्या माहेरच्या वाटे

मारे सायंकी भरारी

माझ्या जाययाच्या आधी

सांगे निरोप माहेरी

त्या काळी सासरच्या उंबरठ्यावर पाउल ठेवताच, स्त्रीच्या कष्टांच रहाटगाड अविरत फिरत असे. कष्टाचा हा दिनक्रम त्यांनी "सासुरवाशीण" या रचनेत असा मांडला आहे:

उठ सासुरवाशीन बाई

उठ मघ्घमराती मांड दयन तू नीट

अन चालव बाई घरोट

उठ सासुरवाशीन बाई

उठ रामपहारी डोईवर घे घडा

उठ बांग फुके कोंबडा

उठ सासुरवाशीन बाई

उठ सयपाकाले पेटव पेटव चुल्हा

वर सूर्यबापा आला

उठ सासुरवाशीन बाई

उठ जानं शेतीकामाचा किती घोर

तू गोठ्या मधलं ढोर

उठ सासुरवाशीन बाई

सुरु झाली वटवट कातवली सासू

पुस डोयामधले आसू

उठ सासुरवाशीन बाई

घे सोशीसन घालू नको वाद

कर माहेरची याद.

एका ग्रामीण स्त्रीचे कष्ट्मय जीवन या रचनेत स्पष्ट होते. खरच, कामाच्या या व्यापातून ती स्व:तासाठी किती वेळ देत असेल? अशा या कामाच्या रहाटगाड्यात माहेरची आठवण येण सहाजिकच आहे. एका स्त्रीसाठी सासर-माहेर म्हणजे एकाच नाण्याच्या दोन बाजू आणि या दोन बाजु कुठलाच फरक न करता सांभाळणे हाच तर सुखी संसाराचा मंत्र आहे. माहेरची ओढ प्रत्येक स्त्रीला का असते याचे वर्णन बहिणाबाई "योगी आणि सासुरवाशीन " या रचनेत करतात:

योगी- बसला मी देव ध्यानी

काय मधी हे संकट

बाई बंद कर तुझ्या

तोंडातली वटवट

माझ माहेर माहेर

सदा गानं तुझ्या ओठी

मंग माहेरुन आली

सासरले कशासाठी ?

सासुरवाशीन- अरे लागये डोहाये

सांगे शेतातली माटी

गाते माहेराच गानं

लेक येईन रे पोटी

दे रे दे रे योग्या ध्यान

ऐक काय मी सांगते

लेकीच्या माहेरासाठी

माय सासरी नांदते

देव कुठे देव कुठे

भरसनी जो उरला

अरे उरीसनी माझ्या

माहेरात समावला.

ही रचना केवळ एक संवाद नव्हे. यातील संकेत ओळखणे ही काळाची गरज आहे. काळ बदलला, आज स्त्री विचारांनी आधुनिक आहे, ती आकाशाला गवसणी घालते, अनेक क्षेत्रात उंच भरारी घेते, पुरुषांच्या बरोबरीने पुढे जाते.असे असुनही लेक झाली की आईला-एका स्त्रीला रडू येते हे ल्ज्जास्पद नाही कां? लेकीच्या माहेरासाठी माय सासरी नांदते असे ठसक्यात सांगणार्या बहिणाबाई आणि गर्भात मुलगी असल्याचे कळताच गर्भपात करणारी आजची स्त्री यापैकी खरी सुसंस्कृत माता कोण?स्त्रीच महत्व जोवर स्त्रियांनाच कळत नाही तोवर स्त्रीमुक्तीच्या सगळया व्याख्या निरर्थक आहेत. हे बहिणाबाईनां फार पूर्वीच उमगले होते. मुलासाठी नवस बोलण्याच्या त्या काळात मुलीचे महत्व त्यांच्यातील स्त्रीने जाणले होते. हे जाणून घेण्यासाठी कुठल्याही शिक्षणाची आवश्यकता नाही, हे त्यांनी सिध्द करुन दाखविले.

स्वमनाचा, स्त्रीमनाचा ,काळयाआईच्यामनाचा सहजतेने ठाव घेणार्या बहिणाबाई,समाजातील घटनांचा -घटकांचा तेवढ्याच सहजतेने ठाव घेतात. एकेकाळी प्लेगच्या साथीने जळगावात धुमाकुळ घातला होता, त्याचे वर्णन करतांना त्या म्हणतात:

पिलोक पिलोक

जीव आला मेताकुटी

भाइर झोपड्या

गावामधी मसनवाटी

बहिणाबाईंच्या हृदयात माणुसकीचा झरा खळखळून वाहत होता. म्हणुनच त्यांना इतरांची दु:ख समजून घेऊन शब्दात मांडता आली. त्या काळी खेडयात मनोरंजनाची साधनं फार नव्हती. थकल्या भागल्यां श्रमिकांच रंजन "रायरंग" म्हणजे बहुरुपी गावोगाव फिरुन करत असे. तेच त्याच्या उपजिविकेचे साधन होते. या रायरंगबद्दल त्या म्हणतात:

आला आला रायरंग

करे लोकांचे रंजन

हासवता हासवता

घाले डोयात अंजन

नका म्हनू रे भिकारी

जरा तुम्ही नानावटी

करा गुनांची कदर

हात घाला कनवटी

बहिणाबाई निसर्गाच्या सानिध्यात रुजल्या, वाढ्ल्या. पावसाने ओलचिंब  झालेल्या मातीचा गंध त्यांच्या मनात दरवळून तो मधुर शब्दात उमटला. मातीच्या सहवासात राहिलेल्या बहिणाबाईंच्या स्वभावात सहाजिकच काळयाआईची सहनशक्ती, कणखरपणा मृदुता हे गुण उतरलेत. त्यांच्या या स्वभावामुळे त्यांच्या रचनेत मातीची ओढ आणि आत्मियता प्रकर्षाने जाणवते. बहिणाबाईंची विनोदबुध्दी सदा जागरुक असायची. प्रसंगातले गांभीर्य तसेच ठेवून मार्मिकतेचा प्रत्यय त्यांच्या "नहि दियामधे तेल " या रचनेत येतो.

नहि दिया मधे तेल

कशी अंधारली रात

तेल मिये एकदाच

नेली उंदरान वात

वात केली चिंधुकाची

तेल दियात पडलं

सापडेना आकपेटी

घोड आठी बी आडलं

सापडली आकपेटी

आग्या येताळाची लेक

आली आली हाती काडी

लाडानवसाची एक

शिलगावली रे काडी

जोत पेटली पेटली

अंधाराली ब्याहीसनी

मेली इझीसन गेली

बहिणाबाईंच्या रचना उमलत्या फुलासारख्या आहेत. एक एक पाकळी उमलावी तसे शब्द उमलतात, कडवी उकलतात आणि त्यातील आशय अजून स्पष्ट होत जातो. त्यांच्या काव्यात निसर्ग, शेती,स्त्री-विश्व, स्वानुभाव हे सातत्याने आले असले तरी तत्कालीन सामाजिक स्थितीचा आढावा पण घेतात.त्यांची रचना म्हणजे समर्पक रुपक योजून एका घटनेचे वा प्रसंगाचे विवरण आहे. सहज-सोपी-साधी-ग्रामीण अहिराणी भाषा त्यांचे काव्यवैशिष्टे ."कशाले काय म्हनू नही" ही त्यांची आशयघनाने ओथंबलेली एक आदर्श रचना :

बिना कपाशिने उले

त्याले बोंड म्हनू नही

हरीनामाईना बोले

त्याले तोंड म्हनू नही

नही वार्यानं हाललं

त्याले पानं म्हनू नही

नही ऐके हरीनाम

त्याले कान म्हनू नही

बहिणाबाईंच्या रचनांचे अजून एक वैशिष्ट्ये म्हणजे त्यांच्या बहुतांश रचना आठ अक्षरातच गुंफल्या आहेत. गाणी रचतांना दुसरी ओळ आठ अक्षरातच सुचावी याचे आश्चर्य वाटते. कुठलेही अक्षरज्ञान नसतांना त्यांच्या छन्दबद्द रचना अदभूत आणि अलौकिक आहेत. बहिणाबाईंना असलेले काव्यज्ञान म्हणजे लहानपणापासून कानावर पडलेल्या ओव्या-अभंग. याच आधारवर फुललेला हा अक्षरवेल सात्विक व सोज्वळ ओवीरुपी फुलांतून मराठी साहित्यात आजही दरवळत आहे. या अक्षरवेलीवरील सर्वच फुलांचा गंध शब्दात पकडणे म्हणजे एक एक ओवी प्रत्यक्षात अनुभवणे. प्रत्येक रचना सुबक शब्दातले चिंतन व प्रबोधन आहे. हे काव्यविचार मुद्रणापासून वंचित असल्यामुळे या विचारांचा हवा तेवढा प्रसार झाला नाही याची खंत मनात दाटून येते. हे विचार जर आधीच सर्वत्र पोहचले असते तर कदाचित मुलगी झाल्याचे दु:ख त्याचे पडसाद आज उमटतांना दिसले नसते. बहिणाबाईंची वैचारिक झेप आणि शब्दसामर्थ्य सांगायचे झाले तर कविवर्य बा.भ.बोरकर यांच्या शब्दातले वर्णन सार्थ ठरेल :

"देव तुझ्या ओटी पोटी,देव तुझ्या कंठी ओठी

दशांगुळी उरलेला , देव तुझ्या दाही बोटी

त्यांनी भरवी गे घास, दुधा मोडुनी भाकर

बोलेन त्या अक्षरात, उमटू दे बीजाक्षर "

बहिणाबाईंचा जन्म खानदेशातील जळगावापासुन दोन मैल अंतरावर असलेल्या असोदे या गावी नागपंचमीच्या दिवशी सन १८८० साली महाजनांच्या घरी झाला.त्यांच्या आईचे नाव भिमाई. तीन भाऊ- घमा,गना आणि घना तीन बहिणी- अहिल्या,सीता आणि तुळसा.वयाच्या तेराव्या वर्षी जळगावचे वतनदार खंडेराव चौधरी यांचे पुत्र नथुजी चौधरी यांच्याशी झाला. नथुजी आणि बहिणाबाईंना तीन अपत्ये- ओंकार, सोपान आणि काशी.जळगावच्या प्लेगच्या साथीत ओंकारला कायमच अपंगत्व आले. वयाच्या तीसाव्यावर्षी बहिणाबाईंना वैधव्य आलं. त्यांनी आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत साहित्यसेवा केली. काही रचना काळाच्या ओघात वाहून गेले काही सोपानदेव चौधरी यांनी टिपून घेतले.

निसर्गाच्या मुक्त विद्यापिठात सर्वोच्च पदवी घेउन बहुश्रुत व्यक्तिमत्व असलेल्या बहिणाबाईंनी ३ डिसेंबर १९५१ साली जगाचा निरोप घेतला. १९५२ साली "बहिणाबाईंची गाणी" हे पुस्तक ज्येष्ठ साहित्यिक प्र.के.अत्रे यांच्या प्रस्तावनेसह कविवर्य सोपानदेव चौधरी यांनी प्रकाशित केले.

रविकिरणमंडळ- एक अवलोकन

भाग १

आज मराठी कविता काळाच्या ओघात बदलत किती तरी पुढे गेली आहे. तिचे मूल्यमापन वेळोवेळी होत आले. केशवसुतांच्या काळापासून कवितेच्या बदलत्या रुपाकडे एक दृष्टीक्षेप टाकता विशिष्ट काळात साधारणपणे एका दशकात एक काव्यसंकल्पना विकसित होते, काहीकाळ स्थिरावते, समाजाला झपाटून टाकते, परत ते नवे जुने होऊन जाते, अशाच काव्याच्या प्रदीर्घ प्रवाहात रविकिरणमंडळ नावाचे एक पर्व आले आणि गेले. आजची कविता याच काव्यप्रवाहातील एक धारा आहे, हे विसरुन कसे चालेल. काव्यात बदल कितीही झालेत तरी त्याचे उगमस्थान तर तेच रहाणार. या काव्यप्रवाहातील काव्यकर्तृत्व त्यांच्या स्मृती, त्यांची ओळख काळाच्या पडद्याआड जाण्याअगोदर, त्यांना वाहिलेली ही काव्यांजली म्हणजे "रविकिरण मंडळ- एक अवलोकन."

सन १८८५ च्या उत्तरार्धात आधुनिक कवितेचा जन्म झाला. पहिले आधुनिक कविपंचक म्हणजे केशवसुत-रेव्हरंड टिळक-विनायक-गोविंदाग्रज-बालकवि, या सर्वांच्या सानिध्यात आधुनिक कविता बाळसे धरत होती. या दशकात धुळयातील काव्यकौमुदी मंडळ, दादर(मुंबई) चे गोविंदाग्रज मंडळ आणि पुण्याचे महाराष्ट्र शारदामंदिर मंडळ अशा मंडळांमार्फत साहित्य प्रसार होत होता. तो काळ स्वातंत्र्य संग्रामाचा आणि वैचारिक संघर्षाचा होता. त्याचे पडसाद तत्कालीन साहित्यिकांच्या साहित्यात उमटलेले दिसतात. सन१९२० च्या सुमारास आधुनिक कवीपंचकातील टिळक-गोविंदाग्रज-बालकवी यांच्या निधनाने काही काळ काव्यप्रवाहास ओहोटी लागली होती. याच काळात नवोदित कवी आपआपली कविता जनमानसात रुजविण्याचा प्रयत्न करत होते. एकंदरित वैचारिक क्रांति, समाजसुधारकांचे प्रयत्न, स्वातंत्र संग्राम अशा संभ्रमित वळणावर समाजव्यवस्था उभी होती. या अवस्थेत फार मोठा सामान्यवर्ग पिचल्या जात होता. त्यांच्या भावना, त्यांचा त्याग, त्यांचे वैयक्तिक जीवन, त्यांचे भावविश्व यात कोलमडून गेले होते.

रविकिरणमंडळानी सामान्यांसाठी कविता लिहिली आणि ती सामान्यांपर्यन्त पोहचवली. मंडळातील सदस्यांनी जी कविता लिहिली ती सामान्यांचे भावविश्व, संस्कृतिक जीवन, कौटुंबिक जीवन, त्यांच्या आशा, अपेक्षा यांचे चित्रण करणारी होती. जुन्या व नव्या दोन्ही काळातील मोजके वेचून त्याला नवीनतेची झालर देत एक सकस-सहज-सोपी कविता लोकांपूढे ठेवली. कवितेला "घरपण" देत ती लोकप्रिय केली. यातून सामान्यांचा फार मोठा रसिक वर्ग तयार झाला. या मंडळामार्फत सर्वसामान्यांच्या भावविश्वाला चैतन्य मिळाले. सहज निर्मित अशा मंडळाचे एक पर्व साहित्यात दुमदुमुन गेले.

सन १९२२ च्या सुमारास कवि यशवंत, कवि गिरीश आणि काही तरुण मंडळी "सन टी क्लब" च्या निमित्ताने दर रविवारी काव्यचर्चेसाठी जमत असे. याच क्लब चे पुढे "रविकिरणमंडळ" नामाकरण करण्यात आले. या मंडळाला अध्यक्ष, चिटणीस असा औपचारिकपणा नव्हता. फक्त काव्यप्रेम आणि काव्यशास्त्राची चर्चा या उद्येश्याने मंडळाची निर्मिती झाली. या मंडळाचे सदस्य माधव जूलिअन, गिरीश, यशवतं, श्रीधर रानडे, मनोरमाबाई रानडे, गजानन माडखोलकर, दत्तात्रय गोखले, नाट्यछटाकार दिवाकर (शंकर का.गर्गे) हे सदस्य होते. दिवाकर मंडळातून बाहेर पडल्यावर विठ्ठल घाटे यांना सदस्यत्व देण्यात आले.

यशवंत, गिरीश आणि माधव जूलिअन यांनी काव्यगायनेच्या प्रथेला आरंभ केला. त्यांच्या काव्यगायनाला उदंड प्रतिसाद मिळाला, कवितेत नवे प्रयोग होऊ लागले, आणि कविता लोकाभिमुख व लोकप्रिय झाली. मंडळातल्या कवींनी स्त्री-गीते, लोकगीते, नाट्यगीते, लावणी यांचा कल्पकतेने उपयोग करुन  मराठी कवितेत गेयता आणली. जाती रचनेत विविध प्रयोग करत काव्याला एक नादयुक्त आणि तालबध्द आकृतीबंध दिला.

सन १९२३ साली मंडळाचे पहिले पुस्तक "किरण" एकूण ३२ पानांचे व गद्यपद्य स्वरुपाचे प्रसिध्द झाले. यात दिवाकरांच्या नाट्यछटा व इतर सदस्यांच्या कविता समाविष्ट होत्या. हे पुस्तक समीक्षकांनी बरेच गाजवले. किरणच्या पाठोपाठ मंडळाचे "काव्यविचार", "शलाका", " उषा", "मधुमाधव", "प्रभा" हे काव्यसंग्रह प्रसिध्द झाले. मंडळावर अनेक टीका झाल्यात...त्यांच्या कवितेवर टीका झाल्या..पण मंडळ बहरत गेले. मंडळ व त्याचे काव्य बहरत असतांना १९२६साली मनोरमाबाईंचे अकाली निधन झाले. याचा परिणाम

श्रीधरपंत यांच्या लेखनावर झाला. उरलेल्या सदस्यांपैकी माधव जूलिअन, गिरीश व यशवंत यांनी अविरत काव्योपासना केली. तर इतर सदस्यांनी स्वतंत्र लेखनास सुरवात केली. माधव जूलिअन- गिरीश-यशवंत हे रविकिरणमंडळाचे त्रिदल. या त्रिदलाची काव्यनिष्ठा मराठी साहित्यात अजरामर ठरली. संघटित होऊन काव्यप्रसार करण्याचे मंडळाचे बरेच अनुकरण झाले परन्तु काव्यातील उत्कृष्टता, गुण, वैशिष्ट्ये जपण्याची उल्लेखनीय कामगिरी रविकिरणमंडळास शक्य झाली.

मराठी काव्याच्या प्रदीर्घ प्रवाहातील रविकिरणमंडळ हा एक महत्वाचा टप्पा आहे त्याकडे दुर्लक्ष करुन कसे चालेल. एका व्यासंगी समीक्षकाने म्हटले आहे, "रविकिरणमंडळाने काव्यक्षेत्रात केलेल्या कामगिरील येत्या शंभर वर्षात तोड नाही.. रविकिरणमंडळ हा एक विचार होता,- जीवनाचा आणि काव्याचा ! तो केवळ साहित्यिकच नव्हे तर सामाजिक आणि सांस्कृतिक प्रयोग होता."

रविकिरणमंडळाचे अवलोकन करतांना त्यांच्या सदस्यांचा परिचय आणि मंडळामार्फत त्यांचे कार्य जाणून घ्यायचा हा एक प्रयत्न.

माधव जूलिअन

माधव जूलिअन अर्थात माधवराव त्रिंबक पटवर्धन. यांचा जन्म २१ जानेवारी १८९४ रोजी बडोदे येथे झाला. त्यांचे शिक्षण बडोद्याला झाले. कवि मुंबई विद्यापीठाचे पहिले डी.लिट होते. त्यांनी जूलिअन हे नाव मारी कोरेली लिखित "गॉड्स गुड मॅन" या कादंबरीतील स्वच्छंदी-उत्कट-सौंदर्यपुजारी-कवि जूलिअन आर्ली या पात्रावरुन घेतले होते. माधव जूलिअन एक तत्वज्ञ कवि आणि फार्शी-मराठी कोशकर्ता पण होते. मराठी भाषा व व्याकरणातील शुध्दीकरणाच्या आंदोलनातील ते एक काव्यचिकित्सक होते.

हिंदपुत्रांनो, स्वत:ला लेखिता का बापडे ?

भ्रान्त तुम्हा का पडे ?

वाघिणिचे दूध प्याले वाघबच्चे फाकडे

हिंदभू वीरप्रसू जी वैभवाला पावली

कां अता खालावली ?

पूर्वजांची थोरवी लाभे पुन्हा बोलून का?

झिंगुनी डोलू नका

लक्ष द्या चोहिकडे, द्या कालवैषिटयाकडे !

या ओळी कवीच्या "भ्रांत तुम्हा का पडे ?" या रचनेतील आहे. आजचे समाजचित्रण तत्कालीन समाजव्यवस्थेहून निराळे नाही. कवीने केलेले आव्हानाची गरज तेव्हाही होती आजही आहे. तर कवीच्या "शिवप्रताप" या रचनेवरुन त्यांची ऐतिहासिक आस्था, सामाजिक जाणीव, मायबोलीचा अभिमान आणि मराठीबाणा प्रत्ययास येते.

भवानी आमुची आई,शिवाजी आमुचा राणा

मराठी आमुची बोली,गनीमी आमुचा बाणा

मराठ्यांच्या प्रदेशाचा कणा हा सह्यबंधारा

कशाचा पारतंत्र्याला दर्याखोर्यात थारा ?

माधवरावांची खरी ओळख पटते ती त्यांच्या पत्नी लीलाबाई पटवर्धन लिखित "आमची अकरा वर्षे", या पुस्तकात..लीलाबाईंच्या शब्दात सांगायचे झाले तर माधवराव अतिशय लहरी, मनस्वी, स्वयंकेंद्रीत होते. समीक्षकांमुळे झालेली अवहेलना त्यांच्या स्वयंकेंद्रीत स्वभावाला बोचत असे. उपहासाने समीक्षक त्यांना प्रणय पंढरीचे वारकरी म्हणत असे.

कवीच्या प्रेमकवितातून प्रीतीचे अनोखे रुप अनुभवायला मिळते. त्यांचे प्रेमकाव्य विलक्षण आणि अनेक भावनांनी अविष्कृत आहे. त्यांच्या काव्यात व्यक्त प्रेमभावना बहुरंगी आणि बहुढंगी आहे. "मुक्तपक्षी" या रचनेतील या ओळी:

वेड आधी सांग कोणी लाविले ?

आणि डोळा गूज कोणी दाविले ?

नेणता पक्षी मला पाहूनि तू

भोवती जाळे खुबीने टाकले.

तर "प्रेमाची दक्षिणा" या रचनेत कवीला प्रेम म्हणजे केवळ भावनांवचा खेळ नसून एकमेकांवरचे निस्सीम प्रेम कवीला अपेक्षित आहे. याच तृप्त प्रेमाचे कवी ऋण या रचनेत व्यक्त करतो:

जीव तूझा लोभला माझ्यावरी रे शोभना,

या ऋणाची विस्मृती ती ना कधी होवो मना !

का मुळी कोणी करावे प्रेम एखाद्यावरी ?

हे तुझे सौजन्य पाणी आणिते या लोचना.......

याच रचनेतील पुढच्या काही ओळी अशा आहेत :

शक्तिच्या राज्यात सत्ती शोभते शोभो तिथे

प्रीतील स्वातंत्र्य आधी पाहिजे,का होय ना?

जन्मता सानिध्य लाभे,नित्य ते कैंचे परि?

नर्मदा-शोणास नेई दूर दैवी योजना.

या रचनेचा शेवटच्या ओळी :

चाललो एका दिशेने थोडके का हे असे ?

सागरी एकाच भेटू अंतकाळी मोहना.

प्रेमाच्या अनेक अवस्था उलगडणाऱ्या या कवीच्या प्रेमाची शेवटची पायरी मात्र भक्तीपाशी येउन थांबते. याचा प्रत्यय त्यांची प्रसिध्द रचना "मुरली" यात प्रत्ययास येतो. इतर कवींप्रमाणेच राधाकृष्णाच्या प्रेमाने त्यांनाही भुरळ घातली. म्हणुनच कवीचा प्रणय आणि प्रीतीचा आविष्कार कृष्णापाशी येऊन संपूर्ण होतो.

श्रीकृष्णा रे, आस न दुसरी उरली,

ये घुमव मधुर तव मुरली !! धृ !!

क्षण दिपवुनी होशी दृष्टीआड

अन वरिशी मूकता द्वाड

स्वरसंगम तो, तगमगतो हा जीव

वाजीव गडे वाजीव!

ये बरस पुन्हा तोअ रम्याद्भुत राग

ये फुलव झुलव दिल्बाग.

माधवरावांची ओळख त्यांच्या गज़ल आणि रुबायांशिवाय अपूर्ण आहे. "गज्जलांजली" या संग्रहात गज़लवृत्ताचे विविध प्रयोग प्रचितीस येतात. हा संग्रह केवळ त्यांच्या हौसेचा प्रयोग होता असे त्यांनी प्रस्तावनेतच स्पष्ट केले आहे. त्याचा संबंध त्यांच्या

भावजीवनाशी लावणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय केल्यासारखे होईल. माधवराव एक प्रयोगशील कवी होते. अरबी- फारशी वृत्ते मराठीत आणण्याच्या उद्येश्यानी त्यांनी अनेक भावगीते व कवितांची निर्मिती केली. "विरहतरंग" हे त्यांचे गाजलेले दीर्घ भावकाव्य यात कवीने २३८ श्लोकांच्या माध्यमातुन एक विरहकथा मांडली आहे. तर "तुटलेले दुवे" हा त्यांचा सुनीत संग्रह. यात १०१ *सुनीत*यांच्या माध्यमातून कवीने शोकाकुल प्रेमकथा गुंफली आहे. कवीने उमरखय्याम या इराणी कवीच्या रुबायांचे मराठीत भाषांतर "उमरखय्यमच्या रुबाया" आणि "द्राक्षकन्या" या संग्रहांची निर्मिती केली. कवीचे " नकुलालंकार"यात एकूण १०९० आर्या आहेत आणि "सुधारक" उपहासात्मक खंडकाव्ये खूप गाजलीत.

माधवराव हे तत्कालीन वादग्रस्त कवी होते. त्याचे कारण त्यांचे अस्वस्थ वैयक्तिक जीवन आणि ते अस्वस्थ होण्याचे कारण म्हणजे समीक्षकांचे प्रहार, त्यांच्या लेखनावर आणि त्यांच्यावर त्याकाळी अनेक टीका झाल्यात. एकूण त्यांच्या लेखनाने त्यांच्या आयुष्यात अस्थिरता निर्माण झाली. त्याच्या विश्लेषणाची आज गरज वाटत नाही. त्यांनी जे लिहिले ते तत्कालीन परिस्थितीत क्रांतिकारी लेखन होते..आधुनिक होते...आणि प्रयोगशील होते. माधवराव त्यांच्या अखेरच्या काळात अधिक चिंतनशील व अंतर्मुख होत गेले. त्यांचे २९/११/१९३९ रोजी निधन झाले.

त्यांचे वृत्तरचनांवरचे प्रभुत्व, गज़ल काव्यप्रकार मराठीत रुजवण्याचा प्रयत्न, अरबी-फारशी वृत्त मराठीत आणण्याचा आग्रह, प्रेम-प्रीती, समाजव्यवस्थेत सुधारणा या मुख्य काव्य विषयांतून त्यांचे मराठी साहित्यातील योगदन निश्चितच मोलाचे व उल्लेखनीय आहे. ते जळगाव येथे सन १९३६ साली भरलेल्या २२व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते.

माधव जूलिअन यांची काव्य एकूण नऊ पुस्तकात समाविष्ट आहे:

*विरहतरंग(सन १९२६), *सुधारक(सन१९२८), *उमरखय्यामच्या रुबाया(सन १९२९), *द्राक्षकन्या(सन१९३१) *,गज्जलांजली(सन १९३३), *स्वप्नरंजन(सन१९३४) ,*तुटलेले दुवे(सन १९३८), *नकुलालंकार(सन१९३९), *मधुलहरी(सन१९४०).

कवीचे इतर लेखन: *छंदोरचना (सन १९२७), *फार्शी मराठी कोश(सन १९२५), *भाषाशुध्दी विवेक(१९३८), * पद्यप्रकाश (सन १९३८), * काव्यविहार(सन १९४७), * भा.रा.तांबे यांच्या समग्र कवितांचे संपादन(सन १९३५)

गिरीश

कवि गिरीश अर्थात शंकर केशव कानेटकर यांचा जन्म २८/१०/१८९३ रोजी फत्यापूर, जिल्हा सातारा येथे झाला. सातारा-पुणे येथे त्यांचे एम.ए., एस.टी.सी. पर्यन्त शिक्षण झाले. कवी गिरीश समाधानी एवं कुटुंबवत्सल कवि होते. त्यांच्या काव्यात सयंम, स्नेह, आदर, वात्सल्य यांची प्रचिती येते. त्यांची कविता म्हणजे एखाद्या बोलक्या चित्रांसारखी आहेत. "सुंदर हिरवे माळ" ही त्यांची प्रसिध्द रचना:

सुंदर हिरवे माळ ! चहुकडे सुंदर हिरवे माळ !!

जमली काळी वर घनमाला

झिमझिम पाउअस खाली आला

ग्रीष्मर्तूचा ताप निवाला

कोंभ येउनि दूर दूरवर पालवले खडकाळ !

बोरवनाची सुकली पानें

तरतरली या नव जलपाने

विरळ बाभळी चैतन्याने

स्वांनदाने डूलूं लागल्या सकाळ,सायंकाळ !

कवि गिरीश यांच्या काव्यकर्तृत्वाकडे दृष्टीक्षेप टाकता, ते स्फुट काव्यापेक्षा खंडकाव्यात प्रकर्षाने जाणवते. तो काळ ही तसाच होता. आपले विचार लोकांपर्यन्त पोहचवण्यासाठी खंडकाव्य हे प्रभावी माध्यम होते. ते कवि गिरीश यांनी हेरुन त्यांचे विचार, त्यांना समाजाबद्दल वाटणारी तळमळ खंडकाव्यातून व्यक्त केली. त्यांचे उल्लेखनीय खंडकाव्य म्हणजे "आंबराई" आणि "अभागी कमल". यात एका कलाप्रिय विधवेची कहाणी गुंफली आहे. वैधव्याने त्रस्त पिडित आभागी कमलची व्यथा मांडून समाजव्यवस्थेतील तृटी सामान्यांपार्यन्त पोहचवून कवीने वैचारिकक्रांतीचे पहिले पाऊल उचलले. तत्कालीन परिस्थितीतील ते एक आव्हानात्मक खंडकाव्य होते.

"भलरी" ही कवीची ग्रामीण भाषेतील तरल आणि मोहक रचना आहे. यावरुन कवीचा कल्पनाविलास आणि शब्दसामर्थ्याचा प्रत्यय येतो.

भल ऽ र,भल ऽ र

भलंरि दादा ! भल गडि दादा !!

तांबड्स फुटलं, झुंजूमुंजू

सुकीर चांदनी लागली इझूं

थण्ड वात करतुया कुजूंबुजू

म्होरं हात चालिव जोसांत मर्दा

भलंरि दादा ! भल गडि दादा !!

कापूरवढ्याच! झुळझुळ पानी

पाखरासंग गाउनश्यानी

रंझविल गड्या खेळियावानी

न्हिरीचा खाउन चल भाकर कान्दा

भलंरि दादा ! भल गडि दादा !!

"श्रीशारदावंदन" ही रचना कवीचा मानस व्यक्त करणारी आहे:

जीवा हवें ते कुठें सापडेना, म्हणूनी तुझ्या संगलो चिंतनीं

माते ! मन:शांततेची सुधा या जीवा पाजवी गीतगंगेतुनी

नि:स्वार्थतेने तुझे शब्दबिंदू असे साठवूनी सदा अंतरी

सोडीन एके दिनीं कांचनाची शिरांतून गंगा गिरेशापरी

कवि गिरीश हे रविकिरणमंडळाचे ज्येष्ठ सदस्य होते. त्यांचा खंडकाव्यातून दीर्घकाव्याची परंपरा जपण्याचा प्रयत्न नक्कीच उल्लेखनीय आहेत. कवीची मधुर भाषेतील अभिव्यक्ती, शब्दचित्र उभे करण्याचे सामर्थ्य, गेयता, तालबध्द्ता, चिंतन त्यांच्या काव्याची वैशिष्ट्ये आहेत. कवि गिरीश यांनी सुनीत, गीते, अभंग, मुक्तछंद, असे अनेक काव्यप्रकार समर्थपणे हाताळलेत. मराठी साहित्यात शब्दरुपी कांचनगंगेचा प्रवाह देणार्या या लोकप्रिय कवीचे ४/१२/१९७४ रोजी निधन झाले.कवि गिरीश यांचे साहित्य :खंडकाव्य : * अभागी कमल ( सन १९२३ ), * कला (सन १९२६ ), * आंबराई (सन १९२८ ), * अनिकेत (सन १९५४ ) * अमृत

काव्यसंग्रह : * कांचनगंगा( सन १९३० ), * फलभार (सन १९३४ ), * मानसमेघ ( सन १९४३)

* चंद्रलेखा, कांचनमेघ (सन १९५४), * सोनेरी चांदणे ( सन १९६१).

यशवन्त

कवि यशवन्त अर्थात यशवन्त दिनकर पेंढरकर. यांचा जन्म ९/३/१८९९ रोजी तारले, जिल्हा: सातारा या गावी झाला. त्यांचे बालपण चाफळ येथे आणि इंग्रजी सातवी पर्यन्त शिक्षण. सन १९४० ते १९४७ या काळात ते बडोदा संस्थानाचे राजकवी होते.

कवीची प्रारंभीची कविता प्रतिकुल परिस्थितीमुळे नैराश्याकडे झुकलेली आढळते. तत्कालीन समीक्षकांनी त्यांना "दु:खाचे शाहिर" म्हणून संबोधिले आहे. त्यांच्या अनेक आत्मपर कविता उदास आणि खिन्न आहेत.

"आई म्हणोनि कोणी   आईस हाक मारी ,

ती हाक येई कानीं    मज होय शोककारी,

नोहेच हाक माते      मारी कुणी कुठारी,

आई कुणा म्हणू मी?  आई घरी ना दारी,

ही न्यूनता सुखाची    चित्ता सदा विदारी

स्वामी तिन्ही जगांचा  आई विना भिकारी!

त्यांची "आई" ही लोकप्रिय कविता आजही डोळयात पाणी आणते. त्यांच्या "गाऊ त्यांना आरती", "तुरुंगाच्या दारात", "दैवत मायतात" या अजरामर रचना आहेत. कवीने काव्यात अनेक विषय जसे प्रेम, निराशा, परंपरा, सुधारणा यावर विपुल लेखन केले. त्यांच्या राष्ट्रीय कवितांबरोबर ग्रामीण रचना पण लोकप्रिय झाल्यात. "न्याहारीचे गाणे" या रानेतील या ओळी:

न्याहारीचा वकुत होईल

मैतरिणी बिगी बिगी चाल

नांगूर-सुटीच्या आत

पोचाया होवो तत

सोडितील हात बैलाला

धुंडिल नजर कोनाला ?

तर "युगंधराचे पालुपद" या रचनेत व्यक्त कवीचे विचार, कवीची अन्यायाबद्दल असलेली चीड, सामान्यांचा भेकडपणा, सर्वसामान्यांच्या विचारवृत्ती आणि ते जगत असलेले व्यवहारी जीवन यातील विसंगती त्यांच्या कवीमनाला क्षुब्ध करते. त्यांचे शब्द आपल्या मनावर नेमका आघात करते.

जमेच ना , घडेच ना

बनेच ना, पटेच ना

घ्या तर हाती आता बंदुक

चढवा पट्टे उभे आडवे

पिंड्यांभवती

कमरेभवती

छातीवरती

शिका, चला व्हा कडवे शूर !

घडी बसाया हवी जगाची

नवीन सुंदर शांत निरामय

उरस्फोड का थोडी केली ?

सिंधु आटले किती शाईचे !

बोरु मेरु-मंदाराचे

झिजले, गेले तासुन चिंबुन

फेसहि आला ओठांभोवती !

पण

जमेच ना , घडेच ना

बनेच ना, पटेच ना

या रचनेचा शेवट करतांना कवी म्हणतात:

शतके गेली,

युगेहि गेली !

परन्तु त्यांचे एक पालुपद

जमेच ना , घडेच ना

बनेच ना, पटेच ना

या ओळी आजच्या युगात पण सार्थ ठरतात. स्वातंत्र्यानंतर इतक्या वर्षांनी काही प्रश्न जसे सामाजिक अस्थिरता, भ्रष्टाचार, बेरोजगारी, महागाई, भेदभावाचा आंतरिक संघर्ष, दारिद्र्य सुटलेच नाही, तर उलट दिवसेंदिवस वाढतातच आहेत.

वाढु दे कारागृहाच्या भिंतीची उंची किती

मन्मना नाही क्षिती

भिंतीच्या उंचीत आत्मा राहातो का कोंडुनि ?

मुक्त तो रात्रंदिनी !

भक्तिला जो पूर आला वाढतो तो अंतरी

पायरीने पायरी

फत्तरांच्या या तटांनी ओसरावा काय तो ?

सारखा फोफावतो

अंजनीच्या बालकाने सूर्यबिंबा ग्रासिले

मन्मनी ते बिंबले

घालिती सैतानसे शत्रू इथे थैमान जे

ते गिळाया मी सजे.

या ओळी कवि यशवन्त यांच्या अजरामर कविता "तुरुंगाच्या दारात" या रचनेतील आहेत. स्वातंत्र्यसंग्रामाचे ते एक साक्षीदार होते. स्वातंत्र्यानंतर ते टिकवण्याची धडपड त्यांच्या कवीनजरेतून सुटली नाही. कवीचे मन स्वातंत्र्यासाठी, ते जपण्यासाठी, किती तळमळत होते याचा प्रत्यय त्यांच्या राष्ट्रीय कवितेत येतो. कवीचा साहित्यप्रवास प्रदीर्घ होता. या प्रवासात त्यांनी विविध विषयांवर विपुल व अनेक अविस्मरणीय साहित्यकृतींची निर्मिती केली. ते महाराष्ट्र साहित्य संमेलन (मुंबई सन१९५०) चे अध्यक्ष होते. त्यांना महाराष्ट्रकवि (सन १९६०) आणि पद्मभूषण (सन १९६९) हे सन्मान ही लाभलेत.

या संवेदनशील, कुटुंबवत्सल, राष्ट्रभक्त कवीचे २६/११/१९८५ रोजी निधन झाले. त्यांची साहित्यसंपदा :

काव्यसंग्रह : *मित्रप्रेम रहस्य ( सन१९१९),*यशवन्ती ९ सन १९२१), *वीणाझंकार(सन १९२२),

*इंदुकला(सन१९२३), *यशोधन ( सन १९२९), * भावमंथन(सन १९३०),

* यशोगंध( सन १९३४), *यशोनिधी (सन १९४१), * यशोगिरी(सन १९४४),

* ओजस्विनी (सन १९४६), *पाणपोई (सन १९५१), *बाकळ(सन १९५६),

* कमंडलू(सन १९६२)

कथा/खंडकाव्य:*जयमंगला(सन १९३१), * बंदीशाळा(सन १९३२), *काव्यकिरीट(सन १९४०),

*तुटलेला तारा(सन १९६१), * मुठे लोकमाते (सन १९६१),

*रणदुर्गा झाशीवाली(सन १९००),

महाकाव्य: *छत्रपती शिवराय

श्री.बा.रानडे-मनोरमा रानडे

प्रभाव माझा कसा केवढा ठाउक इतरा जना नसे

सांगे ज्यांना ते ते म्हणती खचित लागले मला पिसे

श्री.बा.रानडे अर्थात श्रीधर रानडे उर्फ नाना रानडे हे रविकिरणमंडळातील ज्येष्ठ सदस्य होते. श्रीधरपंत आणि मनोरमाबाई म्हणजे वसिष्ठ-अरुंधती ची जोडी.

वरील ओळी कवीच्या " कविप्रभाव" या रचनेतील आहे.

पुरे पुरे ग हसणे, किती हसावे मनुजाने

सौख्यामागे ती छाया, दु:खाची शिनवी काया.

स्थिती दोन प्रतिवस्तूला, असली,विदित न कां तुजला ?

जलधर गर्जे हर्षाने, सौदामिनीच्या संगमने

करात घालुनि कर मोदें, नभभर हिंडे स्वछंदे

या ओळी मनोरमाबाईंच्या "पुरे पुरे ग हसणे" या रचनेतील आहेत. मनोरमाबाईंच्या काव्याला बहर चढत असतांना त्यांचे अकाली निधन झाले. मनोरमाबाईंची कविता स्फुट असुन त्यांच्या काव्यात आत्मपर रचनां अधिक आहेत. श्रीधरपंतांनी बालसाहित्य, स्फुट व दीर्घ काव्य असे विपुल लेखन केले.

"काळाच्या दाढेतून" हे त्यांचे आत्मपर दीर्घकाव्य उल्लेखनीय आहे, ते कॉलराने आजारी असता त्यांच्या मनात उठलेल्या विचारतरंगावर आधारित आहे. या दोघांचा श्री-मनोरमा हा काव्यसंग्रह दोघांच्या प्रेमाचे प्रतीक ठरला. या दांपत्याने रविकिरणमंडळासोबत जो काव्यप्रवास केला तो निश्चितच विशेष आणि मोलाचा आहे.

वि.द.घाटे

रडुं नकोस राजस बाळा ! तो पहा महात्मा आला...!!

शशिमंगल शुक्र नभांत या प्रभात तेजी विरले

बघ बाळा! देवाजीने वर डोके अपुले केले,

गोजिर्या पाखरांनी या हे जंगल मंगल झाले,

मोकळया हवेने बघ हे ताड वृक्ष कैसे डुलते

संपली रात्र घोराची

अर्धपोटी राबायाची

कोपर्यात मग कुढण्याची

हा ताजा वारा सुटला तो पहा महात्मा आला.

या ओळी कवि वि.द.घाटे यांच्या "तो पहा महात्मा आला" या रचनेतील आहे. कवि वि.द.घाटे अर्थात विठ्ठल दत्तात्रय घाटे. हे कविवर्य "दत्त" अर्थात दत्तात्रय कोंडो घाटे यांचे पुत्र, यांचा जन्म १८/१/१८८५ रोजी झाला. कवीने काव्य, व्यक्तिचित्री, ललित, नाटक असे विपुल लेखन

केले. तसेच प्राचीन संस्कृती, मराठ्यांचा इतिहास  हा त्यांच्या लेखनाचा आत्मा होता. त्यांची "आई आम्हां आठवशिल ना?" ही अत्यंत लोकप्रिय रचना.

आई ! आम्हां आठवशिल ना
स्वातंत्र्याच्या हिमालयावरि
पुन्हा समाधी घेतांना !! धृ !!

अंधारामधिं खडा पहारा
देत वेचिला जन्महि सारा
परि शुक्राचा प्रकाश अपुरा
तोहि न दिसला नयनांना

रविकिरणमंडळातील गजानन माडखोलकर आणि दत्तात्रय गोखले यांचे काव्यसंसार फारच लहान होता. मात्र माडखोलकर हे कादंबरीकार आणि पत्रकार म्हणुन प्रसिध्द झालेत. त्यांची मोजकीच काव्यरचना असली तरी त्यांची सुनीत आज ही वाचनीय आहेत. कवीचे "शुक्रतारा" हे सुनीत येणाऱ्या पिढीला नक्कीच मार्ग दाखवतील:

मी जेव्हा तुज पहातो तळपता सूर्यास्त झाल्यावर
उत्कंठा हृदयात दाटुनि मला तेव्हा  असे वाटते;
आली घेउनि रत्नदीप गगनी कांतास शोधावया
कालाची भगिनी, प्रभा मधुर ही त्यांचीच का फाकली ?
किंवा ज्यांतुनि इंदिरा प्रगटली ते दिव्य हेमांबुज
या गंभीर, अथांग सिंधुवरती शून्याचिया  शोभते

की हे कष्ट करुन विश्व शिणले त्याला निशा द्यावया
येते शांति,-सदैव दूतच तिचा तू काय अग्रेसर ?

तू प्रात:समयी परंतु दिससी पूर्वेकडे जेधवां
तेव्हा हर्षित चित्त होउनि मनी ही कल्पना येतसे

आले लावुनि दृष्टी ज्यावर मुनी ख्रिस्तास शोधीत ते
त्याच्यामागुनि,-तोच काय अससी तेजाळ तू तारका?
द्वेषाग्नी भडकून विश्व जळते-हे भोगिते यातना,
तो श्रेयस्कर मार्ग दाविशल का तू आज त्याला पुन्हां?

माधव जूलिअन- गिरीश-यशवंत हे त्रिदल या मंडळाचे आधारस्तंभ होते. तिघांचीही लेखन शैली भिन्न पण काव्यप्रेमाने त्यांना एकत्र आणले आणि या त्रिदलाने मराठी कविता घराघरात नेली. हे मंडळ अल्पकाळापर्यन्तच संघटित असले तरी आधुनिक कविपंचकात गुरफटून पडलेल्या कवितेला उत्तेजन आणि नवीन दिशा देण्याची गरज होती. हे कार्य कोणा एका कवीच्या प्रयत्नाने साध्य होणार नव्हते. त्यासाठी संघटित प्रयत्नांची गरज होती. रविकिरणमंडळाच्या निमित्ताने हा हेतू साध्य झाला होता. मंडळाने फार मोठी वैचारिक क्रांति जरी घडवून आणली नसली तरी संघटित काव्यपरंपरा सुरु करुन ती बराच काळ जतन करुन ठेवली यात शंकाच नाही.

रविकिरणमंडळाचे काव्यकतृत्व साहित्यात फार मोलाचे आहे. "काव्यपरंपरेत अधिक कलापूर्ण, अधिक विविधतायुक्त, अधिक आकर्षक, अधिक लोकप्रिय करण्याचे महत्वपूर्ण

कार्य या मंडळाने केले." असे कुसुमावती देशपांडे यांनी मौज १९४५-दिवाळी अंकात नमुद केले आहे.

कवितेला लोकाभिमुख करुन सर्वसाधारणांच्या अनुभवांना वाचा देण्याची परंपरा या मंडळाने प्रारंभ केली. समीक्षकांचे अभिप्राय बाजुला ठेवून या मंडळाचे एकूण कार्य व स्वरुप लक्षात घेतले तर या मंडळामुळे मराठी कवितेचा वाचकवर्ग वाढत गेला. सामाजिक खंडकाव्यातून समाजातील प्रश्नांना वाचा फुटली आणि प्रभावी आंदोलने सुरु होण्यास मदत मिळाली. माधव जूलिअन यांच्या मृत्युपश्चात या मंडळाचे कर्तृत्व हळुहळु संपुष्टात आले. कवि गिरीश आणि कवि यशवन्त यांनी नतंर अखंड साहित्यसेवा केली.

रविकिरणमंडळ , मंडळातील कवि त्यांच्या कार्याचे अवलोकन करण्याचा उद्देश्य एवढाच कि या संघटित प्रयत्नांची नव्य स्वरुपात आज तेवढीच गरज आहे. काळाच्या प्रवाहात काव्याचे स्वरुप नेहमीच बदलत असते...बदलणारच, परन्तु या बदलांचा वेग काळाच्या गतीपेक्षा अधिक वेगवान नको. आज अनेक काव्यमंडळे कार्यरत आहेत. या माध्यमातूनच काव्याची भाषा, व्याकरण, वैशिष्ट्ये जपली गेली पाहिजे.

रविकिरणमंडळ- एक अवलोकन

भाग २

रविकिरणमंडळाचे कार्य- कतृत्व-कवी यांचे अवलोकन करतांना, "छंदोरचना" आणि "सुधारक" हे दोन ग्रंथ वगळता मंडळाचे इतर साहित्य तत्कालीन महत्वाचे आहे. मात्र हे दोन ग्रंथ म्हणजे जुन्या-नव्या कवींना जोडणारा एक पारदर्शी दुवा आहे. या ग्रंथामार्फत नवकवींना एक नवी काव्य दृष्टी एक नवी दिशा देण्याची जवाबदारी या मंडळाने पार पाडली आहे. हे ग्रंथ कालबाह्य होण्याअगोदर वा विस्मृतीत जाण्याअगोदर, त्यातील काही विचारांची दखल घेणे आजच्या दृष्टीने आवष्यक वाटले.

छंदोरचना

"छन्दोरचना" हे रविकिरणमंडळाचे माधवराव पटवर्धन लिखित ९वे पुस्तक. हे पुस्तक २६/०६/१९२७ रोजी आर्यसंस्कृती मुद्रणालय, पुणे येथे वासुदेव गोपाळ परांजपे यांनी प्रसिध्द केले.या ग्रंथात एकूण आठ प्रकरणात संपूर्ण छंदशास्त्र अनेक उदाहरणांसह मांडले आहे.या ग्रंथाच्या १ल्या प्रकरणात "प्रस्ताव"यात कवीचे व कविता विचार कसे असावे याचा उल्लेख करतांना माधवराव म्हणतात " कवीने स्वत:च टीकाकार होउन आपल्या मूळ कल्पनेची विकृती होणार नाही, तर उलट बहारदार उठावणी होईल अशा रितीने प्रयत्न करायला पाहिजे ".

ही नि:श्वसिते

कोण सोडिते

मम ह्रदयीते

विचारुनी भिउनी त्याला ! पुढे करा मग कर आपुला

(टिळकांची कविता पान.१८)

या ग्रंथात लेखकाला व्याकरण व इतर बंधनांचे स्तोम माजवायचे नाही, हे अगोदरच प्रस्तावनेत स्पष्ट केले आहे. मात्र या बंधनांचे योग्य महत्व जाणणे त्यांना महत्वाचे वाटते. ही गरज ८७ वर्षांपूर्वी ही होती आणि आजही आहे. लेखकाच्या मते या बंधनांना स्वत:चे

असे महत्व नाही, परन्तु बहुजनसमाजाला हे पाळणे इष्ट वाटते तोवर त्यांची नैतिकसत्ता गाजू शकते. भाषा ही समाजाची असल्यामूळे तिच्या स्वरुपात , योगायोगाने व्याकरणाच्या नियमात फेरफार होणार हे माधवरावांना अपेक्षितच होते, परन्तु हे बदल होत असतांना नवी उपयुक्त बंधने घालण्याचे कार्य सुरु रहावे ही त्यांची इच्छा आणि नवोदित कवींकडून अपेक्षा होती.

या ग्रंथात प्रकरण २ ते प्रकरण ७ मधे लेखकाने यमकविचार, गणविचार, अक्षरविचार, वृत्तविचार, जातिविचार, व्याकरण विशेष या विषयांवर उदाहरणांसह विस्तृत चर्चा केली आहे. पद्यरचनेची भाषा तत्कालीन बोलचालीवर अवलंबून असते. छंदोरचनातील ८ व्या प्रकरणात पुन्हा कवीची व्याख्या स्पष्ट केली आहे. माधवराव लिहितात "साधारण मनुष्य ज्या प्रमाणे अनुभवातील तीन-चार गोष्टींवरुन एकदम अनुमान बांधतो त्याच प्रमाणे कवि अनुमान काढतो. साधारण मनुष्यापेक्षा तो अधिक खोल वा अधिक दूर पाहू शकतो. जसे प्रत्यक्ष अनुभुतीने सत्य पटते त्या प्रमाणे काल्पनिक अनुभुतीतून रसिकाला अनुभव द्यायचा व सत्याची प्रचिती करुन देण्यात कवीची हातोटी असली पाहिजे.काळाच्या ओघात काही व्याकरण व बंधने नकळत कालबाह्य होतात पण काव्यशास्त्र आणि काव्याविचारांचा प्रवाह अखंड व अबाधित आहे ,ते ठेवणे कवीचे कर्तव्य आहे." याच प्रकरणात लेखकाने " मराठी शब्दसंपत्ती सांभाळण्याची , ती वाढवण्याची जवाबदारी गद्यलेखकांप्रमाणे कवींवरही आहे...ही महनीय कामगिरी त्याने अंगाबाहेर टाकणे त्याच्या ब्रीदाला शोभणार नाही" असे म्हणत नवोदित कवींना त्यांच्या जवाबदारीची जाणीव करुन दिली आहे.

पूर्वीच्या काळी रंजनाचे साधन फारसे उपलब्ध नव्हते. कवींना आपल्या शब्दसामर्थ्याच्या जोरावर प्रासंगिक शब्दचित्र उभे करावे लागत असे. आज ही दृष्टी अनेक माध्यमातून उपलब्ध असतांना आजची कविता, आशय-अभिव्यक्तीच्या दृष्टीने अजून सशक्त असायला हवी. गज़लचा आकृतीबंध जसा गज़लकारांनी जतन केला, त्याप्रमाणे काव्यशास्त्राचे कवितेतून जतन करायला हवे. परकिय भाषा किंवा प्रचलित भाषेवर आक्षेप नाही. किंवा व्याकरणाच्या नियमातच लिहिले पाहिजे असा आग्रहही नाही. पण हे काव्यशास्त्र कुठेतरी जपले गेले पाहिजे. काळाच्या प्रवाहात भाषा, शब्द, शैली, व्याकरण यात सोयींनुसार कवीने बदल केलेत, तर काही नकळत झाले. साहित्याच्या अंगणात रुजलेला व्याकरणाचा- छंदशास्त्राचा जो

भक्कम पाया आहे, हा ग्रंथ त्यातील एक वीट आहे. गगनावर चढणाऱ्या काव्यवेलीला त्याच्या या मुळापासून कसे वेगळे करता येईल. जुन्यातूनच नवा जन्मतो, जुन्यातील अंश घेऊन.

सुधारक

"सुधारक" हे रविकिरणमंडळाचे माधवराव पटवर्धन लिखित ११वे पुस्तक. हे खंडकाव्य आर्यसंस्कृति मुद्रणालय, पुणे येथे वासुदेव गोपाळ परांजपे यांनी २१/०१/१९२८ रोजी प्रसिध्द केले. समाजात वेगवेगळया स्तरावर वावरणाऱ्या व्यक्तींचे प्रतिनिधित्व करणारे पात्र व प्रत्येक पात्राभोवतीचे शाब्दिकवर्णनावरुन तत्कालीन परिस्थितीचा अंदाज येतो. या पात्रांच्या माध्यमातून कवीने समाजप्रबोधन साधले आहे. कवीच्या लेखनाचा काळ बघता त्या काळात दोन विचारधारा प्रचलित होत्या. एक वैचारिक संघर्ष आणि दुसरा स्वातंत्र्यासाठी संघर्ष. सर्वसाधारण मानव अनेक जुन्या रिती-रुढी-परंपरा-अंधश्रध्दा यात गुरफटला होता. या विचारसरणीतून मुक्त करुन विधवा विवाह, अंतर्जातिय विवाह, अंध्दश्रध्दा निर्मुलन या सारख्या नव्याविचारांकडे या वर्गाला प्रवृत्त करणे सहज शक्य नव्हते. या वैचारिक क्रांतिचे बीज सुधारक सारख्या खंडकाव्यातून कवीने जनमानसात रुजवले. हे करतांना कवीला अनेक अवहेलना आणि समीक्षांना सामोरे जावे लागले. इतर सामाजिक प्रश्नांसोबत कवीने यात व्यक्तिमाहात्म्य आणि विवहसुधारणा हे दोन विषय यात हाताळलेत. या संग्रहातील प्रस्ताव कवीने "काव्यशास्त्रविनोद" कवितेतून अतिशय मार्मिकपणे केला आहे.

या काळाची महती गाता ?

काळास पुढे लोटी व्यक्ती

अनिवार जिची ध्येयासक्ती

अवतार गणी मग तिची भक्ती

परिस्थितीच्या खाउन लाथा

जाल पुढे घालित लोटांगण.

युगायुगापासून काळाचे हे चक्र असेच फिरत आहे. या खंडकाव्यात एकूण १८ अध्यायातून कवीची सामाजिक जाणीव प्रचितीस येते. यातील काव्य रावबहादुर ठोसर व त्याच्या अवती भवती फिरतांना आढळते. ठोसर हे तालुका स्तरावर प्रतिनिधित्व करतात. त्यात त्यांचा राजकिय व सामाजिक दबदबा, त्यांचे रहाणीमान हे चित्रण आहे. रावबहादुर यांची दुसरी तरुण पत्नी हिच्या मनाची घालमेल, तर "सावधान" या रचनेतून मुलीच्या लग्नाचा सोहळा मांडला आहे.तत्कालीन समाजाला ज्या विकृत विचारांच्या विळख्यातून सोडवायचे आहे, ते विषय यात कवीने मांडले आहे.विधवा विवाह, जातिभेद, हुंडा अशा अनेक प्रश्नांना वाचा फोडली आहे. स्वातंत्र्याचा दुरुपयोग होईल या भितीने स्त्रियांना मानसिक आणि सामाजिक दास्यात ठेवणे या सुधारकास मान्य नाही. कवीला "सामाजिक शिस्त म्हणजे धर्म मानत इतरांनी निमूटपणे सोसावयाचा असा अल्पसंख्यांक लोकांचा जुलुम नसून स्वत:च्या स्वातंत्र्याला जपत दुसऱ्याच्या स्वातंत्र्यालाही तेवढाच मान देणे ही कवीची व्याख्या आहे.

आज जरी हे प्रश्न आपल्या समाजात अस्तित्वात नसले तरी अशा प्रकारचे अनेक प्रश्न समाजात उजळमाथ्याने वावरत आहे. तत्कालीन परिस्थितीत या सुधारकाची नितांत आवश्यकता होती, परन्तु स्वातंत्र्यानंतर ७०वर्षांनी अशाच नव्या सुधारकाची गरज प्रकर्षाने जाणवली. रविकिरणमंडळाचे अवलोकन करतांना या सुधारकाबद्दल नमुद करण्याचे कारण एवढेच की समाजाची गरज कवींनी वेळोवेळी ओळखून आपली जवाबदारी नेहमीच पार पाडली आहे.

रविकिरणमंडळाचे अवलोकन करण्याची गरज एवढ्यासाठीच की आज ई-युगात अनेक कवी मंडळामार्फत काव्यप्रवाहाची धारा अखंड ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत..कविता नव्या स्वरुपात रुजत आहे. संघटित प्रयत्नांची जी प्रथा या मंडळाने सुरु केली ती आजही तशीच सुरु आहे.

रविकिरणमंडळ हा एक विचार होता..जीवनाचा आणि काव्याचा. तो एक साहित्यिकच नव्हे तर, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रयोग होता.

संदर्भ:


१) आधुनिक मराठी वाङमयाचा इतिहास-भाग पहिला(अ.ना देशपांडे

२) आधुनिक मराठी वाङमयाचा इतिहास-भाग दुसरा(अ.ना देशपांडे)

३) आधुनिक मराठी काव्यसंपदा-संपादक मधु मंगेश कर्णिक (कोकण मराठी साहित्य परिषद)

४) कविता विसाव्या शतकाची -संपादक शान्ता शेळके, प्र.ना.परांजपे, वसंत आबाजी डहाके, नीलिम गुंडी

५) पासंग-कुसुमावती देशपांडे

६) आठवणीतल्या कविता- भाग १ ते भाग ४

७) कविता स्मरणातल्या- शान्ता शेळके

८) प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास- ल.रा. नासिराबादकर

९) समग्र केशवसुत- संपादक भ.श्री पंडीत

१०) निवडक केशवसुत- वामन देशपांडे

११) हरपलेले श्रेय- रा.श्री.जोग

१२) रविकिरण मंडळाची निवडक कविता-संपादक अनुराधा पोतदार, वसंत कानेटकर

१३) विरह तरंग- माधव जुलियन

१४) माधव जुलियन- प्रा. माधवी वैद्य

१५) पिंपळपान - गोविंदाग्रज

१६) बालविहग- संपादक अनुराधा पोतदार

१७) बहिणाईची गाणी- बहिणाबाई चौधरी

१८) एकनाथ पांडुरंग रेंदाळकर-भ.श्री.पंडित

# मराठी कवयित्रींचा काव्यप्रवास............

मराठी स्त्री-काव्याची गंगोत्री जनाई, मुक्ताई, वेणाबाई, बहेणाबाई, प्रेमाबाई, कान्होपात्रा यांसारख्या संतकवयित्रिंच्या शब्दांनी खळखळून निघाली. नंतर ही गंगोत्री काही काळ लुप्त होती. सन १८८५ पासून आधुनिक कवितेचा कालखंड सुरु झाला. बदलत्या काळासोबत प्रचलित काव्यपरंपरेला वैचारिक दृष्टीने नवे वळण, नवी दिशा मिळत गेली. कवी वा कवयित्री यांचे व्यक्तिमत्व, काव्यवैशिट्ये, जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन त्यांच्या कव्यातून प्रत्ययास येत असतो.

आधुनिक आद्य कवयित्रीचा मान निश्चितच लक्ष्मीबाई टिळक (सन१८६८ ते १९३३) यांचा आहे. त्यांचा साहित्य प्रवास त्यांचे पती रेव्हरंड ना.वा.टिळक यांच्या सोबत सुरु झाला. ख्रिस्तायनमधील अध्याय १२ ते अध्याय ७५ हे दीर्घलेखन लक्ष्मीबाईंनी केले आहे. यावरुन त्यांची ख्रिस्तभक्ती आणि अभ्यासूवृत्ती प्रचितीस येते. यांची गाजलेली कविता म्हणजे "मी तुझी मावशी तुला न्यायला आले" :

माहेरी आपण भाऊबीजेला जाऊ

येतील न्यावया बाबा अथवा भाऊ

हे प्रौढपणाचे ओझे फेकुनि देऊ !

सुचतिल तेवढे खेळ खेळुनि घेऊ

कवितेतील या ओळी वाचताक्षणी त्याकाळातील स्त्री-जीवनपट सहज डोळयापुढे उभा रहातो. अल्पावयातच पडणारी संसाराची जवाबदारी व यातून थोडाकाळ मुक्ती देण्यासाठी भाचीला न्यायला आलेली मावशी, या आशयाभोवती ही कविता गुंफली आहे खर तर त्या काळी माहेरपणाला आणण्यासाठी घरातील पुरुष वडिल वा भाऊ जात असतं, मात्र या रचनेत "मावशी" आली आहे, कारण स्त्रीच्या भावना एक स्त्रीच समजू शकते. त्यात मावशी-

भाची हे नातं मैत्रीचे, या नात्यातील जावळीक साधत ततकालीन स्त्री समस्यांना सामाजिक दृष्टीकोन देण्याचा प्रयत्न या रचनेत केला आहे. त्यामुळे ही रचना हृदयस्पर्शीतर आहेच, रचनेचा काळ बघता ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्याची गरज लक्ष्मीबाईंनी अचूक हेरली.

"स्मृतिचित्रे" हे त्यांचे आत्मवृत्त आणि "भरली घागर' हा स्फुट कवितांचा संग्रह, या साहित्याची निर्मिती कुठल्याही शालेयशिक्षणाशिवाय झाली आहे हे लक्षात घेणे महत्वाचे आहे. इच्छाशक्ती, अभ्यासूवृत्ती आणि जागरुक सामाजिक दृष्टी निश्चितच लक्ष्मीबाईंचे साहित्यक्षेत्रात विशेष स्थान निर्माण करते.

काव्यगुणांच्या बाबतीत लक्ष्मीबाईंची मोठी बहिण शोभेल अशी कवियत्रि म्हणजे बहिणाबाई(सन१८८०-सन१९५१). बहिणाबाई एका शेतकरी कुटुंबातल्या, लग्नानंतर सुरवातीचा थोडा काळ सोडता त्यांचा जीवन प्रवास फार खडतर होता. मात्र त्यांच्या रचनांमध्ये कुठेही निराशा जाणवत नाही, त्या अत्यंत मार्मिक व समर्पक आहेत. अनेकांना पडलेले कोडे "मन" त्या सहजपणे उलगडून सांगतात:

मन मोकाट मोकाट

त्याले ठायी ठायी वाटा

जशा वाऱ्यानं चालल्या

पान्यावर हललेल्या रे लाटा

बहिणाबाईंच्या रचनांचा काळ बघता त्यांच्या काव्यातील सामाजिक दृष्टीकोन व्यापक व विशाल होता. मनोरंजनाचे मोजकेच साधन उपलब्ध असलेल्या त्या काळात रायरंग अर्थात बहुरुपीबद्दल ज्या तीव्रतेने त्यांच्या मनात दया दाटून येते, तीच तीव्रता त्यांच्या "योगी आणि . सासुरवाशीण" या रचनेत जाणवते. मुलासाठी नवस बोलण्याचा तो काळ, त्या काळात बहिणाबाई "लेकीच्या माहेरासाठी माय सासरी नंदत " असे ठसकावून सांगतात. इतक्या वर्षांनी या विचारांची आजही समाजात गरज आहे, हे प्रकर्षाने जाणवते.

सहज- सोपी- साधी भाषा त्यांच्या प्रत्यक रचनेचा आत्मा आहे आणि मार्मिक व आशावाद हे काव्यगुण. त्यांच्या लहानपणी कानावर पडलेल्या ओव्या व अभंग या आधारावर उभा राहिलेला अक्षरवेल आजही सात्विक फुलांनी टवटवीत आहे. या अक्षरवेलीचे अजून एक वैशिट्ये म्हणजे कुठलेही अक्षरज्ञान नसतांना त्यांच्या बहुतेक रचना आठ अक्षरातच गुंफल्या आहेत. बहिणाबाईंच्या बाबतीत आचार्य अत्रे यांचे शब्द 'जुन्यात चमकेल नव्यात झळकेल" याची प्रचीती देतात. मात्र मुद्रणापासून दूर असल्यामुळे बहिणाबाईंच्या विचारांचा प्रसार झाला नाही, याची खंत मनात नेहमीच दाटून येते. हे विचार जर त्या काळात प्रसारित झाले असते  तर मुलगी झाल्याचे दु:ख व त्याचे पडसाद आज उमटतांना दिसले नसते.

मनोरमाबाई रानडे(इ.स.१८९६-इ.स.१९२३) या रविकिरण मंडळाच्या पहिल्या महिला सदस्य.  "रसिक म्हणे मज "विषय कशाचा?"

पाठ बोल तू निज प्रेमाचा

विचार कर तू आयुष्याचा

गुंफ त्या कविता! डोलव मग सगळया जगता

या ओळी "लिहू कुणावर कविता?" या रचनेतील आहेत. आयुष्यावर बरचं काही लिहिण्यापूर्वीच ऐन तारुण्यात हा बहर कोमेजून गेला.

मात्र त्यांनी जे लिहिले त्यात प्रेम, वात्सल्य व निसर्ग हे प्रमुख विषय होते. "स्मृतिमंजुषा" व "कानिनी जाऊनी राहू" या उल्लेखनीय रचनांमध्ये कवयित्रिचा भावनाविष्कार अनुभवायला मिळतो.

आधुनिक कवितेच्या प्रवासातील सुरवातीच्या काळात एकीकडे स्वातंत्र्यासाठी लढा सुरु होता व दुसरीकडे समाजात विखुरलेल्या इतर समस्या जसे अंधश्रद्धा, बालविवाह, जातिभेद, वर्णभेद या विरुद्ध सुधारकांचा लढा सुरु होता. त्यात समस्त स्त्री वर्गाची स्वतंत्र अस्तित्व व कतृत्व स्थापित करण्याची धडपड सुरु होती.  या वैचारिक संघर्षाचा परिणाम

तत्कालीन साहित्यावर होत होता, स्त्रीची उंबरठ्याबाहेर पाऊलं उचलण्यची मानसिकता विकसित होत होती. अशा काळात पद्मा गोळे(इ.स.१९१३ ते १९९८) यांच्या कवितेने त्याग, भोग, माया व उंबरठ्यात अडकलेल्या स्त्रीला नवे आकाश दाखवले. हे आकाश मिळवण्यसाठी जो त्रास सहन करावा लागला, त्या बद्दल त्या म्हणतात;

सीतेपुढे एकच ओढली रेषा लक्षमणाने

तिने ती ओलांडली आणि झाले रामायण

आमच्यापुढे दाहीदिशा लक्ष्मणरेषा

रावणांना सामोरे जावेच लागते

एवढेच कमी असते

कुशीत घेत नाही भुई दुभंगुन.

पद्माताईंच्या कवितेतील भावविश्व जरी प्रेम, तृप्ती, वात्सल्य व निसर्गात गुरफटलेले असले तरी त्यांची सामाजिक जाणीवेची कक्षा व्यापक होती. वरील ओळीत तडजोड वृत्ती प्रचितीस येत असली तरीही आशेचा किरण दर्शवणारी आहे.

परिवर्तनाच्या काळात आणि समाजात स्वतंत्र अस्तित्व व कर्तृत्व निर्माण करण्याच्या नादात कवयित्रींच्या लेखणीतून उतरलेला सामाजिक दृष्टीकोन त्यांच्या भोवतालच्या विषयांपुरताच मर्यादित होत गेला या कडे दुर्लक्ष करु कसे चालेल?

इंदिरा संत(इ.स.१९१४ ते इ.स.२०००) यांना प्रसिद्ध लेखक गंगाधर गाडगीळ "आधुनिक मीरा" म्हणत असे. इंदिरा संत यांच्या कविता त्यांच्या वैयक्तिक अनुभवांचा आरसा आहे. त्यांच्या कवितेतील भाषा व अभिव्यक्ति सुक्ष्म निरिक्षणातून व्यक्त झाली आहे. त्यांच्या निसर्गकाव्यातील प्रतिमा त्यांच्या तरल कल्पनाशक्तीची प्रचिती देतात. स्त्रीच्या दैनंदिन जीवनाची कैफियत मांडतांना त्या म्हणतात:

आधुनिक स्वतंत्र स्त्री, स्त्रीचा विकास

स्त्रीची प्रगतीपथावरील वाटचाल इत्यादी इत्यादी

कानामनाला गोड वाटणारी

आकेडवारीची प्रगती तर सूर्यापर्यन्त पोहचणारी.....

......... आणि मग कुकर मग पोळया मग फोडण्या

थोरापोरांच्या मनधरण्या नोकरांच्या काचण्या

कितीतरी धागे घट्ट जखडून ठेवणारे

सगळाच शिणवटा. शिजवणारी ही तीच

आणि शिजणारी ही तीच.

"मध्यमवर्गीय गार्गी" या रचनेतील ओळीतून उंबरठ्याबाहेर पडल्यावरही स्वतंत्र स्त्रीचे चौकटीतले जगणे या शब्दिक चित्रातून डोळयापुढे उभे रहाते.

स्त्रीबद्दल पुरुष आणि एकूणच समाजाची मानसिकता बदलण्याची नितांत गरज असतांना, स्त्री समस्यांचे मूळ उपटुन काढून टाकावे असे प्रखर व तेजस्वी लेखन स्त्री-लेखणीतून उतरलेच नाही हे ही खरेच आहे. स्त्रीच्या दु:ख, वेदना, असाहयता, समाजापुढे आणण्यातच बराच काळ लोटला. स्त्रीचे पाऊल उंबरठ्याबाहेर पडून अर्ध्याशतकाहून अधिक काळ लोटला, घराची चौकट सांभाळत ज्ञान-कला-क्रिडा-साहित्य-विज्ञान-राजकारण अशा अनेक क्षेत्रात स्वतंत्र अस्तित्व स्थापित केले. मात्र हे करतांना तिच्या मागून येणाऱ्या स्त्री-पवलांची वाट सुलभ का झाली नाही? कवि-कवयित्रींच्या लेखन प्रवासात कळत-नकळत काही काव्यसंकेत तयार होत असतात, ज्याला आपण "प्रभाव" म्हणतो. काही कवयित्रींच्या काव्यप्रभावामूळे उंबरठ्यातले दु:ख अंगणात व अंगनातले दु:ख चौरस्त्यावर आले आणि वैचरिक बदल घडण्यास मदत झाली, नवकवितेच्या या कालखंडात कवितेत वैचारिक स्थित्यंतर व स्थिरता आली असली तरी कवयित्रींच्या काव्यातून सामाजिक जाणीवा प्रखरतेने व्यक्त झाल्या नाहीत. स्त्री-स्त्रीविषयक समस्या, दु:ख इत्यादी भावनांभोवती वेढलेल्या काव्याला आकाश खुणावत होते, मात्र शाब्दिक बळ तिच्या लेखणीतुउन उतरले नाही. स्वातंत्र्योत्तर सुरु असलेल्या वैचारिक संघर्षाचे परिणाम

इतर साहित्यप्रकारांवर जेवढे आढळून येतात तेवढे परिणाम कवयित्रींच्या काव्यावर आढळून येत नाही.

संजीवनी मराठे(इ.स.१९१६ ते इ.स२०००) मराठी साहित्य वसंतातील काव्यकोकीळा, यांनी पारंपारिक चौकट "१५ऑगस्ट१९४७", "लाल निशाण', "अशोक दिन" या कवितीतून भेदली असली तरी या रचना वाचकांवर परिणामकारक ठरले नाही. या संदर्भात पद्माताई गोळे म्हणतात: "वसंतागमन झाल्याबरोबर आर्तमधूर स्वरलहरींनी वातावरण भरून टकणाऱ्या कोकिळेकडून वनराजाच्या घनगर्जनेची अपेक्षा करणे कसे योग्य आहे?" ज्या काव्यसंकेतांवर कवयित्रींची कविता घडत होते ते संकेत बदलवण्यात संजीवनी मराठे यांना यश मिळाले यात मात्र शंका नाही. हळू हळू कवयित्रीने समाजव्यवस्था बदलवून टाकण्याची भाषा बोलण्यास प्रारंभ केला. वैयक्तिक व उदासिन रचनांमधे विचारांची बंडखोरी प्रवेश करु लागली. वैचारिक बंडखोरीने मात्र संस्कृती व संस्कार यांची सीमारेषा कधीच ओलांडली नाही. परिवर्तनाचा ओघ बघता, समाजात वाढता उपद्रव बघता, सुशिक्षित मराठी स्त्री जी सामाजिक जीवनात सर्व क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने कार्य करत असतांना तिच्या लेखणीतून ज्या उत्कट व तीव्रतेची गरज होती, ती अपेक्षित अभिव्यक्ति काव्यातून झाली नाही.

स्वर्ग कल्पनेतला

येईल कधी भूतला?

दिवसरात्र अंतरात आस ही उचंबळे

शांत सागरी कशास उठवली वादळे?

कल्पनेतला स्वर्ग भूतलावर येऊ शकत नाही असे ठाम मत असल्यामूळे आली ते तडजोड स्त्रीने स्विकारली, पण मनात उठणाऱ्या आशेच्या लाटांच काय? हा प्रश्न बराच काळ अनुत्तरीतच राहिला.

शांता शेळके हे नाव आज अनेक चित्रपट गीते, भावगीते, कोळीगीते, आरत्या,भूपाळया यामूळे घराघरात पोहचले आहे. जवळजवळ साठ वर्षांच्या त्यांच्या साहित्यप्रवासातील सहजता व प्रसन्नता मनाला भुरळ घालणारीच होती. शांताबाईंची कविता

आत्मकेंद्रित होती. मनातील द्वंद्व, एकाकीपणा, उदासीनता, स्मृती, व्याकुळता या भवनांभोवती त्यांची कविता घुटमळत राहिली. त्यांचे काव्य इतर कवयित्रींप्रमाणेच सुधारणवाद, राष्ट्रवाद, वास्तववाद, सामाजिक प्रश्नांपासून खूप दूर होते.

मे माझे गाणे गुणगुणत राहिले

"वेडेपणा काय" लोकं म्हणत राहिले

कुणि ही शिरकाव आत ना शके करु

कोश असा मी भवते विणत राहिले.

या ओळी शांताबाईंच्या "इत्यर्थ" या संग्रहातील शेवटच्या रचनेतील आहेत. त्यांच्या या ओळींतून त्यांची काव्यनिष्ठा प्रचितीस येते.

या कवयित्रींच्या कवितेतील रंजन आणि वैयक्तिक अनुभूती बाजूला ठेवून त्यांच्या काव्यातील सामाजिक दृष्टीकोनाहे मुल्यमापन ही काळाची गरज वाटली. पारंपारिक संकेतावर थोडेफार बदल करत कवयित्रींची नवी पिढी वाटचाल करत आहे, आजही स्त्री मुक्ती-स्त्री-जागृती-या विषयी चिंतन केले जात आहे. स्त्री ही समाजव्यवस्थेचा खरा पाया आहे हे सर्व संमत असतांना स्त्री-लेखणीतून तिला अपेक्षित समाजाचे शब्दचित्र का उभे राहिले नाही?आज आणि उद्याची कवयित्री, समाजातील इतर समस्या, वास्तविकता त्यांच्या काव्यातून प्रकट होणार? शापित-शोषित-वंचितांसाठी काव्यातुन आवाज उठवणार की  प्रेम-वात्सल्य-मोहमाया यात हूरळून जाणार ? स्त्री-काव्य समानता-हक्क- अगतिकता यांचाच लढा लढत रहाणार?

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे .कडे लक्ष नका देऊरडणाऱ्यां . पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार .आता मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत .पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी .दोनहजार प्रती छापल्या जात

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं . वर्षालाअर्धाकोटी डाऊनलोड होतातअप व्हट्स .वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात ., ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीतखेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासू .सुसाट सुटलित .न ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात.शकत नाही रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू .

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हाआपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात . त्यांचे ई मेल पत्ते .ओढा, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवातुम्ही फ़क्त दहा व .ाचक आणाते . .तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा .आणि ते दहाहजार .शंभर आणतील आपल्याला टिव्ही पेपर ची .वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत आपल्याला फ़ुकट पुस्तकं मराठी .तेच आमची ताकद .आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट .जाहिरात परवडत नाही भाषेची ताकद जगाला दाखवू.

ई साहित्यची पुस्तके

www. esahity. com वरून डाऊनलोड करा .

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवाकिंवा .7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा .

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहेते .download करा .

हे सर्व मोफ़त आहे.